# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार २२ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०







## कर्जमाफीवर फडणवीसांची मोठी घोषणा!

# पात्र शेतक-यांची पहिली यादी उद्या जाहीर होणार



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतक-यांसाठी महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. राज्य सरकारच्या बहुचर्चित कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी लवकरच सुरू होण्याची शक्यता असून, पात्र शेतक-यांची पहिली यादी जाहीर करण्यासाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे. त्यामुळे कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो शेतक-यांचे लक्ष आता सरकारच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे. शेतक-यांच्या कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आता शक्यता आहे की, उद्याच अजितदादांच्या जयंतीचं औचित्य साधून कर्जमाफीच्या पात्र शेतक-यांची पहिली यादी जाहीर करण्याचा प्रयत्न करत आहोत. यासाठी बाबासाहेब पाटील तयारी करत आहे. फडणवीस माध्यमांशी बोलत होते. कर्जमाफीची पहिली यादी उद्या जाहीर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. या यादीत पात्र शेतक-यांची नावे प्रसिद्ध होणार आहे. या यादीकडे लाखो शेतक-यांचे लक्ष लागले आहे.कर्जमाफीची अंमलबजावणी अपेक्षेपेक्षा लांबल्याने शेतक-यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. यापूर्वी ३० जून आणि त्यानंतर ५ जुलै या दोन तारखा जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने विरोधकांनी सरकारवर 'तारीख पे तारीख' देत शेतक-यांची दिशाभूल केल्याचा आरोप केला आहे. राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात कर्जमाफीसाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांची तरतूद पुरवणी अर्थसंकल्पातून केली आहे. मात्र, लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष निश्चित करताना काही तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्याने प्रक्रिया पुढे ढकलावी लागली.

# खोताकडून आंदोलनकर्त्यांना आतंकवाद्याची ऊपमा

**मुंबई / प्रतिनिधी-** दिल्लीतील जंतर-मंतरवर नीट परीक्षा आणि पेपरफुटीच्या मुद्यावरून सुरू असलेल्या आंदोलनावर सदाभाउ खोत यांनी अत्यंत आक्रमक आणि वादग्रस्त भाष्य केले आहे. दिल्लीत आंदोलन करणा-या आंदोलकांची तुलना थेट आतंकवाद्यांशी करत, या आतंकवाद्यांना सरकारने लोकशाहीच्या मार्गानेच चोख उत्तर दिले पाहिजे, असे वादग्रस्त वक्तव्य सदाभाउ खोत यांनी केले आहे.प्रसारमाध्यमांशी बोलताना सदाभाउ खोत यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची जोरदार पाठराखण केली. ते म्हणाले, देशातनीट परीक्षेवरून जो काही गोंधळ उभा केला जात आहे, त्यामागे एक मोठे षडयंत्र आहे. या प्रकरणात जे दोषी आहेत त्यांना प्रशासनाने पकडले असून वेगवेगळ्या पातळीवर चौकशी सुरू आहे. दोषींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही, अशी ठाम भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे.




**धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा मुळीच घेउ नये-** सदाभाउ खोत म्हणाले, जे विद्यार्थी नीट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, ते सध्या वैद्यकीय प्रवेशासाठी धावपळ करत आहेत. मात्र, ज्यांचा या संपूर्ण प्रक्रियेशी काहीही संबंध नाही, ते लोक राजकीय हेतूने प्रेरित होउन केंद्रीय शिक्षणमंर्त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. या प्रकरणात धर्मेंद्र प्रधान यांचा थेट कोणताही संबंध नाही, त्यामुळे केंद्र सरकारने त्यांचा राजीनामा मुळीच घेउ नये. या आंदोलनाच्या आडून देशात आणि राज्यात सरकारविरोधात अपप्रचार केला जात असल्याचा दावा सदाभाउ खोत यांनी केला. इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडी केंद्र तसेच राज्यातील महायुती सरकारविरोधात वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते सातत्याने असत्य माहिती पसरवत आहेत असा आरोप सदाभाउ खोत यांनी केला. सोशल मीडियावरील आय लव्ह जयंत पाटील या पेजच्या माध्यमातून या आंदोलनात तेल ओतून आगीत भर घालण्याचा प्रकार सुरू आहे, असा गंभीर आरोप खोत यांनी केला.

# राहुल-प्रियंका,अखिलेश पोलिसांच्या ताब्यात!

## पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन केल्यामुळे कारवाई

### ३ तासांनंतर सुटका



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**दिल्लीत आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईच्या निषेधार्थ काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७, लोककल्याण मार्ग निवासस्थानाबाहेर अचानक ठिय्या आंदोलन सुरू केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. ताज्या माहितीनुसार राहुल गांधी, अखिलेश यादव यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.राहुल गांधी यांच्यासोबत वायनाडच्या खासदार प्रियंका गांधी वाड्रा आणि काँग्रेसचे प्रमुख नेतेही या आंदोलनात सहभागी झाले होते. दुपारी पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर पोहोचल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी थेट रस्त्यावरच ठिय्या मांडला. या वेळी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी केली.

**युवांचे भविष्य उद्ध्वस्त करणा-यांनी राजीनामा द्यावा-**या आंदोलनादरम्यान राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म 'X' वर एक पोस्ट शेअर करत केंद्र सरकारवर तीव्र निशाणा साधला. काल तरु ण विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष कारवाईचे उत्तर मागण्यासाठी आम्ही पंतप्रधानांच्या घरापर्यंत आलो आहोत. देशातील तरु णांचे भविष्य उद्ध्वस्त करणा-या पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, असे राहुल गांधींनी आपल्या पोस्टमध्ये स्पष्ट केले.राहुल गांधी यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पंतप्रधानांचे निवासस्थान हा सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील परिसर मानला जातो. त्यामुळे घटनास्थळी दाखल झालेल्या वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी काँग्रेस नेत्यांना आंदोलन मागे घेण्याची आणि तेथून हटण्याची विनंती करण्यास सुरु वात केली आहे.पंतप्रधान निवासस्थानाबाहेर धरणे आंदोलन सुरू करण्यापूर्वी राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी दिल्लीतील राम मनोहर लोहिया रु ग्णालयाला भेट दिली होती. सोमवारी काकरोच जनता पार्टीच्या (CJP) आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस कारवाईत जखमी झालेल्या कार्यकर्त्यांची आणि विद्यार्थ्यांची त्यांनी रु ग्णालयात जाउन विचारपूस केली.

# आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना ठाकरे गट करणार कायदेशीर मदत

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे बुधवारी दिल्लीत आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांची भेट घेउन त्यांच्याशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती शिवसेना (ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी दिली. त्याचप्रमाणे ज्या आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत तसेच ज्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे त्यांना शिवसेनेकडून (ठाकरे) सर्व कायदेशीर सहकार्य करण्याचे आश्वासन आदित्य ठाकरे यांनी दिले.नीट पेपरफुटी विरोधात जंतरमंतर येथे आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जमध्ये अनेक तरूण विद्यार्थी जखमी झाले आहेत. या विद्यार्थ्यांना उद्धव ठाकरे प्रत्यक्ष भेटून त्यांच्या भूमिका आणि समस्या जाणून घेणार आहेत. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत शिवसेनेने सुरुवातीपासूनच सकारात्मक भूमिका घेतली असून, त्यांच्या न्याय्य मागण्यांना पक्षाचा पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या आंदोलनालाही उद्धव ठाकरे यांनी सर्वप्रथम पाठिंबा जाहीर केला होता. लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनांबाबत शिवसेनेची भूमिका कायम ठाम राहिली असून, त्याच भूमिकेचा भाग म्हणून उद्धव ठाकरे दिल्लीत आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेणार आहेत, असे आदित्य यांनी स्पष्ट केले.

# दिल्ली हायअलर्टवर! शंभू-खनौरी सीमेवर हजारो शेतक-यांचा गराडा

**नवी दिल्ली :** देशाची राजधानी दिल्ली आज पुन्हा एकदा आंदोलनांच्या विळख्यात सापडली आहे. एकीकडे कॉकरोच जनता पार्टी (CJP) ने जंतर-मंतरवर सरकारविरोधात आक्रमक आंदोलन छेडले असून आज दुस-या दिवशी संसदेकडे मोर्चा काढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. तर दुसरीकडे भारत-अमेरिका मुक्तव्यापार करार रद्द करण्याच्या मागणीसाठी पंजाबसह विविध राज्यांतील हजारो शेतकरी दिल्लीकडे कूच करीत आहेत. या दुहेरी आंदोलनामुळे राजधानीत तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. दिल्ली पोलिसांसह केंद्रीय सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सतर्क झाल्या आहेत. आजच्या या दुहेरी आंदोलनामुळे दिल्लीतील वाहतुकीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्तकेली जात असून, परिस्थितीवर केंद्र सरकार आणि प्रशासनाचे बारकाईने लक्ष आहे. सोमवारी आंदोलनादरम्यान झालेल्या गोंधळ आणि पोलिस कारवाईनंतरही क्रुद्ध समर्थकांनी माघार घेण्यास नकार दिला आहे. आजही मोठ्या संख्येने कार्यकर्ते जंतर-मंतर येथे एकत्र जमले आहेत. आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की आहे की 'आमच्या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील. आज संसद मार्चही काढण्यात येईल.'। त्यामुळे जंतर-मंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# रशियाचा जहाजावर हल्ला, 4 भारतीय ठार

**मॉस्को /वृत्तसंस्था :** युक्रेनच्या किना-याजवळ एका व्यापारी जहाजावर रशियाने हल्ला केला. यात चार भारतीयांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर केंद्र सरकारने मंगळवारी भारतातील रशियाच्या राजदूतांना बोलावून तीव्र निषेध नोंदवला. भारताने या हल्ल्याला निंदनीय म्हटले असून आपल्या नागरिकांच्या मृत्यूसाठी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने नवी दिल्लीतील रशियन प्रभारी राजदूत व्लादिमीर लदानोव्ह यांना बोलावून या घटनेबाबत भारताचा तीव्र आक्षेप नोंदवला आणि स्पष्टीकरण मागितले आहे. युक्रेनच्या किना-यावर व्यापारी जहाजावर क्रु मेंबर्स म्हणून काम करत असताना या चार भारतीयांचा मृत्यू झाला. दोन देशांमधील युद्ध सुरूच असताना युक्रेनच्या अधिका-यांनी या हल्ल्यासाठी रशियाला जबाबदार धरले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताने रशियाला चिंता कळवली आहे आणि या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.







# ४८ कोटींच्या दंड वसुलीत 'संरक्षण कवच'

## महसूल अधिकाऱ्यांकडून दंडग्रस्त चांडक यांना वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न?

### कागदोपत्री कारवाईचा देखावा करून वरिष्ठांची दिशाभूल, - बोजा चढला तरी निलामीचा पत्ता नाही - २५ टक्के रक्कम जमा करण्याच्या नियमाचा विपर्यास?

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील कथित अतिरिक्त गौण खनिज उत्खनन प्रकरणात ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावूनही शासनाच्या तिजोरीत आजपर्यंत एक रुपयाही जमा न होणे, महसूल प्रशासनाकडून सातत्याने होत असलेली दिरंगाई, कागदोपत्री कारवाईचा निर्माण केलेला देखावा आणि त्या आड वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महसूल मंत्रालयाची होत असल्याची चर्चा असलेली दिशाभूल यामुळे संपूर्ण प्रकरण अधिकच संशयास्पद बनले आहे. आता महसूल विभागातील काही अधिकारी संबंधित दंडग्रस्तांना वाचविण्यासाठीच शर्थीचे प्रयत्न करीत आहेत का, अशी चर्चा जिल्ह्यात रंगू लागली आहे.

या प्रकरणात सुरुवातीला ६४ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. त्यानंतर पुनर्मोजणीनंतर तो ४८ कोटींवर आला. मात्र तब्बल १६ कोटी रुपयांची कपात नेमक्या कोणत्या आधारावर झाली, याबाबत महसूल विभागाने स्वतंत्र भूमिका घेतल्याचे दिसून आले नाही. त्यानंतरही दंडाविरोधात न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाली. उच्च न्यायालयाने संबंधित प्राधिकरणाकडे अपील करण्याचा मार्ग खुला करून दिला; मात्र दंड वसुलीला स्थगिती दिल्याचे स्पष्ट आदेश नसल्याची चर्चा असतानाही महसूल प्रशासनाने प्रत्यक्ष वसुलीची गती जवळपास थांबविल्याचे चित्र आहे.

याच ठिकाणी सर्वाधिक प्रश्न उपस्थित होत आहेत. शासनाच्या गौण खनिजविषयक निर्णयानुसार दंडाविरोधातील अपील दाखल करताना किमान २५ टक्के दंडरक्कम जमा करण्याची अट असल्याचा उल्लेख केला जातो. मात्र या




तरतुदीचा विपर्यास करून जणू दंड वसुलीवरच स्थगिती असल्याप्रमाणे भूमिका घेतली जात असल्याची चर्चा आहे. संबंधित अपील कोणत्या अटींवर स्वीकारण्यात आले, आवश्यक रक्कम प्रत्यक्षात जमा झाली होती का, याबाबत महसूल प्रशासनाने अधिकृत खुलासा करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे या अपीलवर नियमित सुनावण्या सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे न्यायप्रक्रियेच्या नावाखाली संबंधित दंडग्रस्तांना प्रत्यक्षात संरक्षण मिळत आहे का, अशी शंका व्यक्त केली जात आहे. कायदेशीर प्रक्रिया सुरू असली तरी शासनाच्या महसुलाच्या संरक्षणासाठी उपलब्ध उपाययोजना राबविण्यात प्रशासन कितपत तत्पर आहे, हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाबाबत अहवाल मागविल्यानंतर अकोटच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या उत्तरातूनच अनेक नवीन प्रश्न निर्माण होत असल्याची चर्चा आहे. प्रत्यक्ष कारवाईपेक्षा कागदोपत्री हालचाली दाखवून वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्यात आली का, अशीही चर्चा महसूल वर्तुळात सुरू आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशांनंतरही प्रत्यक्ष वसुली मात्र पुढे सरकत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय अधिक गडद होत आहे.

या संपूर्ण प्रकरणात आणखी एक गंभीर बाब म्हणजे संबंधित भाडेपट्टाधारकाचे दोन्ही स्टोन क्रशर आदिवासी बांधवांच्या जमिनीवर सुरू असल्याची चर्चा आहे. या जमिनीवर उद्योग सुरू करण्यापूर्वी जिल्हाधिकारी अथवा राज्य शासनाची आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. उपलब्ध माहितीनुसार केवळ नोंदणीकृत भाडेपट्टा आणि बाँडच्या आधारे करार करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. या बाबींची माहिती सार्वजनिक चर्चेत असतानाही, 'तक्रार द्या, माहिती नाही,' अशा आशयाची प्रतिक्रिया संबंधित अधिकाऱ्यांकडून व्यक्त झाल्याची चर्चा असून त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दुसरीकडे, दंड वसुलीच्या प्रक्रियेत सुरुवातीला संबंधितांच्या मालमत्ता महसूल विभागाला सापडत नसल्याचे सांगितले जात होते. मात्र त्याच मालमत्तांचे तपशील वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यानंतर त्या अचानक सापडल्या आणि सातबाऱ्यावर दंडाचा बोजा चढविण्यात आल्याचे समोर आले. त्यामुळे सुरुवातीला प्रशासनाला ही माहिती खरोखरच उपलब्ध नव्हती की कारवाई जाणीवपूर्वक टाळण्यात आली, अशी चर्चा रंगू लागली आहे.

इतकेच नव्हे तर, उपलब्ध माहितीनुसार काही मालमत्तांवर बोजा चढविण्यात आला असला तरी संबंधितांच्या हिवरखेड रोडवरील निवासस्थानासह अकोट-अकोला मार्गावरील अन्य मालमत्तांबाबत अद्याप अशी कारवाई झालेली नसल्याचा दावा केला जात आहे. जर हा दावा वस्तुस्थितीवर आधारित असेल, तर दंड वसुलीच्या प्रक्रियेत सर्व मालमत्तांचा समान निकषाने विचार झाला का, असा प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर महसूल विभाग संबंधितांना वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याची चर्चा अधिकच जोर धरत आहे. दरम्यान, समपहरणाची नोटीस, सातबाऱ्यावरील बोजा आणि इतर महसुली प्रक्रिया पूर्ण झाल्याचे सांगितले जात असतानाही मालमत्ता जप्ती व लिलावाचा पुढील टप्पा अद्याप सुरू झालेला नाही. त्यामुळे ४८ कोटी रुपयांच्या दंडाची प्रत्यक्ष वसुली नेमकी कधी होणार, याबाबत नागरिकांमध्ये तीव्र उत्सुकता निर्माण झाली आहे. एकूणच, दंड वसुलीतील विलंब, अपील प्रक्रियेभोवती निर्माण झालेले प्रश्न, महसूल विभागाची संथ भूमिका, आदिवासी जमिनीवरील उद्योगांबाबतची कारवाई आणि मालमत्तांवरील अपूर्ण बोजा या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी होऊन वस्तुस्थिती समोर यावी, अशी मागणी आता अधिक जोरकस होत आहे.

### महसूल उपजिल्हाधिकारी खेमणार यांचेही जबाबदारी पासून पलायन

आदिवासी बांधवांच्या जमिनीवर स्टोन क्रशर व विविध उद्योग धंदे अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथे उभारण्यात आले असल्याबाबत महसूलचे उपजिल्हाधिकारी खेमणार यांच्याशी चर्चा केली असता आपल्याला याबाबत काही माहिती नाही, तक्रार आल्यास कारवाई करू, बघू अशी उदासीन प्रतिक्रिया देत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून याप्रकरणात करण्यात आला.

### आदिवासी जमिनीच्या संरक्षणाबाबत प्रशासन किती गंभीर?

मौजे गाजीपूर येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या गट क्रमांक २७ व ३८ संदर्भात यापूर्वीच शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय नोंदणीकृत भाडेपट्टा झाल्याची नोंद अधिकृत कागदपत्रांत असल्याची चर्चा आहे. त्यानंतरही या व्यवहाराची सखोल चौकशी, जमिनीची मोजणी आणि जबाबदाऱ्या निश्चित करण्याची प्रक्रिया अपेक्षित वेगाने झालेली दिसत नाही. विशेष म्हणजे, याच परिसरातील आदिवासी बांधव अंबादास पवार यांच्या गट नंबर ३७ या जमिनीवरही स्टोन क्रशर सुरू असल्याचा दावा केला जात आहे. या सर्व घडामोडींमुळे आदिवासी जमिनींचे संरक्षण करण्याबाबत महसूल प्रशासनाची भूमिका नेमकी काय, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# जनसेवा सप्ताहात गुणवंतांचा गौरव; 'ग्रीन अमरावती'साठी २५ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प




## स्व. अजितदादा पवार जयंतीनिमित्त २२ ते २७ जुलैदरम्यान विविध लोकोपयोगी उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-**

लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे २२ ते २७ जुलैदरम्यान 'जनसेवा सप्ताह' साजरा करण्यात येणार असून, या कालावधीत विविध सामाजिक, पर्यावरणपूरक आणि सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत २६ जुलै रोजी दहावी-बारावी परीक्षेत ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तसेच आमदार सुलभा खोडके यांच्या संकल्पनेतून 'ग्रीन अमरावती' अभियानांतर्गत शहरात २५ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला आहे.

ही माहिती शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके यांनी सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यंदा स्व. अजितदादा पवार यांची जयंती 'समर्पण, सेवा आणि संकल्प' या संकल्पनेवर आधारित साजरी होत आहे. पर्यावरण संवर्धनासाठी 'ग्रीन अमरावती' उपक्रमांतर्गत २२ जुलै रोजी शासकीय आयटीआय परिसरातून वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ होणार असून, जनसेवा सप्ताहात शहरभर २५ हजार वृक्ष लागवडीचे अभियान राबविण्यात येणार आहे.

रविवार, २६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता मोर्शी रोडवरील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेला मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, शहराध्यक्ष प्रशांत डवरे, माजी महापौर ॲड. किशोर शेळके, महिला व बालकल्याण सभापती ममताताई आवारे, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### पॅसेंजर ऑटोला भरधाव आयशर

प्रवाशांना जबर मार बसला. त्यापैकी एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. आयशर ट्रक भरधाव वेगाने येत असताना हिवरखेड येथील बस थांब्यावर उभ्या असलेल्या मोटर सायकलला देखील धडक मारली. त्यामुळे टू व्हीलर वाहनाचे सुद्धा नुकसान झाले.मृतक महिलेचे नाव शितल रवींद्र ताथोडे (वय ३५ वर्ष रा. बेलोरा) असे आहे.

मोर्शी लगतच असलेल्या तळणी येथील प्रवासी वाहतूक करणारा ऑटो क्रमांक एम एस २७ बीडब्ल्यू ८९५९ मध्ये मृतक शितल रवींद्र ताथोडे (वय ३५ रा.बेलोरा(लोणी) तालुका वरुड) ,आबाराव पुंडलिकराव ताथोडे (वय ६९ रा.बेलोरा), श्लोक रवींद्र ताथोडे (वय १३ रा.बेलोरा), प्रज्वल मदन तिडके (वय २३ रा.तळणी),आकाश शेषराव भलावी (वय ३२ रा. तळणी),इरफान पठाण (वय ३० वर्ष रा.तळणी) हे सहा पॅसेंजर तळणी येथून मोर्शी मार्गे हिवरखेड येथून बेलोराकडे जात होते. दरम्यान वरुड येथून हिवरखेड मार्गे मोर्शीकडे भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर ट्रक क्रमांक एमएच २८ एबी २७२० ने जोरदार धडक दिली. दरम्यान लगेच उपजिल्हा रुग्णालयाच्या ॲम्बुलन्स व खाजगी वाहनाद्वारे अपघातग्रस्त रुग्णांना उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे भरती करण्यात आले. त्यापैकी जीवन-मृत्यूशी झुंज देणाऱ्या पाच गंभीर रुग्णांना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय येथे हलविण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली एक पोलीस पथक घटनास्थळी दाखल होऊन ट्रक चालकास ताब्यात घेण्यात आले. भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर ट्रकने हिवरखेड बस थांब्यासमोर असलेल्या स्पीड ब्रेकर्स वरून सुद्धा वेग कमी केला नसल्याने तेथील उभ्या असलेल्या चार ते पाच टू व्हीलरला धडक देऊन नुकसान केल्याची माहिती ओह. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

### आफाक शेख हत्याकांडाचा मुख्य

राजेंद्र कॉलनी येथे आफाक शेखवर हल्लेखोरांनी हल्ला केला होता. त्यावेळी त्याच्या उजव्या हाताचा पंजा तिथेच कटून पडला होता आणि गळा धारदार शस्त्राने कापण्यात आला होता. या हत्याकांडानंतर सर्व आरोपी फरार झाले होते. पोलिसांनी सुरुवातीला दोन अल्पवयींनासह तीन आरोपींना अटक केली होती. मुख्य आरोपी फरार होता. त्यालाही आता पकडण्यात आले. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत अनेक पुरावे गोळा केले आहेत. हत्येत सहभागी इतर आरोपींचा शोध सुरू आहे. जर इतर कोणाचा सहभाग आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असे फ्रेजरपुरा पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणात सायबर पोलिसांनी देखील कारवाई केली आहे. आरोपींशी संबंधित ३ इंस्टाग्राम अकाउंट बंद करण्यात आले आहेत. तसेच आरोपींच्या नावाने असलेली आर. के. कंपनी, पीसी कंपनी आणि अमरावती वॉरदात कंपनी ही इंस्टाग्राम अकाउंट्सही बंद करण्यात आली आहेत. सोशल मीडियावर द्वेष पसरवणाऱ्या पोस्टवरही पोलिसांची नजर आहे.

### आरोपी दत्तगिरी महाराजांचे

अनेक नेते दिसत आहे. दरम्यान, पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारीनुसार, पीडित महिलेची २०१४ मध्ये धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने आरोपीशी ओळख झाली. त्यानंतर २०१६ पासून तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार लैंगिक अत्याचार, मारहाण व धमक्या दिल्याचा आरोप तिने केला आहे. तक्रारीत लग्नानंतर पतीपासून घटस्फोट घेण्यासाठी दबाव टाकण्यात आला आणि मठात नेऊन अत्याचार करण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीच्या आधारे चांदूर रेल्वे पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यासह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात आता सोशल मीडियावरील छायाचित्रांमुळे चर्चेला अधिक उधाण आले आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या व्यासपीठावरील छायाचित्रांसह, दोन वर्षांपूर्वी खासदार अनिल बोडे यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचे फोटोही समोर आले आहेत. तसेच अमरावती जिल्ह्यातील काही लोकप्रतिनिधींसोबतचे फोटोही दिसून आहेत. मागिल काही वर्षात जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी, नेते सदर मठात सुध्दा येऊन गेल्याची चर्चा शहरात आहे. या फोटोंमुळे शहरात विविध चर्चांना उधान आले आहे.

### ट्रकच्या धडकेत एसटी चालकाचा

कोसळला आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन लहान मुले, बहीण व विवाहित भाऊ असा परिवार आहे. या प्रकरणी वलगाव पोलिसांनी अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, पुढील तपास सुरू आहे.

### शासकीय योजनेतील 'विहीर

ग्रामरोजगार सेवकापासून ते गटविकास अधिकारी स्तरावरील अधिकाऱ्यांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शासकीय नोंदींनुसार निधी मंजूर झाला असला,तरी प्रत्यक्षात काम झाले आहे की नाही, याची स्थळ पाहणी करून पडताळणी करण्यात यावी. तसेच निधीचा गैरवापर झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी प्रकाश साबळे यांनी प्रशासनावर टीका करताना, महिला शेतकऱ्यांच्या सन्मानासाठी शासनाकडून विविध धोरणे जाहीर केली जात असली, तरी प्रत्यक्षात प्रशासन शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत उदासीन असल्याचा आरोप केला. महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्याचे शासनाचे धोरण असतानाही जिल्हा प्रशासन या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रकाश साबळे, सुनील राणा आणि बंडू डुकरे यांनी पुढाकार घेऊन त्यांच्या माध्यमातून संबंधित शेतकऱ्यांच्या अडचणी प्रशासनासमोर मांडण्यात आल्या. दरम्यान, या घटनेमुळे 'जाऊ तेथे खाऊ' या मराठी चित्रपटातील विहीर चोरीच्या कथानकाची आठवण होत असल्याची प्रतिक्रिया काही उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी गजानन समरीत, सागर महल्ले, किरण महल्ले, अक्षय समरीत, मंगेश लुंगे, लक्ष्मणराव डुकरे यांच्यासह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

### पंचायत समितीचा मुख्य दरवाजा

बांधव आणि विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते. मात्र मुख्य गेटवरच चारचाकी वाहन आडवे लावलेले असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून दोन्ही बाजूने वाट काढत आत प्रवेश करावा लागतो.विशेष बाब म्हणजे कार्यालय परिसरात वाहनतळासाठी मुबलक जागा उपलब्ध आहे. तरीही मुख्य प्रवेशद्वारच पार्किंगसाठी वापरले जात असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, अग्निशमन दल किंवा गर्दीच्या वेळी नागरिकांना बाहेर पडण्यासाठी मुख्य दरवाजा मोकळा असणे अत्यंत आवश्यक असते. मात्र याच ठिकाणी वाहन उभे राहत असल्याने सुरक्षेचा नियमच धाब्यावर बसवला गेला आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. 'नियम फक्त जनतेसाठी आणि अपवाद अधिकाऱ्यांसाठी का?' असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.या संदर्भात प्रभारी गटविकास अधिकारी नवनाथ धापके यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, 'सदर शासकीय वाहनास कायमस्वरूपी चालक उपलब्ध नसल्यामुळे ते नियमित वापरात नसून एकाच ठिकाणी उभे करण्यात आलेले आहे. तसेच सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने वाहनाचे संरक्षण व सुरक्षिततेच्या दृष्टीने ते त्याच ठिकाणी उभे ठेवण्यात आले आहे. मात्र हे स्पष्टीकरण नागरिकांच्या अडचणीवर पडदा टाकणारे असल्याची चर्चा आहे. वाहनाचे संरक्षण महत्त्वाचे की जनतेची सोय महत्त्वाची, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे, अशी मागणी होत आहे. अंजनगाव सुर्जी पंचायत समिती येथे प्रशासकीय राजवट असल्याने मनमानी पद्धत चालू आहे. येथील प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणाचेही नियंत्रण नसल्याने असे होत.

-निलेश देशमुख,युवा स्वाभिमान पदाधिकारी

### विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ

कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांवरील दडपशाहीचा निषेध व्यक्त केला.

युवक काँग्रेसने आरोप केला की, देशातील तरुणाईच्या प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी सरकार दडपशाहीचा मार्ग अवलंबत आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रत्येक प्रयत्न लोकशाही मूल्यांवर आघात करणारा असून, अशा कृतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र युवक काँग्रेस विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी कायम त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, बडनेरा विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष आशिष यादव, राहुल साबळे, राहुल बागडे, संकेत साहू, अक्षय साबळे, प्रियाल मोहोड, अनय वाटाणे, रोशन इंगळे, अंकुश टोपले, आकाश धुराटकर, धनंजय बोबडे, अभिनव देशमुख, साहिल वानरे, अभिषेक भोसले, निशांत पवार, सम्यक वाकोडे, विवेक तायडे, ओम कुबडे, अभिषेक सवाई व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### पहिल्याच पावसात गायवाडी पानंद

कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. आवश्यक त्या ठिकाणी पाण्याच्या वाहतुकीसाठी नाले, पाइप किंवा संरक्षण भिंती उभारण्यात आल्या नसल्याने पावसाच्या पाण्याच्या जोरदार प्रवाहात संपूर्ण रस्ता वाहून गेला. यावरून संबंधित विभागाने कोणतेही तांत्रिक नियोजन न करता काम उरकून घेतल्याचा आरोप होत आहे.

ग्रामस्थांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर आणि दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच रस्त्याचे तातडीने दर्जेदार पुनरबांधकाम करून शेतकऱ्यांना सुरक्षित व कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

एकाच विभागाच्या दोन अधिकाऱ्यांच्या परस्परविरोधी प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. कनिष्ठ अभियंता म्हणतात 'शेतकऱ्यांनी रस्ता फोडला', तर उपकार्यकारी अभियंता सांगतात जेसीबीने खड्डा आम्हीच केला'; यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आहे.

### डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा

साठीच करता येणार असून, शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय जागेची विक्री, हस्तांतरण, गहाण किंवा भाडेपट्ट्याने देणे शक्य होणार नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक नियोजन प्राधिकरणाच्या सर्व विकास नियंत्रण नियमांचे पालन संस्थेला बंधनकारक राहणार आहे.

याबाबत महसूल मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की,शिक्षण, वाचन आणि ज्ञानसंस्कृतीचा प्रसार हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. धारणीसारख्या दुर्गम भागात सार्वजनिक वाचनालयाची उभारणी होणे ही नव्या पिढीच्या उज्ज्वल भविष्यातील गुंतवणूक आहे. या निर्णयामुळे विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक तसेच सर्वसामान्य वाचकांना दर्जेदार वाचन सुविधा उपलब्ध होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील दुर्गम भागातही शिक्षण आणि ज्ञानाच्या संधी समानपणे उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असून, हा निर्णय त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.'

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची पालखी

रवाना झाली. सकाळी सामुदायिक ध्यानानंतर राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या महासमाधीला नमन करून व महाआरती नंतर पालखी प्रचार यात्रेचे प्रस्थान झाले. यावेळी अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचे सर्वाधिकारी प्रकाश वाघ, उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, सरचिटणीस पद्मश्री जनार्दनपंत बोथे, प्रचार प्रमुख गोपाल कडू, आध्यात्म विभाग प्रमुख डॉ. राजाराम बोथे, कार्यकारिणी सदस्य दामोदर पाटील, विलास साबळे, डॉ. ज्ञानेश्वर मुडे, लक्ष्मणदास काळे, प्रकाश तारेकर, नीलेश गावंडे, कार्यकारिणी सदस्य गणेशराव जवंजाळ, डॉ.जनसेवक जयस्वाल,सुहास टप्पे,गणेश घाटोळ, रायजीप्रभू शेलोटकर, श्रीगुरुदेव महिला मंडळ व तसेच गुरुदेव प्रचारक उपस्थित होते.

### ब्रेकअप नंतर तरुणीला पाठवले

३-४ वेळा फोनवर बोलायचे. मात्र २०२४ मध्ये दोघांचे विचार न जुळल्याने तरुणीने ब्रेकअप केले. तरीही हर्षवर्धनने तिचा पाठलाग करणे थांबवले नाही. कॉलेजला जातानाही तो तिचा पाठलाग करायचा. तरुणीने त्याला समजावूनही सांगितले, पण तो ऐकत नव्हता. ब्रेकअप नंतर ही तरुणी त्याच्यासोबत बोलली पाहिजे असे त्याचे म्हणणे होते. पिडितेने त्याच्याशी बोलणे टाळल्याने हर्षवर्धन चिडला आणि त्याने तिच्या मोबाईलवर अश्लील व्हिडिओ पाठवले. तसेच तिच्या आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिली. यामुळे घाबरलेल्या पिडितेने पोलीस ठाण्यात धाव घेतली. पीडितेच्या तक्रारी वरून फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपी हर्षवर्धन विरुद्ध कलम ७८ बीएनएस आणि आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.


## जाहीरनामा/सायटेशन

**अमरावती येथील १४ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) श्रीमती आर.एच.झा मॅडम यांच्या न्यायालयातील**

आर.एम.जे.सी. १२७५/२०२६ ने.ता.२०.०८.२०२६

**Varsha Ritesh Laddha+4** ... अर्जदार ... विरुध्द ... **Nil**... गैरअर्जदार

बनाम : सर्वत्र लोकांना

अर्जदार :
1. Sau. Varsha W/o. Ritesh Laddha, Age 50 Yrs. Occu.: Household R/o.Sarafa Line, Shambhaji Nagar, Buldhana, Tq. & Dist. Amravati
2. Shri. Bhojraj S/o. Shrikisanji Rathi, Age 59 Yrs. Occu.: Business
3. Shri Nandkishor S/o. Shrikisan Rathi, Age 56 Yrs. Occu.: Business
4. Shri. Jitmal S/o. Shrikisandas Rathi, Age 55 Yrs. Occu.: Business R/o. No. 2 to 4 residing at - New Krushnarpan Colony, Sai Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
5. Shri Anand @ Balkisan S/o. Shrikisandas Rathi, Age 53 Yrs. Occu.: Business R/o.Rathi Complex, Bapat Chowk, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, मयत Shri Shrikisandas S/o. Nathmalji Rathi हे 25.09.2009 रोजी Tq. & Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार Sau.Varsha Ritesh Laddha रा.वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत Shri. Shrikisandas S/o. Nathmalji Rathi यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATON UNDER SECTION 276 OF INDIAN SUCCESSION ACT, 1925 FOR GRANT OF PROBATE OF WILL OF DECEASED NAMDEO TUKARAMJI BELSARE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याप्रमाणे मयत यांच्या नावे असलेली सर्व मालमत्ता मृत्यूप्रमाणे अर्जदार यांचे नावे करण्याकरिता मय्यत Shri. Shrikisandas S/o. Nathmalji Rathi नी दि.२७.०६.२००० रोजी मृत्यूपत्र करून ठेवले आहे.

**Description of Property**

**1.** Within the local limits of Amravati Municipal Corporation Amravati and within the Jurisdiction of Sub-Registrar, Amravati, Mouje- Amravati Peth, Tq. & Dist. Amravati Sheet No. 68-D, Plot No. 56 & 57 total admeasuring 259.20 sq. mtrs. the property situated on the main road and area known as Bapat Chowk, the three storied old Building constructed from and lime, under which there was 1/4 undivided share of deceased shrikisandas S/o. Nathmalji Rathi as per the partition deed, the four corners of the said property are as follow. bounded as under :-

Towards East - The property of other
Towards West - Galli & Service lane
Towards North - Property of Mr. Jaiswal
Towards South - Main Road

**2.** Within the local limits of Zilla Parishad, Amravati and within the Jurisdiction of Sub-Registrar, Chandur Bazar, Mouje- Chandur Bazar, Tq. Chandur Bazar Dist. Amravati field survey No. 76/1 and field survey No.80/1 total admeasuring 2 Acer 5 R. area of land which is layout converted as per the order passed by Additional Collector, Amravati having a sanctioned map and on this plot the one talkies and one old construed house are situate and the is open space. That, New Plot No. 76/1/B admeasuring 0.33 R and 80/1/B admeasuring 0.26 R total admeasuring of both the plots are 0.55 R, the four corners of the said immovable properties are as follow:-

Towards East - Jameer Colony
Towards West - Wall of Water Supply Department
Towards North - field of other
Towards South - field of other

त्यापेक्षा अर्जाबाबत कोणास आक्षेप नोंदवायचा असेल तर हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत त्याने या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदहू मय्यत **Shri. Shrikisandas S/o. Nathmalji Rathi** यांचे वारसा हक्काचे **(Probate)** प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १८.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय (व-स्तर),अमरावती**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २२ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मौन की मजबुरी? की उत्तरांची भीती?
# अकोटकरांचा नगराध्यक्षा माया धुळे यांना थेट सवाल!

## २.०७ कोटींच्या बायोमायनिंगवर प्रश्नांचा पाऊस ; पण नगराध्यक्षा अजूनही गप्प...

## प्रशासनावर धाक नाही की मौनालाच पसंती ?

■ ॲड. समीर ठाकूर ■

*अकोट : अकोट नगर परिषदेच्या २ कोटी ७ लाख रुपयांच्या बायोमायनिंग प्रकल्पावर निर्माण झालेल्या प्रश्नांचे वादळ दिवसेंदिवस अधिक तीव्र होत असताना आता नागरिकांच्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे तो म्हणजे नगराध्यक्षा माया धुळे यांचे कायमचे मौन. कोट्यवधी रुपयांच्या सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या या प्रकल्पाबाबत गंभीर तांत्रिक प्रश्न उपस्थित होत आहेत, कागदपत्रांची मागणी होत आहे, पारदर्शकतेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे; मात्र नगर परिषदेच्या प्रमुख लोकप्रतिनिधी असलेल्या लोकनियुक्त माया धुळे यांच्याकडून अद्याप एकही अधिकृत खुलासा समोर आलेला नाही.*


संग्रहित छायाचित्र

प्रशासनाने ३७ हजार ८०२ मेट्रिक टन लिगसी वेस्टवर बायोमायनिंग प्रक्रिया पूर्ण झाल्याचा दावा केला आहे. मात्र या दाव्याशी संबंधित अनेक प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणातील कचऱ्याचे मोजमाप कसे झाले? आरडीएफ किती तयार झाला? तो कुठे गेला? लिचेटवर प्रक्रिया झाली का? स्क्रीनिंग मशीनची क्षमता किती होती? एवढ्या कमी कालावधीत काम पूर्ण कसे झाले? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत. परंतु या प्रश्नांवर नगराध्यक्षा धुळे यांच्याकडून मौनच कायम असल्याचे चित्र आहे.

नगराध्यक्षा या केवळ उद्घाटन, भूमिपूजन करणारे सन्मानाचे पद नसून त्या नगर परिषदेच्या निवडून आलेल्या प्रमुख लोकप्रतिनिधी आहेत. नगर परिषदेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, प्रशासनाला जाब विचारणे, सार्वजनिक निधीचा योग्य वापर झाला की नाही याची खात्री करणे आणि आवश्यकतेनुसार नागरिकांसमोर वस्तुस्थिती मांडणे ही त्यांच्या पदाची मूलभूत जबाबदारी मानली जाते. अशा परिस्थितीत एवढ्या मोठ्या प्रकल्पावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना त्यांनी प्रशासनाकडून अधिकृत खुलासा मागितल्याचे किंवा जनतेसमोर ठाम भूमिका घेतल्याचे अद्याप समोर आलेले नाही.

यामुळे आता शहरात थेट प्रश्न विचारले जात आहेत. प्रशासन सर्व काही नियमानुसार असल्याचा दावा करत असेल, तर नगराध्यक्षा कागदपत्रे सार्वजनिक करण्याची मागणी का करत नाहीत? नगर परिषदेची विशेष बैठक बोलावून हा विषय चर्चेला का आणला जात नाही? तांत्रिक समिती किंवा तृतीय पक्ष तपासणीची मागणी का होत नाही? याच कारणामुळे अकोटमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. नगराध्यक्षा यांच्या मौनामुळे संशय अधिक गडद होत असल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करीत आहेत. काही स्तरावर विविध तर्कवितर्क मांडले जात असले, तरी त्यांना कोणताही अधिकृत आधार उपलब्ध नाही. त्यामुळे या सर्व चर्चांना पूर्णविराम देण्याची जबाबदारी आता स्वतः नगराध्यक्षा धुळे यांच्यावरच असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### नगराध्यक्षा की केवळ औपचारिक पदाधिकारी?



नगराध्यक्षपद हे केवळ उद्घाटने, सत्कार आणि कार्यक्रमांपुरते मर्यादित नसते. कोट्यवधी रुपयांच्या सार्वजनिक निधीचा वापर झाल्यानंतर प्रत्येक रुपयाचा हिशेब जनतेसमोर मांडण्याची जबाबदारीही त्याच पदावर असते. अशा परिस्थितीत नगराध्यक्षा धुळे यांनी प्रशासनाकडून संपूर्ण अहवाल मागवून तो नागरिकांसमोर ठेवणे अपेक्षित होते. मात्र तसे घडल्याचे अद्याप दिसत नसल्याने 'नगर परिषद प्रशासन चालवते की लोकप्रतिनिधी?' हा प्रश्नही उपस्थित होऊ लागला आहे.

एक लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या अकोट शहरातील मतदारांनी नगराध्यक्षा पदावर विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे सार्वजनिक पैशातून राबविण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पावर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर लोकप्रतिनिधींनी मौन बाळगणे योग्य नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. 'जनतेने विश्वास दिला उत्तरदायित्वासाठी; मौनासाठी नव्हे,' अशी भावना आता उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे. दरम्यान, या प्रकरणातील कचऱ्याचे मोजमाप, आरडीएफची निर्मिती व विल्हेवाट, वाहतूक नोंदी, ई-वे बिल, मशीनची क्षमता, मजुरांच्या उपस्थिती नोंदी, पीएफ-ईएसआयसी तपशील, पर्यावरणीय अहवाल आणि तृतीय पक्ष तांत्रिक तपासणी अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी अधिक जोर धरत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, ही कागदपत्रे एकदाच जनतेसमोर ठेवली तर बहुतांश प्रश्न आपोआप संपुष्टात येतील. परंतु तोपर्यंत एक प्रश्न मात्र कायम राहणार आहे तो म्हणजे 'नगराध्यक्षा माया धुळे यांचे मौन हे केवळ राजकीय संयम आहे, की नागरिकांच्या प्रश्नांपासून दूर राहण्याची भूमिका?'

### एक लाख लोकांच्या विश्वासावर परिणाम?

अकोट शहराची सध्याची लोकसंख्या ही एक लाखांहून अधिक आहे. यामधील मतदारांनी नगराध्यक्षा पदावर विश्वास ठेवून मतदान करीत आपल्या नगराध्यक्षा म्हणून माया धुळे यांना निवडून दिले. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या सार्वजनिक प्रकल्पावर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर लोकप्रतिनिधींनी मौन बाळगणे योग्य नसल्याची भावना शहरातील सुज्ञ नागरिक व्यक्त करीत आहे. काही नागरिकांचे मत आहे की, मौनामुळे वस्तुस्थितीपेक्षा संशय अधिक वेगाने पसरतो. त्यामुळे नगराध्यक्षा धुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन किंवा अधिकृत निवेदनाद्वारे सर्व शंकांचे निरसन करावे, आणि जनतेच्या मनातील शंका, कुशंका दूर कराव्यात.

अकोटकरांना आता आरोप नकोत, अफवा नकोत, तर अधिकृत उत्तर हवे आहे. कारण प्रश्न हा केवळ बायोमायनिंगचा नाही, तर जनतेच्या पैशाचा, लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा आणि नागरिकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या विश्वासार्हतेचाही आहे.

**(कायदेशीर सूचना)**

या वृत्तातील सर्व मुद्दे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर, उपलब्ध कागदपत्रे, संबंधित विभागाकडून प्राप्त माहिती, अधिकृत खुलाशाचा अभाव आणि स्थानिक स्तरावर व्यक्त होत असलेल्या मतांवर आधारित आहेत. या वृत्तातून कोणत्याही व्यक्ती, लोकप्रतिनिधी, अधिकारी किंवा कंत्राटदार यांच्याविरुद्ध गैरव्यवहार सिद्ध झाल्याचा दावा करण्यात आलेला नाही. संबंधित सर्व पक्षांना त्यांची अधिकृत भूमिका मांडण्याचा पूर्ण अधिकार असून ती प्राप्त झाल्यास त्याच प्राधान्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कारंज्यात 'महसूल समाधान शिबिर'

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त कारंजा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सई डहाके यांच्या अध्यक्षतेखाली महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर बुधवार, दि. २२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता शेतकरी भवन, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर, मंगरूळपीर रोड, कारंजा येथे होणार आहे.

या शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या सेवा व योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सातबारा उतारा, फेरफार नोंदी, ८-अ उतारे, सामंजस्याने शेतवहिवाटीचे रस्ते उपलब्ध करून दिलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण, शेतकरी प्रमाणपत्र, ॲग्रीस्टॅक नोंदणी, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची नोंदणी, ई-शिधापत्रिका, आभा कार्ड, स्वामित्व सनद, विद्यार्थ्यांसाठी विविध दाखल्यांचे वितरण आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

याशिवाय आरोग्य तपासणी, रक्तदान व रक्त तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती, पात्र लाभार्थ्यांना लाभांचे वितरण तसेच विविध योजनांबाबत नागरिकांना मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. या शिबिराचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कारंजा तहसील प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## सोमानी दाम्पत्यांना प्रतिष्ठेचा विदर्भ भूषण पुरस्कार प्रदान

■ प्रतिनिधी | वाशिम ■



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई च्या वतीने अकोला येथे राज्यस्तरीय पत्रकारिता अधिवेशन यशस्वीरित्या पार पडले.

या अधिवेशनामध्ये प्रथमच विदर्भाला वाशीम येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी यांना प्रदेशाध्यक्ष पद मिळाल्याने व सामाजिक कार्यातील योगदान याबद्दल त्यांच्या सोबत खांद्याला खांदा लावून साथ देणारी सो भारती निलेश सोमानी या समाजसेवी दाम्पत्यांना प्रतिष्ठेचा विदर्भभूषण पुरस्कार देऊन प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे प्रदेश उपाध्यक्ष प्राध्यापक महेश पानसे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे , अनुप भार्गव, विभागीय अध्यक्ष सुनील फुलारी, अकोला जिल्हाध्यक्ष गणेश सुरजूसे, ग्रामीण पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गजानन वाघमारे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह बुका शाल व भेटवस्तू देऊ सन्मानित करण्यात आले. यावेळी निलेश सोमानी यांनी हा सन्मान संपूर्ण विदर्भाचा व पत्रकारितेमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

## जागतिक न्याय दिनानिमित्त विधी क्षेत्रातील मान्यवरांचा न्याय, समता व कायदेविषयक जनजागृतीवर भर

■ प्रतिनिधी | वाशिम ■



जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक न्याय दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन १७ जुलै रोजी जिल्हा व सत्र न्यायालयातील कक्ष क्रमांक १३ येथे करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या गीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम होते. त्यांनी न्यायव्यवस्थेत सर्वसामान्यांना सुलभ, समान व वेळेवर न्याय मिळण्याचे महत्त्व अधोरेखित करत न्यायाविषयी जनजागृतीची आवश्यकता स्पष्ट केली.

यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ जी. व्ही. मोरे यांनी जागतिक न्याय दिनाचे महत्त्व, न्यायव्यवस्थेची भूमिका आणि कायद्याच्या राज्याची संकल्पना याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ जे. पी. झपाटे, जिल्हा न्यायाधीश-२ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. डी. इंगळे, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ए. एस. बाकलीवाल, जिल्हा सरकारी अभियोक्ता ए. आर. व्यवहारे, तसेच मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा वकील संघाचे सचिव डी. डी. गुडदे यांनी केले. जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष वैभव तिफणे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास न्यायिक अधिकारी, विधिज्ञ मंडळाचे सदस्य, पक्षकार तसेच न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाशिम येथील प्रा. डॉ. आदेश खराटे यांना रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

राजस्थान एज्युकेशन सोसायटी संचलित आर. ए. आट्‌र्स, श्री एम. के. कॉमर्स अँड श्री एस. आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील रसायनशास्त्र विभागाचे संशोधक विद्यार्थी प्रा. डॉ. आदेश विलास खराटे यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडून रसायनशास्त्र (Chemistry) विषयातील 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.)' ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्रदान करण्यात आली.

प्रा. डॉ. आदेश खराटे यांनी 'Synthesis, Characterization and Biological Evaluation of Thiazolidinone Compound Condensed with Azo Moiety' या विषयावर आपले संशोधन यशस्वीरित्या पूर्ण केले. हा संशोधन प्रबंध त्यांनी रसायनशास्त्र विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक, माजी प्राचार्य व संशोधन मार्गदर्शक प्रा. (डॉ.) आर. एफ. पगारिया यांच्या कुशल व मोलाच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. दि. १८ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयात आयोजित अंतिम मौखिक परीक्षा (Final Viva-Voce) दरम्यान त्यांनी आपल्या संशोधन प्रबंधाचे प्रभावी सादरीकरण केले.

## विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकतेचा जागर
### श्री समर्थ विद्यालयात जनजागृती कार्यक्रम उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■



जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने श्री समर्थ विद्यालय, सुंदर वाटिका येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांच्या हक्क व कर्तव्यांची जाणीव करून देणे आणि संविधानिक मूल्यांविषयी माहिती देणे, हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या गीताने झाली. अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. जी. चौखंडे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे महत्त्व, संविधानिक मूल्ये आणि जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्ये याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. वैभव तिफणे यांनी लोकसंख्या आणि 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान या विषयावर मार्गदर्शन केले. मुख्यन्यायरक्षक ॲड. परमेश्वर आ. शेळके यांनी पीडित भरपाई योजना याबाबत माहिती दिली. तसेच जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. डी. डी. गुडदे यांनी लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पॉक्सो) कायदा तसेच बालकांचे हक्क या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास श्री समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक सतीश हागे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती आत्मसात करून जबाबदार आणि सजग नागरिक बनावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोंडे सर यांनी केले, तर प्रणव बोलवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## मसलापेन येथील साई मंदिरात चोरी

■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील मसलापेन येथे आधी दर्शन घेऊन नंतर दानपेटी फोडून त्यातील ९५ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना दि. १९ जुलै रोजी रात्रीचे दरम्यान रिसोड तालुक्यातील शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मसलापेन येथे साई बाबा मंदिरात घडली.

सदर घटना दि. २० जुलै रोजी सकाळी पुजारी व अन्य दर्शन घेणारे भाविक भक्त जेव्हा मंदिरामध्ये आले त्यावेळेस ही घटना उघडकीस आली. चोरीची संपूर्ण घटना मंदिरातील सीसीटीव्ही मध्ये कैद झाली असून चोरटे चोरी करत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.याबाबत तेजराव केशवराव शिंदे रा. मसलापेन ता रिसोड जि वाशीम यांनी शिरपूर पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की,ते नेहमी प्रमाणे सकाळी ५ वा च्या दरम्यान मंदीरात गेले असता त्यांना मंदीराचा मुख्य दरवाजा उघडा दिसल्याने त्यांना संशय आल्याने मंदीराच्या गाभाऱ्यात जाऊन पाहीले असता दानपेटीचे कुलुप तोडलेले दिसले व खाली चिल्लर पैसे पडलेले दिसले व मंदीराच्या दान पेटीतील सोने चांदी रोख असा एकुण ९५,०००/- रु.चा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरुन नेले शिरपूर पोलीस स्टेशनचे पोलीससांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## जेसीआय युनिक प्रियदर्शनीचे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**अकोला** : महिला वर्गाच्या सांस्कृतिक व सामजिक सेवेत कार्यरत असणाऱ्या जेसीआय अकोला युनिक प्रियदर्शनीच्या वतीने नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर राबविण्यात आले.कपिल लड्ढा यांच्या आयुष क्लिनिकच्या सहकार्याने आयुष क्लिनिक येथे आयोजित या शिबिरात डॉ कपिल लड्ढा यांनी नागरिकांची रक्तदाब, रक्तशर्करा,होमोग्लोबिन आदीची तपासणी केली. जेसीआय युनिक प्रियदर्शनीच्या अध्यक्ष आरती लड्ढा यांच्या पुढाकारात आयोजित या शिबिरात तब्बल २७० महिला पुरुष नागरिकांनी सहभाग घेत शिबिराचा लाभ घेतला. या शिबिराच्या डॉ कपिल लड्ढा, मोनिका राठी, रश्मी पसारी, कविता लोहिया, पूनम सोमाणी, चेतना चांडक, स्नेहल लोहिया आदी उपस्थित होते.

## ३१ जुलैपर्यंत फार्मर ग्रुप लीगमधील उपक्रमांची नोंद पूर्ण करा
### कृषी विभागाचे आवाहन; उत्कृष्टशेतकरी गटांसाठी रोख पारितोषिके, अभ्यास दौरे व प्रशिक्षणाची संधी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'फार्मर ग्रुप लीग (एफजीएल) – वाशिम २०२६' या उपक्रमात जिल्ह्यातील शेतकरी गटांचा उत्साहवर्धक सहभाग दिसून येत आहे. आतापर्यंत ७६८ शेतकरी गटांनी सहभाग नोंदविला असून ३५ हजारांहून अधिक कृषी उपक्रमांची नोंद करण्यात आली आहे. स्पर्धेअंतर्गत उपक्रमांची नोंद करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै असून, सर्व सहभागी गटांनी उर्वरित उपक्रम वेळेत पूर्ण करून त्यांची नोंद करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह आणि आत्मा प्रकल्प संचालक अनिसा महाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा राबविण्यात येत आहे.

सामूहिक शेतीला चालना देणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविणे, शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करणे आणि शेतकरी गटांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.स्पर्धेतील जिल्हास्तरीय प्रथम दहा शेतकरी गटांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच गुणवत्तेनुसार गटातील सदस्यांना राज्याबाहेरील अभ्यास दौरे व प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. प्रत्येक तालुक्यातील प्रथम पाच शेतकरी गटांनाही प्रत्येकी १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात येईल. या गटांतील प्रत्येकी पाच सदस्यांना राज्यांतर्गत प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे.याशिवाय, स्पर्धेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या तालुक्याला आकर्षक चषक आणि प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेचे मूल्यमापन चार टप्प्यांत करण्यात येत आहे. मृदा व बीज व्यवस्थापन, उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कीड व रोगांचे शाश्वत व्यवस्थापन तसेच क्षमता विकास आणि कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. माती परीक्षण, बीजप्रक्रिया, हिरवळीच्या खतांचा वापर, रुंद वाफा-सरी तंत्रज्ञान, आंतरपीक पद्धती, सापळा पिके, चिकट व कामगंध सापळे, पक्षी थांबे, जैविक निविष्ठा निर्मिती तसेच 'महाविस्तार' अनुप्रयोगाच्या प्रभावी वापराच्या आधारे गुणांकन करण्यात येणार आहे. स्पर्धेत शेतकरी गटांना मार्गदर्शन करून सक्रिय सहभाग सुनिश्चित करणाऱ्या कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार असून, त्यांनाही विजेत्या शेतकरी गटांसोबत अभ्यास दौऱ्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३५ ■ बुधवार, २२ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# आईच्या आरोग्याची जबाबदारी, शासनाची बांधिलकी: मातृवंदना योजनेत वर्धा राज्यात अव्वल

## विशेष नोंदणी मोहिमेत १४२.८२ टक्के उद्दिष्टपूर्ती; १,३०७ च्या लक्ष्यावर १,८८७ लाभार्थ्यांची नोंदणी

### अंगणवाडी सेविकांच्या परिश्रमाला यश

**वर्धा जनमाध्यम :** कुपोषण, माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करून गर्भवती व स्तनदा मातांना आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान मातृवंदना योजनेच्या विशेष लाभार्थी नोंदणी मोहिमेत वर्धा जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. १५ जून ते १५ जुलै या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत जिल्ह्याला १,३०७ लाभार्थ्यांच्या नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र, जिल्ह्यात तब्बल १,८८७ पात्र महिलांची नोंदणी करण्यात आली. त्यामुळे १४२.८२ टक्के उद्दिष्टपूर्ती करत वर्धाने राज्यात अव्वल स्थान मिळविले.

गर्भवती व स्तनदा महिलांना योग्य पोषण, नियमित आरोग्य तपासणी आणि सुरक्षित मातृत्वासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने केंद्र शासन ही योजना राबवित आहे. योजनेअंतर्गत पहिल्या अपत्यासाठी पात्र महिलेला ५ हजार रुपये, तर दुसरे अपत्य मुलगी असल्यास ६ हजार रुपये आर्थिक सहाय्य दोन टप्प्यांत थेट बँक खात्यात जमा केले जाते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील महिलांना मोठा दिलासा मिळत आहे.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालविकास विभागाने ही विशेष मोहीम प्रभावीपणे राबविली. जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनिषा कुरसंगे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण व शहरी भागात अंगणवाडी सेविकांनी घराघरांत जाऊन पात्र महिलांची नोंदणी केली. योजनेची माहिती देत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात आली. त्यामुळे कोणतीही पात्र महिला योजनेपासून वंचित राहू नये, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. जिल्ह्याला १,३०७ नोंदणीचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात १,८८७ पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली असून, १४२.८२ टक्के उद्दिष्टपूर्ती करत जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. मनिषा कुरसंगे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास विभाग, वर्धा

### अंगणवाडी सेविकांचा सिंहाचा वाटा

जिल्ह्यातील १,६२७ अंगणवाड्यांपैकी १,४२२ ग्रामीण आणि २०५ शहरी अंगणवाड्यांतील सेविकांनी विशेष गृहभेटी देत लाभार्थ्यांचा शोध घेतला. अनेक ठिकाणी महिलांना योजनेबाबत माहिती नसल्याने सेविकांनी प्रत्यक्ष समुपदेशन करून त्यांची नोंदणी केली. या अथक परिश्रमामुळेच वर्धा जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांक मिळविणे शक्य झाले.

### असा मिळतो लाभ

पहिला हप्ता शासकीय आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी करून शेवटच्या मासिक पाळीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी पूर्ण केल्यानंतर लाभार्थीच्या बँक खात्यात जमा केला जातो. दुसरा हप्ता बाळाची जन्मनोंदणी, बीसीजी, ओपीव्ही, पेंटाव्हॅलेंटसह आवश्यक प्राथमिक लसीकरण पूर्ण झाल्यानंतर लाभार्थीच्या बँक खात्यात जमा केला जातो.

### ठळक आकडे

१,३०७ : नोंदणीचे उद्दिष्ट, १,८८७ : प्रत्यक्ष नोंदणी
१४२.८२ टक्के : उद्दिष्टपूती, १५ जून ते १५ जुलै या कालावधीत राज्यभर विशेष लाभार्थी नोंदणी मोहीम राबविण्यात आली. वधा

# रापमच्या बसला भरधाव दुचाकीची धडक; आरोग्य कर्मचाऱ्यास दुखापत

## धाडी-साहूर मार्गावरील वडाळा बायपासजवळ अपघात; बसचालकाचे प्रसंगावधान, मोठी दुर्घटना टळली



**साहूर जनमाध्यम :** धाडी-साहूर मार्गावरील वडाळा बायपास फाट्याजवळ मंगळवारी सकाळी राज्य परिवहन महामंडळाच्या (रापम) बसला भरधाव दुचाकीची धडक बसल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. बसचालकाने अखेरच्या क्षणापर्यंत अपघात टाळण्याचा प्रयत्न केल्याने मोठी दुर्घटना टळली.

मंगळवारी सकाळी सुमारे ८.१५ वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. आर्वी आगाराची एमएच-४० वाय-५९६८ क्रमांकाची बस वरुडहून वर्धेकडे निघाली होती. साहूर बसस्थानकातून पुढे निघाल्यानंतर अवघ्या एक किलोमीटर अंतरावर वडाळा बायपास फाट्याजवळ समोरून येणारी एमएच-२७-००१८ क्रमांकाची दुचाकी अचानक अनियंत्रित झाली आणि बसवर जाऊन आदळली.

या अपघातात दुचाकीस्वार भीमराव झिंगाजी भुरे (रा. भारवाडी) जखमी झाले. ते राजुरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असून कर्तव्यावर जात असताना ही दुर्घटना घडली. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, दुचाकी चुकीच्या दिशेने येत होती. बसचालकाने वाहन बाजूला घेत अपघात टाळण्याचा प्रयत्न केला; मात्र दुचाकी बसच्या मागील भागावर धडकली.

अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत जखमीला वरुड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलिस ठाण्याचे पंढरी धुर्वे, मंगेश भगत आणि संदीप शिंदे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणाची नोंद आष्टी पोलिसांनी घेतली असून अपघाताच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू आहे.

# देहव्यापार प्रकरणानंतर प्रशासनाचा दणका; अनधिकृत अतिथी विश्रामगृहावर बुलडोझर

## ९ लाखांचा दंडही वसूल

## बसस्थानकासमोरील इमारतीवर नगर परिषदेची कारवाई

**आर्वी जनमाध्यम :** बसस्थानकासमोरील अतिथी विश्रामगृहात कथित देहव्यापाराचा पर्दाफाश झाल्यानंतर प्रशासनाने मंगळवारी कठोर पाऊल उचलत संबंधित अनधिकृत बांधकामावर बुलडोझर चालविला. नगर परिषदेकडून पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. शहरातील बेकायदेशीर व्यवसाय आणि नियमबाह्य बांधकामांवर प्रशासनाने धडक मोहीम सुरू केल्याचा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला.



काही दिवसांपूर्वी आर्वी पोलिसांनी बसस्थानकासमोरील पुरुषोत्तम स्टोअर्सच्या वरच्या मजल्यावरील अतिथी विश्रामगृहावर छापा टाकून कथित देहव्यापाराचा पर्दाफाश केला होता. या प्रकरणात विश्रामगृहाचे संचालक पुरुषोत्तम रावलानी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर नगर परिषदेने इमारतीची पाहणी केली असता आवश्यक परवानग्यांशिवाय बांधकाम करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

नगर परिषदेने संबंधित मालकाला सुमारे ९ लाख रुपयांचा दंड ठोठावत अनधिकृत बांधकाम हटविण्याची नोटीस बजावली होती. मात्र आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने मंगळवारी मुख्याधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जेसीबीच्या सहाय्याने अनधिकृत भाग पाडण्यास सुरुवात करण्यात आली.

कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी आर्वी पोलिस ठाण्याचे ठाणेदार सतीश डेहनकर यांच्या नेतृत्वाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दरम्यान, देहव्यापाराच्या कारवाईनंतर लगेचच अनधिकृत बांधकामावर झालेल्या या धडक कारवाईचे शहरवासीयांनी स्वागत केले आहे. बेकायदेशीर व्यवसाय, नियमबाह्य बांधकामे आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्रशासनाने अशीच कठोर व सातत्यपूर्ण कारवाई सुरू ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# विद्यार्थिनीला अश्लील संदेश पाठविणे भोवले

## महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यापीठातील तांत्रिक सहाय्यकाविरुद्ध गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यापीठातील एका विद्यार्थिनीला व्हॉट्स?पवर अश्लील मजकूर पाठविल्याप्रकरणी विद्यापीठातील तांत्रिक सहाय्यक हरिषचंद्र शाह याच्याविरुद्ध रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे विद्यापीठ परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हरिषचंद्र शाह हे विद्यापीठात तांत्रिक सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीच्या व्हॉट्स?पवर आक्षेपार्ह आणि अश्लील स्वरूपाचे संदेश पाठविल्याचा आरोप आहे. याबाबत संबंधित विद्यार्थिनीने प्रथम विद्यापीठाच्या कुलसचिवांकडे ई-मेलद्वारे तक्रार नोंदविली होती.

तक्रारीची गंभीर दखल घेत विद्यापीठ प्रशासनाने तत्काळ अंतर्गत चौकशी समितीची स्थापना केली. समितीच्या प्राथमिक चौकशीत तक्रारीतील बाबी गंभीर स्वरूपाच्या असल्याचे समोर आल्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने पुढील कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला.



यानुसार, २० जुलै रोजी विद्यापीठाच्या वतीने राजेशकुमार यादव यांनी रामनगर पोलिस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी हरिषचंद्र शाह यांच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# रोठा प्रकरण : आरोपीची पोलीस कोठडी २४ जुलैपर्यंत वाढली

## महत्त्वाच्या तपासासाठी न्यायालयाचा निर्णय; एसआयटीकडून चौकशीला वेग

**वर्धा जनमाध्यम :** रोठा येथील १२ वर्षीय चिमुरडीवरील अत्याचार व हत्येच्या गाजलेल्या प्रकरणातील आरोपी राहुल मडावी (३०) याची पोलीस कोठडी (पीसीआर) मंगळवारी संपणार होती. मात्र, तपासातील अनेक महत्त्वाच्या बाबींचा उलगडा करणे अद्याप बाकी असल्याने पोलिसांनी न्यायालयाकडे कोठडी वाढविण्याची मागणी केली. न्यायालयाने ही मागणी मान्य करत आरोपीची पोलीस कोठडी २४ जुलैपर्यंत वाढविण्याचे आदेश दिले.

या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक (एसआयटी) अत्यंत गांभीर्याने करीत आहे. तपासाचा भाग म्हणून आरोपीला घटनास्थळी नेऊन घटनाक्रमाची पुनर्रचना करण्यात आली असून, विविध पुरावे, तांत्रिक माहिती आणि इतर महत्त्वाच्या बाबींची पडताळणी सुरू आहे. तपासाच्या दृष्टीने आरोपीची आणखी चौकशी आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दरम्यान, चिमुरडीला लवकरात लवकर न्याय मिळावा, यासाठी राज्याचे गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालविण्याची मागणी केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केल्यानंतर पोलिसांची बाजू ग्राह्य धरत न्यायालयाने २४ जुलैपर्यंत पोलीस कोठडी वाढविली असल्याची माहिती सावंगी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांनी दिली.

# आभाळ पुन्हा दाटलं : अन् शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आशेचा पाऊस बरसला

**वर्धा जनमाध्यम :** पावसाने दडी मारल्यानंतर उभ्या पिकांसह शेतकऱ्यांच्या आशाही करपू लागल्या होत्या. आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाच्या मनात चिंता घर करून बसली होती. मात्र गेल्या दोन दिवसांपासून सुरू झालेल्या रिमझिम सरींनी केवळ शेतच हिरवेगार केले नाही, तर शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरही पुन्हा हास्य फुलविले आहे. कोमेजू लागलेल्या सोयाबीन, कापूस आणि इतर खरीप पिकांना या पावसाने अक्षरशः नवसंजीवनी दिली आहे.

मागील २४ तासांत जिल्ह्यात सरासरी १८.०४ मिमी पावसाची नोंद झाली असून, हवामान विभागाने पुढील दोन दिवसांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. जूनअखेरीस आणि जुलैच्या सुरुवातीला झालेल्या पावसानंतर जिल्ह्यात सुमारे ९५ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. मात्र त्यानंतर पावसाने पाठ फिरविल्याने अंकुरलेली पिके सुकण्याच्या मार्गावर होती. आता सुरू झालेल्या रिमझिम सरींनी बळीराजाच्या मनात पुन्हा आशेचे हिरवे कोंब फुलविले आहेत. तरीही जिल्ह्यातील धरणे आणि भूजल पातळीत अपेक्षित वाढ झालेली नसल्याने दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क केली असून नदीकाठच्या गावांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.

# आज बोरी येथे बळीराजा सन्मान सोहळा व जिल्हास्तरीय कार्यशाळा

## पालकमंत्र्यांसह लोकप्रतिनिधींची असणार उपस्थिती

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यासाठी तसेच कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, मुल्यवर्धन आणि विविध शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी दि.२२ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता सेलू तालुक्यातील बोरी कोकाटे येथे बळीराजा सन्मान सोहळा व जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर राहणार आहे. यावेळी वित्त, नियोजन, कृषि, मृद व जलसंधारण राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, खासदार अनिल बोंडे, खासदार अमर काळे, सर्वश्री आमदार अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, डॉ.नवनीता काकडे, संजय भेंडे, अरुण लखानी, समीर कुणावार, राजेश बकाने, सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल उपस्थित राहणार आहे.

सेलू तालुक्यातील बोरी कोकाटे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दुपारी ३.३० वाजता आयोजित या कार्यक्रमास जिल्ह्यातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषि उद्योग, युवक व महिला शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अरविंद उपरिकर यांनी केले आहे.




# पट्टी बांधूनही अचूक ओळख; दोन चिमुकल्या बहिणींची इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड्‌समध्ये दमदार नोंद

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते श्राविका व अन्विका बागडे यांचा गौरव

**आष्टी शहीद जनमाध्यम :** उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा सदुपयोग करत जिद्द, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर आष्टी येथील दोन चिमुकल्या बहिणींनी इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड्‌समध्ये मानाची नोंद करून परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. कु. श्राविका स्वप्नील बागडे (वय १०) आणि कु. अन्विका स्वप्नील बागडे (वय ६) यांनी डोळ्यांवर पट्टी बांधून विविध वस्तूंची अचूक ओळख पटवत प्रत्येकी एक असा विक्रम आपल्या नावावर केला.

किरण मिडब्रेन अकॅडमी, नागपूर येथे थर्ड आय प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर दोघींनी ही उल्लेखनीय कामगिरी केली. श्राविकाने अवघ्या ४६ सेकंदांत २५ स्वातंत्र्यसैनिकांचे छायाचित्र अचूक ओळखून विक्रम प्रस्थापित केला. तर अन्विकाने ५८ सेकंदांत ७ रंग, १८ फळे आणि ७ चलनी नोटांवरील क्रमांक अचूक ओळखून उपस्थितांची दाद मिळविली. या अनोख्या यशाची दखल घेत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दोन्ही बहिणींचा विशेष सत्कार करण्यात आला. या सन्मानामुळे त्यांच्या कुटुंबासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




मोबाईल आणि टीव्हीच्या आकर्षणात रमणाऱ्या आजच्या पिढीसमोर श्राविका व अन्विकाने मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अशक्य वाटणारी गोष्टही शक्य करता येते, असा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## महाराष्ट्रातील मंदिरातही घोटाळा;
# ६१ कोटींचा गैरव्यवहार उघड



**कोल्हापूर / प्रतिनिधी-** महाराष्ट्र-कर्नाटक आणि सीमाभागातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कोल्हापुरातील आदमापूर संत सद्गुरू श्री बाळूमामा देवालय ट्रस्टमध्ये तब्बल ६१ कोटी ७४ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचा प्रकार उघड झाला आहे. देवस्थानच्या जमिनी बनावट कागदपत्रांच्या आधारे खरेदी-विक्री, ट्रस्टच्या निधीचा गैरवापर असा ठपका ठेवण्यात आला आहे. याप्रकरणी ट्रस्टच्या तत्कालीन कार्याध्यक्ष रागिनी खडके, सचिव रावसाहेब कोणकेरी यांच्यावर भुदरगड पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून, या प्रकरणाची व्याप्ती पाहता हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला असल्याची माहिती पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी दिली.धर्मादाय आयुक्त मुख्यालय, मुंबई येथील देवस्थान शाखेचे निरीक्षक रंगराव गडकरी यांनी भुदरगड पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, मार्च २०२० ते मार्च २०२६ या कालावधीत आदमापूर येथील संत सद्गुरू श्री बाळूमामा देवालय ट्रस्टमध्ये आर्थिक व्यवहारांमध्ये अनियमितता, देवस्थानच्या जमिनी खरेदी-विक्री करताना तीस कोटींचा झालेला गैरव्यवहार, बाळूमामाच्या ४४ हजार मेंढ्याचा विक्री करताना दाखवलेला दर यामुळे ट्रस्टच्या कारभाराबाबत उच्च न्यायालयात मोठ्या प्रमाणात तक्रारी झाल्या होत्या. न्यायालयाचे नाईक अधिकारी एम. बी. लांबे यांनी याप्रकरणी चौकशी समिती नेमली होती.या समितीच्या अहवालानुसार, धर्मादाय मुख्यालयातील निरीक्षक रंगराव गडकरी यांच्या तक्रारीनुसार, कोल्हापूरच्या भुदरगड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कागदपत्रांची तपासणी सुरू असून, या पुढचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे, देवस्थान समितीकडील मौल्यवान दस्तऐवज ताब्यात घेतले असून, कागदपत्रांची छाननी सुरू आहे तपासांती सर्व चित्र स्पष्ट होईल. जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई होईल, अशी माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिस उपाधीक्षक पत्की यांनी दिली.

मार्च २०२० ते मार्च २०२६ या कालावधीत आदमापूर येथील संत सद्गुरू श्री बाळूमामा देवालय ट्रस्टमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. याची रक्कम मोठी असून, याप्रकरणी ट्रस्टच्या तत्कालीन कार्याध्यक्ष रागिनी खडके, सचिव रावसाहेब कोणकेरी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून गुन्हा दाखल केला आहे. मे २०२४ ते जुलै २०२५मध्ये हा व्यवहार झालेला आहे. या कालावधीत मी ट्रस्टची भाग नव्हते, असा खुलासा ट्रस्टच्या माजी कार्याध्यक्ष रागिनी खडके यांनी केला आहे. तसेच २१ ट्रस्टी असताना दोघांवरच गुन्हा का दाखल करण्यात आला? असा सवालही त्यांनी विचारला.

**संत बाळूमामांच्या भक्तांमध्ये खळबळ-** महाराष्ट्रासह कर्नाटक आणि सीमाभागातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या संत सद्गुरू श्री बाळूमामाच्या दर्शनासाठी दर अमावास्येला राज्यभरातून भाविक मोठ्या प्रमाणात दाखल होतात. देवस्थान समितीच्या ट्रस्टमध्येच कोटींचा अपहार झाल्याने राज्यभरातील भक्तांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

## सिक्किममध्ये बोगद्यात भीषण दुर्घटना; दरड कोसळून सात कामगारांचा मृत्यू, मिथेन वायूमुळे बचावकार्यात मोठे अडथळे

**गंगटोक :** सिक्किममधील नामची जिल्ह्यात सुरू असलेल्या जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात भीषण दुर्घटना घडली असून, दरड कोसळल्याने किमान ७ कामगारांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर बोगद्यामध्ये मोठ्या प्रमाणात मिथेन वायू पसरल्याने बचावकार्य अत्यंत धोकादायक बनले असून, अनेक कामगार अद्यापही आत अडकले असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.



ही दुर्घटना तेस्ता स्टेज-५ जलविद्युत प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान घडली. प्राथमिक माहितीनुसार, बोगद्याच्या आत सुमारे दीड किलोमीटर अंतरावर नैसर्गिकरीत्या साचलेल्या मिथेन वायूचा दाब कमी करण्याचा प्रयत्न सुरू असताना अचानक स्फोट झाला. त्यानंतर मोठी दरड कोसळून बोगद्याचा प्रवेशमार्ग पूर्णपणे बंद झाला. काही कामगारांना वेळेत बाहेर पडण्यात यश आले, मात्र अनेक जण आतच अडकून पडले.घटनेची माहिती मिळताच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF), अग्निशमन दल, पोलीस आणि जिल्हा प्रशासनाची पथके घटनास्थळी दाखल झाली. मात्र बोगद्यामध्ये मिथेन वायूचे प्रमाण वाढल्याने ऑक्सिजनची कमतरता निर्माण झाली आहे. कमी दृश्यमानता, अरुंद मार्ग आणि विषारी वायूमुळे बचाव पथकांनाही आत प्रवेश करण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. काही बचाव कर्मचारी श्वसनाचा त्रास झाल्याने बाहेर काढावे लागल्याची माहितीही समोर आली आहे.


प्रशासनाने आतापर्यंत ७ मृतदेह बाहेर काढल्याची पुष्टी केली असून, उर्वरित अडकलेल्या कामगारांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. बोगद्यातील विषारी वायूचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष उपकरणांचा वापर करण्यात येत असून, परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतरच बचाव पथकांना पुढे जाता येणार आहे.ही दुर्घटना देशातील अलीकडच्या काळातील सर्वात गंभीर बोगदा अपघातांपैकी एक मानली जात आहे. मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्तकेली जात असून, केंद्र व राज्य सरकारने बचावकार्यास सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. दुर्घटनेच्या कारणांचा सखोल तपास सुरू करण्यात आला असून, सुरक्षाविषयक नियमांचे पालन झाले होते का, याचाही तपास केला जाणार आहे.

## जंतर-मंतरवर पुन्हा 'कॉकरोच' पून्हा जमू लागले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पेपर लीक प्रकरण आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांच्या मागण्यांसाठी जंतर-मंतरवर गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेले 'क?करोच जनता पार्टी'चे आंदोलन मंगळवारी अधिक तीव्र झाले. सोमवारी झालेल्या हिंसक आंदोलनानंतरही क्ख्र्‍ चे संस्थापक अभिजित दीपके यांनी संसद मार्च सुरूच ठेवण्याची घोषणा केली आहे. सध्या जंतर-मंतर परिसरात १५ ते २० हजार आंदोलक जमले असून दिल्ली-एनसीआरमधून विद्यार्थ्यांचा ओघ सुरूच आहे.संसद भवनाकडे जाणा-या सर्व महत्त्वाच्या रस्त्यांवर पोलिसांनी कालच्या तुलनेत दुप्पट बैरिकेडिंग केली आहे. पोलिसांनी कनाट प्लेस आणि पार्लियामेंट स्ट्रीट ठाण्यासह विविध ठिकाणी एकूण ५ गुन्हे दाखल केले असून संशयितांची ओळख पटवण्यासाठी CCTV फुटेज तपासले जात आहे. दरम्यान, पोलिसांच्या बळाच्या वापरा विरोधात दाखल जनहित याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. ग्णालयात नेत्यांची धावः केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा आणि 'आप'चे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी आरएमएल (RML) व लेडी हार्डिंग रुग्णालयात जाउन जखमी पोलीस आणि आंदोलकांची भेट घेतली.आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचा निषेध करत सीजेपीने दिल्ली पोलिसांवर गंभीर आरोप केला आहे. पार्टीने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'काल आंदोलनाला हिंसक वळण लावण्यासाठी दिल्ली पोलिसांच्या गणवेशात गुंड घुसले होते.'दुस-या बाजूला, आरएमएल, सफदरजंग आणि लेडी हार्डिंग रुग्णालयात अनेक जखमी पोलीस कर्मचारी आणि आंदोलकांवर उपचार सुरू आहेत. आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा यांनी डाक्टरांना सर्व जखमींना मोफत आणि उच्च दर्जाचे उपचार पुरवण्याचे निर्देश दिले आहेत.

## दोषींवर कठोर कारवाई केली जाईल-पंतप्रधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पेपर लीक प्रकरणावरून देशातील राजकीय वातावरण तापले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. तसेच या संवेदनशील मुद्यावर राजकारण करू नये, असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, काक्रोच जनता पार्टीने जंतर-मंतर येथे पुन्हा आंदोलन सुरू केले असून आंदोलनकर्ते अभिजीत दीपके यांनी पोलिसांच्या कारवाईवर गंभीर आरोप केले आहेत. मंगळवारी झालेल्या एनडीए संसदीय दलाच्या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी पेपर लीक प्रकरणावर भूमिका मांडली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर माहिती देताना सांगितले की, पेपर लीक प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा दिली जाईल आणि या मुद्याचे राजकारण होउ नये, अशी भूमिका पंतप्रधानांनी मांडली. याच बैठकीत त्यांनी भारत-अमेरिका व्यापार करारामुळे देशातील शेतक-यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचा विशवासही व्यक्तकेला. दरम्यान, जंतर-मंतरवरील आंदोलन पुन्हा सुरू करताना सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी सोमवारी संसद मार्चदरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्यांवर अत्याचार केल्याचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, सरकार आणि पोलिसांच्या कारवाईमुळे विद्यार्थ्यांचे रक्तसांडले असून त्यांना विद्यार्थ्यांच्या भवितव्याची कोणतीही चिंता नाही. त्यामुळे सध्या संसद मार्च स्थगित ठेवण्यात आला असला तरी आंदोलन सुरूच राहणार आहे.



## शांततेतील आंदोलनावर पोलिसांची गुंडगिरी : विजय वडेट्टीवार



**मुंबई/ प्रतिनिधी-**शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार संविधानाने आम्हाला सर्वांना दिला आहे. दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांच्या शांततेत सुरू असलेल्या आंदोलनावर लाठीचार्ज करण्यात आला. यामध्ये अनेक तरुण जखमी झाले. तरुणांवर लाठीचार्ज करण्याची काय गरज होती? विजय वडेट्टीवार म्हणाले की, नरेंद्र मोदी हे देशातील लोकशाही संपवणारे पंतप्रधान ठरतील अशी सुद्धा सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे. काल दिल्लीमध्ये तरुण पोरांवर लाठीचार्ज करत त्यांना जखमी करण्यात आले. ज्या पद्धतीने पोलिस गुंडगिरीसारखे वागत होते. जंतर मंतर हे लोकशाहीच्या हक्काचे एक स्थान आहे, जिथून आंदोलने होत असतात. वांगचुक यांना उचलून नेणे, विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणे यामुळे देशातील लोकशाहीला धोका निर्माण झाल्याचे जाणवत आहे. मोदी सरकार आंदोलनाला का घाबरते आहे? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला आहे. या घटनेचा आम्ही निषेध करतो. ते टाळायला पाहिजे होते. पण यामुळे आता तरुणांचा उद्रेक थांबणार नाही.

**उद्योगांसाठी सुपीक जमिनी बळकावू नका-**विजय वडेट्टीवार म्हणाले की, कुठलाही उद्योग-व्यवसाय करत असताना त्यासाठी सुपीक जमीन घेउच नये. देशामध्ये सर्वच उद्योग दीर्घ काळ चालले असे नाहीत काही उद्योग बंद पडतात. त्यासाठी अनेक कारणं आहेत. उद्योगांना जमिनी घेण्यास कोणाचा विरोध नाही. पण सुपीक जमिनी घेण्याचा आग्रह का केला जात आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सरकार आग्रह करत आहे. गडचिरोलीमध्ये शेतक-यांनी आंदोलन केले की सुपीक जमिनी देणार नाही. तुम्ही उद्योजकांना पायघड्या घाला पण त्यासाठी शेतक-यांचे नुकसान करू नका. आमचा उद्योगांना विरोध नाही पण सुपीक जमिनी घेण्यास विरोध आहे. जर तसे झाले तर आम्ही शेतक-यांच्या बाजूने उभे राहू, जबरदस्तीने जमिनी घेता येणार नाहीत.

**पुण्यात २ हजार कोटींचा टीडीआर घोटाळा**

विजय वडेट्टीवार म्हणाले की, एफएसआयमध्ये प्रचंड मोठे घोटाळे झाले आहेत. टीडीआर घोटाळा असे अनेक घोटाळे झाले आहेत. सरकार याबद्दल चौकशी करत नाही, आम्ही अनेक वेळा विधिमंडळात याबद्दल मागणी केली आहे. पुण्यात २ हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला पण त्यावर काहीच कारवाई केली जात नाही. पुण्यात डंपिंग ग्राउंडमध्ये ज्या लोकांचा बळी गेला त्यामधील दोषींवर कारवाई करण्यात आली नाही. सरकारने घोटाळे करणा-यांची चौकशी करत कारवाई केली पाहिजे.

## सरकारच मानसिक रुग्ण
### विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून राज ठाकरे आक्रमक

**मुंबई :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करत त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली असून सरकारने आंदोलकांशी संवाद साधण्याचे आवाहन केले आहे.राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरील सविस्तर पोस्टमधून आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी म्हटले की, सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करण्याची पद्धत आणि त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर झालेला लाठीचार्ज पाहता सरकारचा दृष्टिकोन चिंताजनक वाटतो. आंदोलने दडपण्याऐवजी ती समजून घेउन संवादातून मार्ग काढणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर बोलताना ठाकरे म्हणाले की, पेपर लीकसारख्या गंभीर प्रकरणानंतरही सरकार त्यांना का पाठीशी घालत आहे, हा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. जबाबदारी निश्चित करून उत्तरदायित्व स्वीकारले पाहिजे, असेही त्यांनी म्हटले.राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही थेट आवाहन केले. परीक्षा पे चर्चा कार्यक्रम घेणा-या पंतप्रधानांनी आता आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांशीही चर्चा करावी. विद्यार्थ्यांच्या मागण्या समजून घेउन त्यावर सकारात्मक तोडगा काढणे ही सरकारची जबाबदारी आहे, असे ते म्हणाले.त्यांच्या मते, हे आंदोलन केवळ एका परीक्षेपुरते मर्यादित नाही. रोजगार, शिक्षण व्यवस्था, महागाई, प्रशासनावरील अविश्वास आणि भविष्यातील असुरक्षितता अशा अनेक प्रश्नांचा हा एकत्रित उद्रेक आहे. त्यामुळे आंदोलनाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहण्याऐवजी व्यापक सामाजिक असंतोष म्हणून त्याचा विचार करायला हवा, असे त्यांनी सांगितले.राज ठाकरे यांनी पुढे म्हटले की, आंदोलने दडपण्यात कोणताही मोठेपणा नसतो. आंदोलन होउ न देणे किंवा ते संवादाच्या माध्यमातून शांततेने सोडवणे, हीच सक्षम प्रशासनाची खरी ओळख असते. सरकारने कठोरतेपेक्षा समंजसपणा दाखवून विद्यार्थ्यांचा विश्वास जिंकावा, असे आवाहन त्यांनी केले.मनसेने सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला आणि त्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिला असल्याचे सांगत, परीक्षा प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणणे आणि जबाबदार मंत्र्यांवर कारवाई करणे आवश्यक आहे, अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडली. दरम्यान, राज ठाकरे यांच्या या वक्तव्यानंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## वडिलांच्या खुनाचा मुलाकडून 23 वर्षानंतर बदला

**पुणे :** वडिलांच्या खुनाचा बदला मुलाने २३ वर्षांनंतर घेतला. पुणे-सातारा महामार्गावरील जुन्या कात्रज बोगद्याजवळ शिंदेवाडी परिसरात एकाचा खून करून पसार झालेल्या मुलासह साथीदारांना ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, राजगड पोलिस ठाण्यातील पथकाने अटक केली. त्यांच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल तसेच तीन काडतुसे जप्त करण्यात आली. संजय बाबूराव कडू-देशमुख (वय ४०, रा. मुंढवा, पुणे) असे खून झालेल्याचे नाव आहे.या प्रकरणी मंथन दिनेश वैद्य, सौरभ सागर परदेशी (दोघे रा. जोशी वाडा, पूना हास्पिटलसमोर, सदाशिव पेठ), मिझान गौसउद्दीन शेख, संदीप बाबुलाल कोरी (दोघे रा. पर्वती दर्शन) यांना अटक करण्यात आली. पुणे-सातारा महामार्गावर ११ जुलै रोजी शिंदेवाडी परिसरात संजय देशमुख याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार करून खून करण्यात आला होता. या प्रकरणी राजगड पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि राजगड पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला. तपासात मिळालेल्या माहितीनुसार मंथन वैद्य, सागर परदेशी यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी साथीदार मिझान, संदीप यांच्या मदतीने देशमुख याचा खून केल्याची कबुली दिली.आरोपी मंथन वैद्य याचे वडील दिनेश यांचा २००३ मध्ये देशमुख याने खून केला होता. वडिलांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी मंथनने साथीदारांच्या मदतीने देशमुख याचा खून केल्याची कबुली दिली. आरोपींकडून देशी बनावटीचे पिस्तूल, तीन काडतुसे जप्त करण्यात आली. पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, उपविभागीय अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, पोलिस निरीक्षक संतोष जाधव, सहायक पोलिस निरीक्षक चेतन मछले, पोलिस उपनिरीक्षक युवराज धोंडे, संतोष तोडकर, संतोष भापकर, विशाल भोरडे, किरण बर्काले, नीलेश राणे, नाना मदने, मयूर निंबाळकर, राजेंद्र मुंढे, कोंढाळकर, मेस्त्री, भालेराव, शिंदे आणि नलावडे यांनी ही कामगिरी केली.

## हत्येचा कट, दंगल घडवणे, हिंसाचाराचा प्रयत्न...;
### दिल्ली पोलिसांनी आंदोलकांवर लावली कलमे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'काकरोच जनता पार्टी'ने (CJP) पेपरफुटीचा निषेध करण्यासाठी आणि शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी सोमवारी (२० जुलै) संसदेवर मोर्चा काढला. या आंदोलनात हजारो विद्यार्थी आणि इतर नागरिक सहभागी झाले होते. या कार्यक्रमादरम्यान हिंसाचार उसळला आणि परिस्थिती काहीशी बिघडली. आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक उडाली, ज्यात अनेक पोलीस कर्मचारी आणि सुरक्षा दलाचे जवान जखमी झाले. तसेच अनेक आंदोलकांनाही गंभीर दुखापत झाली. यादरम्यान, पोलिसांनी आंदोलकांवरील कारवाई तीव्र केली आहे. दंगल, हिंसाचार आणि हत्येचा प्रयत्न यांसारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी एफआयआर (FIR) दाखल करण्यात आले आहेत. जाणून घेउया, एफआयआरमध्ये लावण्यात आलेल्या विशिष्ट कलमांबाबत. मिळालेल्या माहितीनुसार, हिंसाचाराबाबतचा एफआयआर 'पार्लमेंट स्ट्रीट पोलीस स्टेशन'मध्ये दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा 'भारतीय न्याय संहिता' (BNS) २०२३, 'आर्म्स अक्ट' १९५९ आणि 'सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायदा' (PDPP Act) यांच्या विविध कलमांतर्गत दाखल करण्यात आला आहे.



कोणती कलमे लावण्यात आली आहेत?

कलम २२३(ड) BNS: कायदेशीर आदेशाचे उल्लंघन किंवा कर्तव्यात अडथळा आणण्याशी संबंधित.

कलम २२१ BNS: लोकसेवकाच्या कामात अडथळा आणणे किंवा प्रभाव टाकणे.

कलम १३२ BNS: लोकसेवकावर हल्ला करणे किंवा त्यांच्याविरुद्ध बळाचा वापर करणे.

कलम १२१(१) BNS: बेकायदेशीर जमाव किंवा हिंसक जमावाशी संबंधित गुन्हे.

कलम १८९(३), १९०, १९१(२), १९१(३), १९२ एःच: दंगल घडवण्याचा प्रयत्न, बेकायदेशीर जमाव आणि हिंसाचार.

कलम ३२४(५) BNS: सार्वजनिक सुव्यवस्था भंग करणे किंवा गंभीर हानी पोहोचवण्याशी संबंधित.

कलम १०९(१) एःच: हत्येचा प्रयत्न किंवा गंभीर हिंसाचाराच्या कृत्यांशी संबंधित. (जिथे लागू असेल तिथे).

कलम १२५ BNS: मानवी जीवन किंवा वैयक्तिक्र सुरक्षितता धोक्यात आणणारी कृत्ये.

BNS चे कलम ३(५): समान उद्दिष्ट किंवा सामायिक हेतूने एकत्रितपणे गुन्हा करणे.

BNS चे कलम ६१(२): गुन्हेगारी कट रचण्याशी संबंधित तरतुदी. शस्त्र कायदा, १९५९ चे कलम २५ (1AB).

सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक कायदा (PDPP Act) चे कलम ३: सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, नासधूस किंवा हानी पोहोचवणे यासंबंधीचा गुन्हा.

**४ एफआयआर (FIR) दाखल-** दिल्लीपोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत एकूण चार एफआयआर दाखल केले आहेत, तर आणखी दोन एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पहिला एफआयआर संसदीय अधिवेशनादरम्यान दिल्ली जिल्हा परिसरात अनधिकृतपणे ड्रोन उडवल्याप्रकरणी दाखल करण्यात आला आहे. दुसरा एफआयआर हिंसाचार भडकवण्याचा कट रचल्याच्या आरोपाखाली दाखल करण्यात आला. तपासादरम्यान या प्रकरणाशी संबंधित महत्त्वपूर्ण पुरावे हाती लागल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. याव्यतिरिक्त, अधिकृत कर्तव्यात अडथळा आणणे, पोलीस कर्मचा-यांवर हल्ला करणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे या आरोपांखाली आणखी दोन एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, दिल्ली पोलीस आणखी दोन एफआयआर दाखल करण्याच्या तयारीत आहेत. हे गुन्हे मारहाण, कायदा हातात घेणे आणि 'भारतीय न्याय संहिता' (BNS) च्या विविध कलमांतर्गत येणा-या इतर संबंधित गुन्ह्यांशी संबंधित आहेत.



## राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्यात हवामानात सतत बदल होत आहे. त्यामध्येच कालपासून जोरदार पावसाला अनेक भागात सुरुवात झाली. काल रात्री मुंबईमध्ये जोरदार पाउस झाला. आजही भारतीय हवामान विभागाने मोठा इशारा दिला. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाचा मोठा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि रायगडला अतिमुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला.रोहतक, वाराणसी, पुरूलिया ते ईशान्य बंगालपर्यंत ९०० मीटर उंचीपर्यंत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला. १.५ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहे. यासोबतच मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, छत्तीसगड, तेलंगणा, ओडिशा ते बंगालपर्यंत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला. आज पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. पुणे, मुंबई, ठाणे, रायगड या परिसरात अतिमुसळधार पाउस होण्याचा इशारा आहे. यासोबतच नांदेड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, नाशिक, नंदुरबार, जालना या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाउस होण्याचा अंदाज आहे. बाकी राज्यात हलक्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे. पुढील काही दिवस राज्यात पाउस कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. हा शेतक-यांना मोठा दिलासा म्हणावा लागेल.आणखी दोन दिवस विदर्भात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या पावसामुळे शेतक-यांना मोठा फायदा होणार आहे. राज्यात जून महिन्याच्या शेवटी पावसाने हजेरी लावली. जुलै महिन्यात दमदार पावसाची नोंद झाली. त्यानंतर आठ दिवस पावसाचा पत्ता नव्हता, आता पुन्हा एकदा पाउस सुरू झाला. पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढेल. इतर राज्यांतही पाउस सुरू आहे. पावसाने उत्तरेकडील राज्यात हाहाकार माजवला आहे. त्यामध्येच राज्यातही पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## आम्ही तरूणांच्या पाठीशी खंबीरपणे ऊभे-देशमुख

**मुंबई/प्रतिनिधी :** जगभरातून नीट परीक्षा घोटाळ्याच्या विरोधात विद्यार्थी आणि पालकांकडून तीव्र संताप व्यक्त होताना दिसत आहे. आता विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची लाडकी जोडी अभिनेते रितेश विलासराव देशमुख आणि जिनिलिया रितेश देशमुख यांनी देखील पाठिंबा दिला आहे.रितेश देशमुख आणि जिनिलिया देशमुख यांची पोस्ट सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे, आम्ही आमच्या देशातील तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. त्यांचा आवाज ऐकला गेला पाहिजे. तो आवाज बुलंद, स्पष्ट आणि निर्भय असावा. तोच आपल्या लोकशाहीचा प्राण आणि आपल्या राष्ट्राच्या भविष्याचे खरे शिल्पकार आहेत. चला, आपण त्यांचे म्हणणे ऐकून घेउया,



त्यांना पाठिंबा देउया आणि त्यांना सक्षम करूया. आपल्या तरुणांची उर्जा, धैर्य आणि स्वप्नेच त्या भारताला आकार देतील, ज्याची निर्मिती करण्याचे स्वप्न आपण पाहतो. जय हिंद!दिल्लीत जंतर-मंतर येथे काक्रोच जनता पार्टीने जोरदार आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला सामान्य जनतेपासून ते मनोरंजन विश्वातील कलाकारांपर्यंत अनेकांचा पाठिंबा मिळताना दिसत आहे. यात शबाना आझमी, सयाजी शिंदे, अतुल कुलकर्णी, झीनत अमान, प्रकाश राज, हेमंत ढोमे, स्वरा भास्कर अशा अनेक मराठी आणि बालिवूडच्या कलाकारांचा समावेश आहे.सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केल्यावर अभिजीत दीपके उपोषणाला बसले होते. मात्र नंतर सोनम वांगचुक यांच्या सांगण्यावरून अभिजीत दिपके याने उपोषण मागे घेतले. २० जुलैला जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांनी, पालक आणि नागरिकांची तुफान गर्दी पाहायला मिळाली. तेव्हा पोलिसांकडून आंदोलनकर्त्यांवर लाठी चार्ज करण्यात आला. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप वाढला. नीट वैद्यकीय प्रवेश परीक्षेत झालेली अनियमितता, पेपरफुटी आणि परीक्षा रद्द करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत सोनम वांगचुक हे उपोषणाला बसले होते. सोनम वांगचुक यांनी २८ जून २०२६ रोजी नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे हे उपोषण सुरू केले होते.

## 10 वर्षांच्या मुलीवर सावत्र बापाकडून अत्याचार

**पुणे / प्रतिनिधी-**पुण्यात पुन्हा एकदा संतापजनक घटना घडली आहे. पुण्यातील भोर तालुक्यातील एका गावात पुन्हा भयंकर प्रकार घडला आहे. बाहेर कामासाठी आलेल्या कुटुंबातील ३० वर्षीय सावत्र बापाने दहा वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. भोर तालुक्यात पुन्हा संतापजनक प्रकार घडल्याने नागरिकांकडून संताप व्यक्तकेला जात आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून भोरच्या राजगड पोलिसांत आरोपीवर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भोर तालुक्यातील एका गावात संबंधित कुटुंब बाहेरील जिल्ह्यातून कामासाठी आले होते. आरोपीने मुलीवर अत्याचार केला




आहे. नराधमाच्या अत्याचारानंतर मुलीला शारीरिक त्रास होउ लागला. त्यानंतर तिने हा प्रकार आईला सांगितला. आईने स्थानिक नागरिक आणि मुकादमाच्या मदतीने राजगड पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांत गुन्हा दाखल होताच पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली. पोलिस निरीक्षक संतोष जाधव यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने पथक पाठवून आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे. त्यानंतर पीडित मुलीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिस उपनिरीक्षक अजित पाटील या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'कॅब टू स्पेस' संकल्पना

भारताने नुकतेच स्कायरूट एरोस्पेस या हैदराबादस्थित खासगी कंपनीने विकसित केलेले 'विक्रम-१' हे देशातील पहिले खासगी ऑर्बिटल रॉकेट यशस्वीरीत्या अवकाशात प्रक्षेपित करण्यात आले.त्याला नाव दिले आहे ते भारताचे विख्यात शास्त्रज्ञ आणि भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक विक्रम साराभाई यांचे. स्कायरूट हैदराबाद येथील स्टार्टअप आहे आणि ३०० किलोग्रामचा पेलोड घेऊन या रॉकेटने अवकाशात उड्डाण केले आणि कक्षेत ते स्थिर झाले. भारतीय अंतराळ संशोधन कार्यक्रमासाठी हा मैलाचा दगड आहे आणि दोन दिवसांपूर्वी इस्त्रो या अंतराळ संस्थेतून १०० लोकांनी राजीनामे दिल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्यावर ही बातमी निश्चितच आनंददायी आणि उत्साहवर्धक आहे. सतीश धवन स्पेस सेंटरवरून अवकाशात प्रक्षेपित करण्यात आलेले हे रॉकेट पहिल्याच प्रयत्नात आपल्या कक्षेत स्थिर झाले.भारताच्या अंतराळ कार्यक्रमासाठी हा मैलाचा दगड तर आहेच पण यासाठी ही बातमी महत्वाची आहे कारण अमेरिका आणि चीननंतर आता भारत हा तिसऱ्या क्रमांकाचा देश ठरला आहे, ज्याने हा पराक्रम करून दाखवला. विशेष म्हणजे ते संपूर्ण एतद्देशीय बनावटीचे आहे.महत्वाची बाब म्हणजे या लॉचमुळे जागतिक कंपन्यांसाठी व्यावसायिक बाजारपेठ खुली झाली आहे. या रॉकेटने भारतासाठी इतिहास रचला आहे. कारण हे पहिले खासगी रॉकेट आहे जे व्यावसायिक कामासाठी वापरले जाईल. स्कायरूट या स्टार्टअपने हे विकसित केले असून त्याची किंमत १.१ अब्ज डॉलर आहे. भारतही आता त्या अगदी थोडक्या देशांत जाऊन बसला आहे ज्यांनी स्वतःचे खासगी रॉकेट अंतराळात यशस्वीपणे प्रक्षेपित केले आहेत. याचा अर्थ भारतही आता अंतराळ प्रक्षेपण क्षेत्रात मोठा खेळाडू ठरला आहे. आणखी एक भारतासाठी गौरवास्पद बाब म्हणजे भारतातील खासगी रॉकेट लॉच क्षेत्राने इतिहास घडवला आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला अंतराळ कार्यक्रमाच्या शिरोभागी नेऊन ठेवले आहे. त्याशिवाय चांद्रयान, गगनयान आणि अशा कितीतरी मोहीमा आहेत ज्या लवकरच येत आहेत. त्याबाबत मोदींचे कौतुक करावे तितके थोडे आहे. भारताने विज्ञानाची ही झेप घेतली आहे ती अन्य क्षेत्रात प्रगती करत ही बाब येथे महत्वाची आहे. नुकतीच भारताची पहिलीवहिली हायड्रोजन ट्रेन सुरू झाली आणि विक्रम १ चे उड्डाण अवकाशात प्रक्षेपित झाले. आता खासगी क्षेत्रही अंतराळ क्षेत्रात मोठी झेप घेईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. व्यावसायिक अंतराळ अर्थव्यवस्थेला गती देत 'विक्रम-१' भारताच्या स्पेस क्षेत्रासाठी नवे पर्व ठरणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, उपग्रह प्रक्षेपणाचा खर्च लक्षणीयरीत्या कमी करून भारताचा जागतिक लघु उपग्रह प्रक्षेपण बाजारातील वाटा वाढविण्यास या रॉकेटची मोठी मदत होणार आहे. संपूर्ण कार्बन रचना वापरल्यामुळे रॉकेटचे वजन कमी झाले आहे, तर ३-डी प्रिंटेड इंजिन्समुळे उत्पादनासाठी लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. या प्रक्षेपण यानाला 'कॅब टू स्पेस' अशी संकल्पना देण्यात आली आहे. जशी केंब सेवा प्रवास सोपा, जलद आणि सुलभकरते, त्याचप्रमाणे उपग्रहांना अंतराळात पोहोचविण्याची ही एक विश्वासार्ह आणि वेळ वाचवणारी सेवा ठरणार आहे. 'विक्रम-१'च्या पहिल्या उड्डाणाला 'आगमन' हे नाव देण्यात आले आहे. संस्कृतमध्ये 'आगमन' म्हणजे 'येणे' किंवा 'नव्या पर्वाची सुरुवात' आहे. 'विक्रम-१'च्या यशस्वी उड्डाणामागे अनेक तांत्रिक आव्हाने होती. प्रगत कार्बन कॉम्पोझिट रचना आणि ३-डी प्रिंटेड इंजिनच्या निर्मितीत उच्च दर्जाचे गुणवत्ता नियंत्रण राखावे लागले. या सर्व अडथळ्यांवर मात करत स्कायरूट एरोस्पेसने भारताच्या खासगी अंतराळ क्षेत्रात नवा इतिहास रचला. सुमारे सात मजली इमारतीएवढे उंच असलेले हे रॉकेट पृथ्वीपासून सुमारे ३५० किलोमीटर उंचीवरील कक्षेत सुमारे ३५० किलो पेलोड नेले तर २०३३ पर्यंत ४४ अब्ज अंतराळ अर्थव्यवस्था जाण्याची भारताला आशा आहे. आता भारताची स्पर्धा इलन मस्क यांच्या स्पेस एक्स या अंतराळ कार्यक्रमाशी आहे आणि आता या क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. आतापर्यंत रॉकेट निर्मितीचे काम प्रामुख्याने इस्त्रोकडे होते; मात्र प्रथमच एका खासगी कंपनीने कक्षीय रॉकेट विकसित करून यशस्वी कामगिरी केली आहे. हजारो वैज्ञानिक, अभियंते आणि तंत्रज्ञांच्या परिश्रमातून हे यश साकार झाले. स्कायरूटने 'विक्रम-१'ला 'कॅब टू स्पेस' ही संकल्पना दिली आहे. त्यामुळे विविध कंपन्यांना कमी खर्चात आणि कमी कालावधीत उपग्रह अंतराळात पाठविण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. 'विक्रम-१'च्या यशस्वी उड्डाणाने भारताच्या अंतराळ क्षेत्राची ताकद सर्व जगाला दाखवून दिली आहे. आतापर्यंत देशातील अंतराळ क्षेत्रावर इस्त्रोचे वर्चस्व होते. मात्र, स्कायरूट एरोस्पेसने खासगी क्षेत्राची क्षमता सिद्ध करत भारताच्या व्यावसायिक अंतराळ उद्योगासाठी नवे दालन खुले केले. उड्डाणापूर्वी काही तांत्रिक अडचणी आल्याने प्रक्षेपणाला विलंब झाला, तरी अखेर 'विक्रम-१'ने यशस्वी झेप घेत खासगी उद्योगाचे सामर्थ्य सिद्ध केले. यापुढे स्कायरूटसमोर काही मोठी आव्हाने आहेत. लहान उपग्रह प्रक्षेपणाची जागतिक बाजारपेठ अत्यंत स्पर्धात्मक असून अनेक आंतरराष्ट्रीय स्टार्टअप्स या क्षेत्रात कार्यरत आहेत. तसेच रॉकेट निर्मिती आणि प्रक्षेपण हा मोठ्या भांडवली गुंतवणुकीचा उद्योग आहे. या आव्हानांवर मात करून भारत या क्षेत्रात भक्कम स्थान निर्माण करेल, असा विश्वास 'विक्रम-१'ने दिला आहे. देशातील खासगी क्षेत्राने विकसित केलेले पहिले कक्षीय रॉकेट, संपूर्ण कार्बन तंत्रज्ञानावर आधारित रॉकेट आणि भारतातील सर्वात लांब मोनोलिथिक कार्बन कॉम्पोझिट रॉकेट अशी त्याची वैशिष्ट्ये आहेत. भारताच्या अंतराळ प्रवासातील हा ऐतिहासिक टप्पा असून, देशाची मान अभिमानाने उंचावणारी ही घटना ठरली आहे.

# ..आणि झुरळांनी मोदींची खुर्ची हलवली!

**अण्णा हजारेंच्या आंदोलनामध्ये तोंडघशी पडलेल्या अनेकजणांनी नव्या उत्साहाने याही आंदोलनात उडी घेतली होती. पुन्हा पाय मोडून घेण्याचा धोका होता. हळुहळू कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन फ्लॉप होणार अशी चिन्हे दिसू लागली. सोनम वांगचूक यांच्या उपोषणाच्या सोळाव्या दिवसापर्यंत त्याची कुणीही दखल घेतली नव्हती. सतराव्या दिवशी चर्चा सुरू झाली आणि दोन दिवसांत आंदोलन टिपेला पोहोचले देशभर हवा झाली...**



दिल्लीत असे दृश्य यापूर्वी कधीच पाहिले नव्हते.हे विलक्षण आहे.अद्वितीय आहे. मित्रांनो,मी अत्यंत भावुक आहे; पण तितकाच सजगही.याक्षणी राजकारण आपल्या मर्यादित भूमिका विसरून जणू थबकून उभे आहे.संसदेला स्वतःच्या घटनात्मक आणि लोकशाही वैधतेसाठी आता या निष्पाप, निरागस, चिंताग्रस्त मुला-मुलींच्या, तरुणांच्या संमतीची आस लागली आहे.हे उसळणाऱ्या सागराचे दृश्य आहे. चारही दिशांतून असंख्य नद्या अखंड वाहत येत आहेत आणि त्या सागरात विलीन होत त्याला अधिक विशाल, अधिक समृद्ध करत आहेत.इथे कुणीही सेलिब्रिटी नाही. आहेत ती फक्त मुले-मुली. त्यांचे आई-वडील, आजी-आजोबा. त्यांचे मित्र, त्यांच्या मैत्रिणी.भिजलेल्या मनाने इतकेच म्हणू इच्छितो..

आजची, वीस जुलैची ही तारीख इतिहासाच्या शिलालेखावर कोरली जात आहे.देशाच्या अंतरंगात, राष्ट्राच्या आत्म्यात..देशाचे आणि राष्ट्राचे भविष्य वाचवण्यासाठी उभे राहिलेले हे एक उत्कट,अहिंसक, विनम्र आंदोलन आहे. जणू फुलांच्या पाकळ्यांचा, वृक्षांच्या आणि रोपट्यांच्या कोवळ्या पानांचा प्रतिकार कोमल, पण अढळ!

वीस जुलै.. संशयाचा लवलेशही न ठेवता, हा दिवस नोबेल शांतता पुरस्काराचा दावेदार ठरावा!आज आपल्या डोळ्यांसमोर कवितांपेक्षाही विराट अशी एक कविता साकार होत आहे.तिला आपण 'क्रांती' म्हणावे का?की तिच्यासाठी अजून एखादा नवा शब्द जन्माला घालावा लागेल?भारतातले एक श्रेष्ठ कवी उदय प्रकाश यांनी राजधानी दिल्लीतले आजचे आंदोलन पाहिल्यानंतर व्यक्त केलेल्या या भावना आहेत. देशातील कुणाही संवेदनशील माणसाच्या प्रातिनिधिक भावना म्हणून त्याकडे पाहता येईल.

हा देश नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांचा गुलाम झाला आहे. विरोधी पक्षातून निवडून आलेल्या आमदार, खासदारांनी स्वतःला बाजारात उभे केले आहे. स्वतःची विक्री करून खोका-पेटीमध्ये रकमा घेऊन डझनावारी आमदार खासदार मोदी-शाहा यांचे गुलाम बनले आहेत. अनेकजणांनी स्वतःला विकून टाकले आहे आणि त्याला कपाळावर विकासाचे लेबल चिकटवले आहे. मोदी-शाहांनी त्यासाठी एकनाथ शिंदेसारखे एजंट नेमले आहेत. जे लोकप्रतिनिधी अजून विकले गेलेले नाहीत, त्यातलेही अनेकजण स्वतःला विकायला तयार आहेत. समोरून बोली लावण्याचीच वाट पाहताहेत जणू. लोकशाहीतला अत्यंत किळसवाणा प्रकार देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निष्क्रियतेमुळे सुरू आहे. हे म्हणजे नुसते लोकप्रतिनिधी विकले जात नाहीत, तर या भंगार माणसांनी लोकशाहीचाच लिलाव मांडला आहे. संसदेत त्यांना बहुमत हवे आहे. तीन चतुर्थांश बहुमत. कशासाठी तर सत्तेचा ताम्रपट आजन्म आपल्याकडे राहावा म्हणून.

**'तुम से पहले वो जो इक शख़्स यहाँ तख़्त-नशीं था, उस को भी अपने ख़ुदा होने पे इतना ही यक़ीं था।'**

क्रांतिकारी शायर हबीब जालिब यांचा हा शेर गेल्या बारा वर्षांत अनेकदा उच्चारला गेला. परंतु शायराचे स्वप्न आणि वस्तुस्थिती यांचा परस्पर संबंध नसतो, असे वाटण्याजोगी परिस्थिती देशात निर्माण झाली होती. हा शेर आजवर लोकशाहीवादी लोक, विरोधक म्हणत होते.परंतु आज ख-या अर्थाने सत्ताधा-यांना हा शेर आठवला असावा.आपल्या खुर्चीखाली कधीही बॉम्ब फुटू शकतो आण त्यात आपली सत्ता उद्धवस्त होऊ शकते, याची जाणीव गेल्या बारा वर्षांत नरेंद्र मोदी यांना पहिल्यांदाच झाली असावी. त्याचमुळे एकीकडे तरुणांचा जत्था संसदेकडे कूच करीत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी मागच्या दाराने संसद भवनातून पलायन करीत होते.आणि आजवर गोदी मीडिया म्हणून हिणवल्या जाणा-या वृत्तवाहिनीच्या पडद्यावर ब्रेकिंग न्यूज येत होती..पंतप्रधानांना सुरक्षितपणे संसदेच्या बाहेर काढण्यात आले.

अलीकडच्या काळात श्रीलंकेत जनतेचा उद्रेक पाहिला. नेपाळमध्ये तरुणांचा असंतोष दिसून आला. बांगला देशातही तिथल्या सत्तेला उद्रेकाचा फटका बसला.त्या..त्यावेळी भारतात असे काही घडू शकत नाही. घडू शकणार नाही, असा ठाम विश्वास सत्तेतले आणि सत्तेबाहेरचे लोकही व्यक्त करीत होते. कारण भारतात नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे.त्यांच्याकडे अमित शाह यांच्यासारखे पोलादी गृहमंत्री आहेत. सरदार वल्लभभाई पटेल यांच्याहून टणक. आणि ते चाणक्य आहेत. त्यांचा नाद कुणी करू शकत नाही.ते कुणालाही मॅनेज करू शकतात. कुणावरही डाव उलटवू शकतात. ते कुणालाही तुरुंगात डांबू शकतात. ते कुणाचाही एन्काऊंटर करू शकतात. ते कुणालाही हार्ट अटॅक आणू शकतात. ५६ इंच छातीचा टेंभा मिरवला जातो नरेंद्र मोदींच्या.परंतु त्या छातीत हवा भरण्याचे काम करतात अमितभाई शाह असेच मानले जाते. त्यामुळे कुणाची बिशाद आहे त्यांना चॅलेंज करण्याची.

तर हे दोघे सत्तेचा अमरपट्टा घेऊन आलेत. लवकरच मोदींना राष्ट्रपतीच्या खुर्चीवर बसवले जाणार आणि अमित शाह पंतप्रधान होणार अशी हवा आहे. अर्थात ते लवकरच घडेलही. पण लोकशाही सुळावर चढवून सत्तेचा अमरपट्टा मिरवणे तेवढे सोपे नाही, हे त्यांना कळून चुकले.. ती तारीख आहे २० जुलै २०२६.

खरंतर कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाबाबत सुरुवातीपासून संशयाने पाहिले जात होते. सरन्यायाधीशांचे तरुणांच्या संदर्भाने एक विधान आले आणि त्यावर एक मीम तयार झाले. त्यातून एका डिजिटल पार्टीचा जन्म झाला. तिचे फॉलोअर्स कोटींची उड्डाणे घेऊ लागले. नीट परीक्षेतल्या गोंधळाने त्यांना मुद्दा मिळाला. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली. सोनम वांगचूक येऊन मिळाले. म्हणजे डिट्टो २०११ चा सीन तयार झाला. अरविंद केजरीवालांच्या भूमिकेत अभिजित दिपके आणि अण्णा हजारेंच्या भूमिकेत सोनम वांगचूक. पण दोन्हींमध्ये मूलभूत फरक होता. केजरीवाल यांनी अत्यंत सुनियोजित पद्धतीने आंदोलन उभे केले होते. मूळच्या झी टीव्हीच्या मनीष सिसोदिया यांनी परफेक्ट मीडिया मॅनेजमेंट केली होती. सोशल मीडिया हाताळणारी नवी पिढी जोडून घेतली होती. शिवाय पडद्यामागून आरएसएसची ताकद होती. सोबत अनेक मोठी नावे होती. याउलट कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात कोणतीही सुसूत्रता नव्हती. नियोजन नव्हते. आणि मागणीही तत्कालीन स्वरुपाची मर्यादित होती. अण्णा हजारेंच्या आंदोलनामध्ये तोंडघशी पडलेल्या अनेकजणांनी नव्या उत्साहाने याही आंदोलनात उडी घेतली होती. पुन्हा पाय मोडून घेण्याचा धोका होता. हळुहळू कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन फ्लॉप होणार अशी चिन्हे दिसू लागली. सोनम वांगचूक यांच्या उपोषणाच्या सोळाव्या दिवसापर्यंत त्याची कुणीही दखल घेतली नव्हती. सतराव्या दिवशी चर्चा सुरू झाली आणि दोन दिवसांत आंदोलन टिपेला पोहोचले देशभर हवा झाली. सोनम वांगचूक यांच्या प्रकृतीची देशवासीयांना काळजी वाटू लागली. जे मराठी कलाकार एरव्ही असल्या गोष्टींपासून दूर असतात त्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला. अतुल कुलकर्णी, एक दिवसाचे उपोषण केले. सयाजी शिंदे, गिरिजा ओक, स्पृहा जोशी, हेमंत ढोमे, ऋतुजा बागवे, शाल्मली खोब्रागडे, सुव्रत जोशी, योगिता चव्हाण इत्यादींनी समर्थन केले.

गेल्या तीन-चार दिवसांतच सगळा माहोल झाला आणि देशभर वातावरण ढवळून निघाले. राजकीय पक्ष पाठिंबा देऊ लागले. वीस तारखेला संसदेवरील मोर्चाची घोषणा झाली. देशभरातून लोक दिल्लीला निघाले. एकीकडे हे कॉक्रोच पार्टीचे आंदोलन सुरू असताना त्याहून अधिक पटींनी मोठी आंदोलन देशभरात काँग्रेसने केली. एनएसयुआयचे राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखड यांच्या नेतृत्वाखाली हजारो विद्यार्थ्यांची आंदोलन देशाच्या कानाकोप-यात झाली. अनेक ठिकाणी त्यांच्यावर पाण्याचे फवारे मारले. कुठे लाठीमार झाला. पाठोपाठ युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यांच्या नेतृत्वाखाली मोर्चे काढण्यात आले. काँग्रेसच्या या दोन्ही युवा शाखांनी देशभरातले वातावरण ढवळून काढले. दुर्दैवाने मेनस्ट्रीम मीडियाने त्यांची दखल घेतली नाही. याउलट दिल्लीत जंतर मंतरवर मर्यादित प्रमाणात सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाची अधिक चांगली दखल घेतली जात होती. मेनस्ट्री मीडियाने याही आंदोलनाची उपेक्षा करण्याचा प्रयत्न केला. पण राजधानी दिल्लीत सुरू असलेल्या या आंदोलनाची एका मर्यादेपलीकडे उपेक्षा करणे शक्य नव्हते. त्यामुळे अगदी सोमवारी सकाळपर्यंत आंदोलनाला माफक प्रसिद्धी देणा-या हिंदी वृत्तवाहिन्या १८० अंशात फिरल्या. जेव्हा तरुणांनी पोलिसांचे अडथळे पार करून संसदेकडे कूच केली, तेव्हा त्यांच्यापुढे फुल्ल कव्हरेजवाचून पर्याय उरला नाही.

सोनम वांगचूक यांनी उपोषण मागे घेण्यासंदर्भात केलेल्या निवेदनाने रविवारी रात्री गोंधळ उडवून दिला. तडजोडीची भाषाच त्यात दिसून येत होती. सोमवारी सकळी अभिजित दिपकेनं उपोषण मागे घेऊन आणखी गोंधळ उडवून दिला. प्रश्न शिक्षणाचा आणि आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्याशी चर्चेसाठी आंदोलक तयार झाले यावरूनही संभ्रम निर्माण झाला. पण दरम्यानच्या काळात दिल्लीतले आंदोलन कॉक्रोच जनता पार्टीच्या नियंत्रणात राहिले नव्हते. देशभरातून आलेल्या तरुणांनी ते हातात घेतले होते. सभोवती कोंडाळे करून लाठीमार करणारे सुरक्षा जवान आणि लाठ्या झेलत ठामपणे उभा राहिलेला तरूण, जखमी अवस्थेत रक्त वाहात असतानाही शहीद होण्याची भाषा करणारा तरूण अशी अभूतपूर्व दृश्यं दिल्लीच्या रस्त्यावर दिसली.

बाहेर हे सगळ सुरू असताना संसदेचे कामकाज अनेकदा तहकूब करण्यात आले. आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी सुरक्षितपणे संसद भवनातून बाहेर पडले. देशाच्या पंतप्रधानांना संसदेत असुरक्षित वाटावे, अशी परिस्थिती निर्माण झाली. तेही अगदी मर्यादित स्वरुपातल्या एका आंदोलनाने. कुठलेही संघटित स्वरुप नसलेल्या या आंदोलनाने. त्यामुळेच वाटते, ही सरकारच्या विरोधातल्या असंतोषाचा हा फक्त टीझर होता. ट्रेलरही नव्हता. ट्रेलर प्रदर्शित होईल, तेव्हा मिल्ट्रीला बोलावावे लागेल. आज पंतप्रधानांना संसद भवन सोडून जावे लागले. संपूर्ण पिक्चर रिलीज होईल तेव्हा काय घडेल, याची कल्पना केलेली बरी.

पाशवी बहुमत आणि यंत्रणांच्या बळावर सगळ्यांना नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न करणा-या मोदी-शाह यांना या आंदोलनाने चांगला धडा दिला आहे. केवळ शिक्षण व्यवस्थेतल्या गोंधळावर एवढा मोठा हादरा बसू शकतो. लोकशाहीशी खेळ करण्याचा प्रयत्न केला तर भविष्यात फार मोठी किंमत मोजावी लागेल.

खरेतर भारताच्या सर्वोच्च न्यायालयानंही धडा घ्यायला हवा. सर्वोच्च न्यायालय हे सामान्य माणसाचे शेवटचे आशास्थान आहे. परंतु देशातली ही सर्वोच्च संस्थाही सत्ताधा-यांच्या ओंजळीने पाणी पिताना दिसते. लोकशाहीला कड्याच्या टोकावर ढकलत नेण्यात न्यायव्यवस्थेनंही मोठी भूमिका बजावली आहे. झाले एवढे पुरे झाले. न्यायव्यवस्थेने लक्षात ठेवायला हवे की, आपली बांधिलकी संविधानाशी आहे. सत्ताधा-यांशी नाही. योगेंद्र यादव म्हणाले की, अमेरिकेत जसे ऑक्युपाय वॉल स्ट्रीट आंदोलन झाले, तसे देशातल्या तरुणांनी ऑक्युपाय पार्लमेंट केले.

न्यायालये सुधारली नाहीत, तर उद्या ऑक्युपाय सुप्रीम कोर्ट आंदोलन झाले तरी आश्चर्य वाटणार नाही, असे मला वाटते.देशातली तरुणाई थंड पडली आहे. तिच्या संवेदना गोठून गेल्या आहेत. या प्रचाराला दिल्लीतल्या आजच्या आंदोलनाने छेद दिला आहे. अहिंसक मार्गाने झालेल्या या आंदोलनाने लोकशाही रक्षणासाठीची एक खिडकी उघडली आहे.

अगर सड़कें खामोश हो जाएंगी, तो संसद आवारा हो जाएगी। असे राममनोहर लोहिया यांनी म्हटले होते. त्याच संदर्भाने - जब संसद खामोश हो जाए तब सड़कों पर गूँज सुनाई देनी चाहिए! म्हटले जाते. आणि दीर्घ प्रतिक्षेनंतर अखेर तो आवाज रस्त्यांवरून उमटला आणि त्याने संसदही हादरून गेली.

**-विजय चोरमारे**

# विद्यार्थी आंदोलन तेव्हा आणि आता...

मी १९९० सालच्या काश्मीर बचाव आंदोलनात भाग घेतला होता. जेमतेम सोळा-सतरा वर्षांचा विद्यार्थी होतो तेव्हा. देशात काहीतरी सकारात्मक बदल घडला पाहिजे,ह्या तळमळीने त्या आंदोलनात उडी मारली होती. देशभरातून आम्ही दहा-बारा हजार विद्यार्थी जम्मूमध्ये जमलो. तिथून पुढे उधमपुरपर्यंत गेलो. उधमपुरमध्ये आम्हाला अटक झाली. आम्हाला जम्मूच्या तात्पुरत्या तुरुंगामध्ये ठेवले. मी त्या तात्पुरत्या तुरुंगात दोन रात्री काढल्या.तिथून आम्हाला सोडल्यावर,आम्ही सगळे दिल्लीला आलो.दिल्लीला तेव्हाच्या पंतप्रधानांच्या घरासमोर आम्ही निदर्शने करायला बसलो.पंतप्रधानांचे प्रतिनिधी आमच्या समोर आले.आमच्याशी चर्चा केली.आमचे निवेदन स्वीकारले. आणि त्यावर आम्ही नक्की काम करू, असे आश्वासन दिले. मग आम्ही आमचे आंदोलन आटोपून आपापल्या घरी परत आलो.

देशभरातून जम्मूला जाताना, जम्मूहून उधमपुरला जाताना, उधमपुरला आम्हाला अटक करताना, पुढे दोन दिवस तुरुंगात ठेवलेला असताना, नंतर दिल्लीला पंतप्रधानांच्या घरासमोर निदर्शने करताना कुठेही, कधीही, केव्हाही पोलिसांनी आमच्यावर लाठीहल्ला केला नाही. अश्रुधूर सोडले नाहीत आणि कोणत्याही प्रकारची मारहाण आणि जबरदस्ती केली नाही. आम्हा कोवळ्या विद्यार्थ्यांना कोणीही 'देशद्रोही' म्हटले नाही. परदेशातून 'funding' मिळते, म्हणून करतायत, म्हणले नाही. विद्यार्थी आहेत; त्यांना देशासाठी जे करावे असे वाटते, ते करतायत. असाच एकूणात सुर होता मीडियामध्ये.

शिवाय, आपल्या घरासमोर जमलेले कोवळ्या वयाचे विद्यार्थी बघून तेंव्हाचे पंतप्रधान घरातून घाबरून पळून गेले नाहीत. उलट, आपले प्रतिनिधी पाठवून आमचे म्हणणे ऐकून घेतले आणि त्यावर आम्हाला काम करू असे सांगितले.माझा भारताच्या लोकशाहीवरचा विश्वास हा त्या कोवळ्या वयात ह्या आंदोलनात भाग घेतल्याने दृढ झाला.

कट टू...

आजच्या विद्यार्थी आंदोलनाबद्दल फार काही बोलत नाही. जे घडले ते आपण सगळ्यांनी बघितलेच आहे. त्याबद्दल आपली सगळ्यांची अत्यंत ठाम मते सुद्धा आहेत. एकच वाईट वाटते..मी ज्या विद्यार्थी संघटनेद्वारे ह्या विद्यार्थी आंदोलनात भाग घेतला होता, त्यांच्याच मातृपक्षाचे सरकार आज सत्तेत आहे. विरोधात असताना आपण आंदोलने करू शकायचो,आणि त्यांना लोकशाही मार्गाची 'treatment' मिळायची, हे ते आता विसरले आहेत. आणि कोणत्याही प्रकारची शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यांना ते आता लाठ्या काठ्यांनी झोडपण्याचा आणि अश्रुधुरांनी गुदमरवून टाकण्याचा प्रयोग करत आहेत. वर, आपल्या या दडपशाहीकडे बघून, 'वा वा, छान छान!' असे म्हणत टाळ्या पिटणाऱ्या भक्त मंडळींची फौज त्यांनी उभी केली आहे.

कट टू...

गेल्या तीसेक वर्षांमध्ये आपल्या देशात घडलेला हा बदल. अत्यंत तलमळीने आंदोलन करणाऱ्या १६-१८-२० वर्षांच्या मुलांशी बोलून त्यांच्याशी संवाद साधणाऱ्या सरकारपासून ते त्यांना लाठ्या काठ्यांनी झोडपून हाकलून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकारपर्यंत.आणि विद्यार्थ्यांना जेव्हा आपण झोडपतो, तेव्हा आपल्या देशाच्या भविष्याला झोडपत असतो, हे विसरलेल्या सरकारपर्यंत...

हॅप्पी लोकशाही टू एव्हरीवन!

**- प्रसाद शिरगावकर**

# विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घ्यावी

आज विद्यार्थ्यांवर जे घडले, ते केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नाही, तर भारताच्या संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर झालेला गंभीर आघात आहे. शिक्षण, अभिव्यक्ती आणि शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार अक्षरशः पायदळी तुडवला गेला. न्याय मागण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांना लाठीमार सहन करावा लागला, ही कोणत्याही लोकशाहीसाठी चिंताजनक बाब आहे.

अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेणे आवश्यक आहे. कारण जेव्हा सामान्य नागरिकांचे मूलभूत अधिकार धोक्यात येतात, तेव्हा न्यायव्यवस्थेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते.

जर न्यायाची मंदिरेही अशा वेळी शांत राहिली, तर अन्यायग्रस्त नागरिकांनी न्यायासाठी कोणाच्या दारात जावे?

लोकशाहीत सरकारची सत्ता ही जनतेच्या सेवेसाठी असते, जनतेचा आवाज दडपण्यासाठी नव्हे. विद्यार्थ्यांवर लाठी उगारणे ही कोणत्याही संवेदनशील लोकशाहीची ओळख असू शकत नाही.

आज प्रश्न केवळ विद्यार्थ्यांचा नाही; प्रश्न आहे भारताच्या संविधानाचा,लोकशाही मूल्यांचा आणि प्रत्येक नागरिकाच्या अधिकारांचा. न्यायव्यवस्थेने वेळेत हस्तक्षेप केला, तरच जनतेचा न्यायावरचा विश्वास कायम राहील.

**एक वाचक**

बुधवार, दि. २२ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# आजपासून जिल्हाभर 'महाराजस्व समाधान' शिबिरांची सुरुवात..!

## एकाच छताखाली महसूल सेवा, महिलांना शेतकरी दर्जाचे प्रमाणपत्र

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २१ :** महसूल विभागाच्या सेवा अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याला आज (२२ जुलै) पासून यवतमाळ जिल्ह्यात प्रारंभ होत आहे.

२२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघांमध्ये ही शिबिरे आयोजित करण्यात आली असून, नागरिकांना विविध महसूल सेवा व शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून दिला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्याला मिळालेल्या प्रतिसादानंतर दुसरा टप्पा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली.शिबिरामध्ये शासनाच्या विविध महत्त्वाच्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष दिला जाणार आहे. यामध्ये महिलांना शेतकरी दर्जाचे प्रमाणपत्र वाटप, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे, तुकडेबंदी कायद्यांतर्गत स्थानिक क्षेत्र घोषणा, जिवंत सातबारा मोहीम, सिंधी विस्थापितांसाठी फ्री-होल्ड विशेष अभय योजना, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल लाभार्थ्यांसाठी विशेष तरतूद, कुंभार समाजासाठी व्यवसाय सवलती तसेच कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क माफी आदी योजनांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाने शिबिरांच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना दिल्या असून, प्रत्येक लाभार्थ्याला विहित कालावधीत सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. आज यवतमाळ येथील पोस्टल ग्राउंड आणि घाटंजी येथील सुपुनाथ मंगल कार्यालयात शिबिरांना प्रारंभ होणार असून, त्यानंतर कळंब, दारव्हा, उमरखेड, पुसद आणि वणी येथे नियोजित तारखांना शिबिरे पार पडतील. जिल्ह्यातील शेतकरी, महिला आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले.

# वंचित बहुजन आघाडीचे 'जोडे मारो' आंदोलन, मोदी सरकारवर जोरदार टीका

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २१ :** दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी, जिल्हा यवतमाळच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कार्यालयासमोर 'जोडे मारो' आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्रातील मोदी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदविण्यात आला.

डॉ.नीरज वाघमारे म्हणाले, "लोकशाहीत विद्यार्थ्यांना शांततामय आंदोलनाचा घटनात्मक अधिकार आहे. त्यांच्या आवाजाला लाठीच्या बळावर दडपण्याचा प्रयत्न हा लोकशाहीवरील आघात असून संबंधित घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भारताच्या राष्ट्रपतींना निवेदन देत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासह आंदोलनकर्त्यांवरील कारवाई मागे घेण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनात जिल्हा उपाध्यक्ष विशाल पोले, सचिन राऊत, शैलेश भानवे, महासचिव शिवदास कांबळे, संजय इंगळे, संघटक संतोष मसराम, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख गजानन कोकाटे, शहराध्यक्ष प्रसन्नजीत भवरे, शहर कार्याध्यक्ष प्रमोद पाटील, शहर उपाध्यक्ष उत्तम कांबळे, शहर महासचिव विलास वाघमारे, नितेश पाटील, शहर संघटक रामदास वीर, तसेच पुष्पाताई शिरसाट, भारती सावते, सुशीला गजभिये, इंदुताई सांगडे, नंदा भगत, विजया लोखंडे, शिलाताई अंबादे, संजय तेलतुमडे, उत्तम मेश्राम, नामदेव घोरपडे, आनंद टिपले, वैभव वासनिक, सुनील काळबांडे, लवेश वाठोरे, राहुल लंगोटे, थावरू वैद्य यांच्यासह जिल्हा, तालुका व शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# "पूल नव्हे, पुराला निमंत्रण? ढिसाळ नियोजनामुळे पुसद शहर पुराच्या छायेत"

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २१ :** पुसद-दिग्रस मार्गावरील पुस नदीवरील नव्या पुलाच्या बांधकामा बाबत गंभीर तांत्रिक प्रश्न उपस्थित होत आहेत. पुलाची उंची वाढविण्यात आली असली, तरी दोन्ही बाजूंना उभारण्यात आलेल्या सुमारे १०० मीटर लांबीच्या आणि ५ फूट उंच संरक्षक भिंतीमुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

नदीचे पाणी अडविले गेल्यास त्याचा फटका थेट पुसद शहरातील प्रभाग क्र. १, २, ६, ९ आणि १३ ला बसू शकतो. जलशुद्धीकरण केंद्रासह अनेक निवासी भाग पाण्याखाली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. माजी पाणीपुरवठा सभापती तथा विद्यमान नगरसेवक राजू दुधे यांनी या संभाव्य धोक्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. त्यांच्या मते, पूर्वीच्या पुरस्थितीचा अभ्यास, जलप्रवाहाचे वैज्ञानिक विश्लेषण आणि पूररेषेचा विचार न करता केवळ रस्त्याची लेव्हल जुळविण्याच्या दृष्टीने बांधकाम करण्यात आले आहे. हा मुद्दा केवळ राजकीय नसून नागरिकांच्या सुरक्षिततेशी थेट संबंधित असल्याने प्रशासनाने त्याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. दरवर्षी पावसाळ्यात पुस नदीला पूर येत असल्याचा इतिहास लक्षात घेता, संभाव्य आपत्ती घडून गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा आताच तज्ज्ञ समितीकडून पुलाच्या आराखड्याचे पुनर्परीक्षण करणे गरजेचे आहे. आवश्यक असल्यास संरक्षक भिंतींच्या रचनेत बदल, अतिरिक्त जलवाहिन्या किंवा प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी तांत्रिक उपाय तातडीने राबविणे आवश्यक आहे. विकासकामे नागरिकांच्या सुरक्षेसाठी असतात; त्यांच्या जीवित आणि वित्तहानीचे कारण ठरण्यासाठी नव्हेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद आणि संबंधित प्रशासनाने तात्काळ संयुक्त पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी. निष्काळजीपणामुळे भविष्यात पूरस्थिती निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई करणेही तितकेच आवश्यक ठरणार आहे.

# बोगस बंगाली डॉक्टरांचे जाळे फोफावली..!

## चौकशी करून कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २१ :** तालुक्यात बोगस बंगाली डॉक्टरांचे मोठे जाळे कार्यरत असून त्यांच्या उपचारांमुळे नागरिकांच्या आरोग्याशी गंभीर धोका निर्माण होत असल्याचा आरोप करत जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) तसेच अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीत अवैध दवाखाने तातडीने बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

एकता पत्रकार संघ, महागावचे उपाध्यक्ष किशोर राऊत यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, महागाव सह मुडाणा, सवना, वाकोडी, धारमोहा, काळी (दौ.) व फुलसावंगी परिसरात वैद्यकीय परवान्याशिवाय काहीजण उपचार करत आहेत. हे कथित बोगस डॉक्टर रुग्णांना औषधे देणे, इंजेक्शन देणे, सलाईन लावणे आदी उपचार करत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, तालुका आरोग्य अधिकारी व आरोग्य विभागातला लिपिक जळकुटे यांच्या संगनमतामुळे या अवैध दवाखान्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने त्यांचीही चौकशी करण्यात यावी. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अशा कथित बोगस डॉक्टरांविरोधात विशेष मोहीम राबवून दवाखाने सील करावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयात २० जुलै रोजी प्राप्त झाली असून संबंधित विभागांकडून पुढील कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे.

# थोडक्यात



## डोंबिवली डॉक्टर मारहाण प्रकरणी निमा यवतमाळ तर्फे काळी फीत लावून निषेध...!

**यवतमाळ :** कल्याण डोंबिवली, मुंबई महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात दि. ०६/जुलै/२०२६ रोजी कर्तव्य बजावत असलेल्या डॉक्टर, महिला डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारींवर काही राजकीय पक्षांचे कार्यकर्त्यांनी अमानुषपणे मारहाण करून शिविगाळ करत गोंधळ घातला. याप्रकरणी नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन तर्फे दि. २०/जुलै/२०२६ रोजी सर्व आय. एस. एम. डॉक्टरांनी एकदिवसीय राज्यव्यापी सेवाबंद संप पुकारला होता, परंतु मा.उच्च न्यायालयाने केलेल्या विनंती चा मान राखून संप मागे घेतला. परंतु या प्रकरणी निषेध दर्शविण्याकरीता आज सर्व नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन शाखा यवतमाळ चे सदस्य डॉक्टर शांततेच्या मार्गाने आपल्या दवाखाना वा हॉस्पिटलमध्ये काळी फीत लावून सेवा प्रदान केली, तसेच निमा यवतमाळ चे सर्व पदाधिकारी दत्त चौक, यवतमाळ येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून शांततेत निषेध नोंदवला.

## लोकनेते स्व.मामासाहेब शिलार यांची जयंती उत्साहात साजरी

**उमरखेड :** येथील स्थानिक श्री शिवाजी विद्यालय पोफाळी येथे लोकनेते, सहकार महर्षी स्व.नारायणराव ऊर्फ मामासाहेब शिलार यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि आदरपूर्वक साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्व.मामा साहेब शिलार यांच्या शैक्षणिक, सहकार आणि सामाजिक क्षेत्रातील अमूल्य योगदानाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक एस.टी.सूर्यवंशी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक अवधूत देवसरकर,सतीश नाईक,शेख बाबुभाई, महेश कंठाळे,रवि शिलार आणि विजय बरडे पर्यवेक्षक सुरेश सुरोशे प्रामुख्याने उपस्थित होते.प्रेरणादायी अशा या सोहळ्याची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते स्व.मामासाहेब शिलार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलन करून झाली. तसेच मुख्याध्यापक अवधूत देवसरकर, माणिक कांबळे, प्रविण सुर्यवंशी व इतर प्रमुख पाहुण्यांनीही मामासाहेबांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे संचलन माणिकराव कांबळे यांनी तर आभार विनोद मस्के यांनी मानले या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात या जयंती सोहळ्याची सांगता झाली.

# तीरळेपणावर 'नयनतारा'तून विद्यार्थ्यांना मोफत शस्त्रक्रियेची संधी..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २१ :** शालेय विद्यार्थ्यांमधील तीरळेपणाचे (भेंगडेपणा) प्रमाण कमी करून त्यांना निरोगी दृष्टी देण्याच्या उद्देशाने यवतमाळ जिल्ह्यात 'नयनतारा' हा विशेष आरोग्य उपक्रम राबविण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहायता निधी, जिल्हा प्रशासन आणि विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम हाती घेण्यात आली असून, ५ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची जिल्हाभर नेत्र तपासणी केली. जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत कार्यरत वैद्यकीय पथके जिल्ह्यातील शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करतील. तपासणीत तीरळेपणाची समस्या आढळलेल्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञ डॉक्टरांकडे उपचारासाठी पाठविण्यात येणार आहे. उपचारासाठी पात्र ठरणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यावर पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, या शस्त्रक्रिया यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेत्रसेवा प्रतिष्ठान, पुणेच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून केल्या जाणार आहेत. या अभियानासाठी आवश्यक आर्थिक साहाय्य जिल्हा उपनिबंधक (सहकार) कार्यालयाकडून उपलब्ध करून दिले जाणार आहे. वेळेत उपचार झाल्यास मुलांची दृष्टी सुधारण्याबरोबरच त्यांचा आत्मविश्वास, शैक्षणिक प्रगती आणि सामाजिक सहभागही वाढण्यास मदत होणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि आरबीएसके पथकांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविला जाणार असून, सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. 'नयनतारा' उपक्रमातून यवतमाळ जिल्हा तीरळेपणामुक्त करण्याचा संकल्प प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# मुख्याधिकारी च्या खुलाशावर संतोष बोरले यांचा पलटवार..!

## घनकचरा निविदा, रेल्वे निधी व विकासकामांवर गंभीर प्रश्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २१ :** नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांनी प्रसिद्ध केलेला खुलासा दिशाभूल करणारा असून त्यामध्ये वस्तुस्थिती लपविण्यात आल्याचा आरोप न.प.सदस्य सामाजिक कार्यकर्ते संतोष बोरले यांनी पत्रकार परिषदेत केला.

घनकचरा व्यवस्थापन निविदा, रेल्वे विभागाच्या निधीचा विनियोग, नालेसफाई, रस्ते व पॅचेस वर्कची कामे यासंदर्भात त्यांनी पाच मुद्द्यांवर सविस्तर भूमिका मांडली. बोरले यांनी सांगितले की, घनकचरा निविदेत कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतनानुसार वेतन, ईपीएफ, विमा तसेच ठेकेदाराने दरमहा वेळेवर पगार देणे बंधनकारक करण्याचा सर्वसाधारण सभेतील मंजूर ठराव असूनही त्या अटी निविदेत समाविष्ट करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असून शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर ही परिणाम होत असल्याचा त्यांचा दावा आहे. रेल्वे विभागाच्या निधीबाबत मुख्याधिकाऱ्यांनी सर्वसाधारण सभेची मंजुरी असल्याचा दावा केला असला, तरी असा कोणताही ठराव झालेला नसल्याचे बोरले यांनी सांगितले. हा निधी प्रभागांतील विकासकामांसाठी वापरण्याऐवजी घनकचरा कंत्राटाच्या देयकांसाठी वळविल्याचा आरोपही त्यांनी केला. नालेसफाई व रस्त्याच्या पॅचेस वर्कच्या कामांबाबत ही मंजुरी, निविदा व कामाच्या आदेशां मध्ये विसंगती असल्याचा दावा करत, पावसाळ्यात सुरू करण्यात आलेल्या कामांच्या गुणवत्तेवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. संबंधित कामांमध्ये आर्थिक अनियमितता झाल्याची शंका व्यक्त करून याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व अन्य संबंधित कायद्यां अंतर्गत तक्रार दाखल करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. दरम्यान, बोरले यांनी केलेले आरोप हे त्यांचे वैयक्तिक म्हणणे असून, याबाबत मुख्याधिकारी ची अधिकृत भूमिका यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या खुलाशात मांडण्यात आली आहे. संबंधित प्रकरणातील वस्तुस्थिती सक्षम चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे.

| |
|---|
| क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/७६२/२०२६ |
| तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड |
| दिनांक: १७/०७/२०२६ |
| **जाहीरनामा** |
| सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद अकबर सय्यद मुसा रा.उमरखेड ता.उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची स्वताची जन्म दि-०१/१२/१९८० मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.<br>उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक-३०.०७.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.<br>स्वा/-<br>तालुका दंडाधिकारी, उमरखेड |

| |
|---|
| क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/७६५/२०२६ |
| तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड |
| दिनांक: १७/०७/२०२६ |
| **जाहीरनामा** |
| सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद अफजल सय्यद मुसा रा. उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांची स्वताची जन्म दि-०१/०१/१९७९ मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.<br>उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ३०.०७.२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.<br>स्वा/-<br>तालुका दंडाधिकारी, उमरखेड |

# लोहारा खून प्रकरणाचा अखेर निकाल..!

## चार आरोपींना जन्मठेप, दोन जणांची निर्दोष मुक्तता

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २१ :** जिल्ह्यात गाजलेल्या लोहारा येथील खून प्रकरणात तब्बल सहा वर्षांनंतर न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत चार आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. मा. जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ यांनी सोमवारी (दि. २१ जुलै) लोहारा पोलीस ठाण्यातील गुन्हा क्र. १०८/२०२० (सत्र प्रकरण क्र. ७१/२०२०) मध्ये हा निर्णय दिला.

न्यायालयाने सिद्धार्थ उर्फ सिद्धू रामदास वानखेडे, दीपक उर्फ भैय्या राममनोहर यादव, सिद्धांत उर्फ सिद्धेश्वर उर्फ हेमंत राजेश रेवेकर आणि अजय धर्माजी वासनिक या चौघांना भारतीय दंड संहिता कलम ३०२ सह ३४ अंतर्गत दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा तसेच प्रत्येकी दोन हजार रुपयांचा दंड ठोठावला. दंड न भरल्यास सहा महिन्यांचा सश्रम कारावास भोगावा लागणार आहे. याच प्रकरणातील अन्य दोन आरोपींची मात्र पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. या गंभीर गुन्ह्याचा प्रारंभीचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लुले यांनी केला, तर पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एस. आर. जायभाय यांनी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयीन सुनावणीदरम्यान सरकारी अभियोक्त्यांनी प्रभावी युक्तिवाद मांडत पुरावे भक्कमपणे सादर केल्याने दोष सिद्ध होण्यास मदत झाली. खटल्याच्या यशस्वी पाठपुराव्यासाठी लोहारा पोलीस ठाण्याचे ठाणेदार API चौधरी यांनी मार्गदर्शन केले, तर कोर्ट पैरवी अधिकारी ASI भगत यांनी सुनावणीदरम्यान आवश्यक समन्वय साधला. या निकालामुळे गंभीर गुन्ह्यांच्या तपासात शास्त्रशुद्ध पुरावे, प्रभावी न्यायालयीन पैरवी आणि काटेकोर तपास यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले असून, न्यायव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, अशी प्रतिक्रिया पोलीस प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली.

# ३६ वर्षांपासून हक्काच्या नमुना 'ड'साठी संभाजीनगर वासीयांची फरफट..!

## शेकडो नागरिकांचा प्रशासनाला जाब

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २१ :** पुसद शहरातील नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ११ मधील संभाजीनगर (इंदिरा वसाहत) येथील रहिवाशांना तब्बल ३६ वर्षांपासून हक्काचा नमुना 'ड' मिळत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. १९८९-९० मध्ये नगरपरिषदेने स्थलांतरित करून दिलेल्या जागेवर वास्तव्यास असलेल्या नागरिकांना आजही आवश्यक दस्तऐवजापासून वंचित राहावे लागत असून त्यामुळे घरकुलासह विविध शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.या प्रश्नाकडे प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने महिलांसह पुरुषांनी २० जुलै रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय व नगरपरिषद कार्यालयावर धडक देत तीव्र नाराजी व्यक्त केली. उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी आणि मुख्याधिकारी यांना शेकडो नागरिकांच्या सह्यांचे निवेदन सादर करण्यात आले. विशेष म्हणजे, येथील नागरिक नियमितपणे नगरपरिषदेला कर भरत असून त्याच्या पावत्याही दिल्या जातात. मात्र कर स्वीकारणारे प्रशासन रहिवाशांना नमुना 'ड' देण्याबाबत उदासीन असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रश्नी तातडीने निर्णय घेऊन सर्व पात्र नागरिकांना नमुना 'ड' उपलब्ध करून द्यावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही रहिवाशांनी दिला आहे. निवेदनावर अनिल पवार, राजू गुळवे, अशोक मेटकर, वंदना मुनेश्वर यांच्यासह शेकडो नागरिकांच्या सह्या आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### चांदूर बाजारात विद्यार्थी व नागरिकांचा मोर्चा

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा केला निषेध

**चांदूर बाजार/वार्ताहर**

दिल्ली येथील जंतर-मंतरवर शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर २० जुलै रोजी झालेल्या लाठीचार्ज व अश्रुधुराच्या वापराच्या निषेधार्थ आज चांदूर बाजार येथे शांततापूर्ण मोर्चा काढण्यात आला.

छत्रपती शिवाजी चौकातून दुपारी १२ वाजता निघालेल्या मोर्चा तहसील कार्यालय मध्ये पोचून तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात जंतर-मंतर येथील घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याच्या अधिकाराचे संरक्षण करावे तसेच विद्यार्थ्यांना न्याय देऊन त्यांच्या



## तहसीलदारांसमोर मांडल्या समस्या

भविष्यासोबत होणारा अन्याय तात्काळ थांबवावा, अशा मागण्या निवेदनातमधून करण्यात आल्या.यावेळी 'विद्यार्थ्यांवर लाठी नव्हे, न्याय द्या!' अशा घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी निषेध व्यक्त केला. यावेळी प्रहार संघटनेचे तालुका प्रमुख प्रदीप भाऊ बंड, नगरसेवक सचिन खुळे, जिल्हा संपर्कप्रमुख संतोष भाऊ किटूकले, मंगेश देशमुख, नगरसेवक मुजफ्फर हुसेन तसेच मनीष नागलिया, नगरसेवक नरेंद्र वानखडे, मनीष एकलारे, आशिष झटाले, स्टेला जवंजाळ, मंगेश लेंडे, मोहम्मद तनवीर अहमद, एजाज अली, गोपाल वानखडे, नगर परिषद उपाध्यक्ष अब्दुल रहेमान, हेमंत कोंडे, आशिष बंड, कृष्णा निंभोरकर, प्रफुल बोकसे, ऋषिकेश पोहकार, निखिल ठाकरे, शुभम खेळ, वेदांत मातकर ,सौरभ खुळे, युवराज बँड, मनोज कडू, ओमप्रकाश बँड, आशिष पानसे, ऋषभ साबळे, यांच्यासह अहिल्याबाई होळकर प्रहार वाचनालयातील विद्यार्थी, जगदंबा स्कूल मधील विद्यार्थी, नगरपरिषद शाळेमधील विद्यार्थी तसेच इतरही विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### नीट, टीईटी व यूजीसी-नेट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी

# महिला प्राचार्य संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

नीट, टीईटी व यूजीसी-नेट यांसारख्या महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांमधील वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांबाबत तीव्र चिंता व्यक्त करत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती परिक्षेत्रातील महिला प्राचार्य संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना निवेदन देण्यात आले.



या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत असून प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. अशा घटनांमुळे परीक्षा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होत असून शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हताही कमी होत आहे.वर्षानुवर्षे कठोर परिश्रम करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण झाले असून, गुणवत्तेत झालेल्या मोठ्या फेरफारामुळे नॅशनल टेस्टिंग एजन्सी वरील त्यांचा विश्वास पूर्णपणे उडाला आहे. विद्यार्थी सध्या मानसिक नैराश्याचा सामना करत आहेत. संघटनेने या प्रकरणांची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक सुरक्षा उपाययोजना राबवाव्यात आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, अशी मागणी केली आहे.विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि गुणवत्ता आधारित शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास अबाधित राखण्यासाठी शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी विनंती महिला प्राचार्य संघटनेने जिल्हाधिकारी यांना केली.यावेळी महिला प्राचार्य संघटनेच्या अध्यक्ष डॉ. संयोगिता देशमुख, उपाध्यक्ष डॉ. आराधना वैद्य व डॉ. वर्षा देशमुख,सचिव डॉ. वनिता काळे, कोषाध्यक्ष डॉ. अंजली ठाकरे ,सहसचिव डॉ. माधुरी फुले, तसेच कार्यकारिणी सदस्य डॉ. शोभा रोकडे, डॉ. सुचिता खोडके, व विविध महाविद्यालयाच्या महिला प्राचार्य उपस्थित होत्या.

## संक्षिप्त



### आषाढी एकादशीनिमित्त १३० महिलांना मोफत शेगाव दर्शन

**अचलपूर-** शहरातील जीवनपुरा परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून गरजू,गरीब व शेतमजूर महिलांना आषाढी एकादशी व गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने मोफत शेगाव दर्शन वारी घडवून आणण्यात आली. महिलांना संत गजानन महाराजांचे दर्शन घेता यावे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी एसटी महामंडळाच्या बसची व्यवस्था करण्यात आली असून तब्बल १३० महिलांनी शेगाव येथे संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले.सकाळी अचलपूर नगर परिषद माजी उपाध्यक्ष अनिल पिंपळे यांच्या हस्ते बसचे पूजन करून हिरवी झेंडी दाखवून दर्शनवारीला सुरुवात करण्यात आली. या उपक्रमासाठी प्रविण कुचे,मिलिंद राऊत, वैभव बोबडे, रोहण नाचणे, सारिका आसोलकर, माधुरी उघडे, मनीषा निंबोरकर आदींनी सहकार्य केले.

### जुळ्या शहराचा पाणीपुरवठा दोन दिवस राहणार बंद

**अचलपूर-** जलवाहिनीला गळती लागल्याने अचलपूर-परतवाडा जुळ्या शहराचा पाणीपुरवठा येत्या गुरुवार २३ व शुक्रवार २४ जुलै रोजी बंद राहणार आहे. जलवाहिनी दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्याने नागरिकांनी पाण्याचा आवश्यक साठा करून ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. अशी माहिती नगर पालिकेच्या वतीने देण्यात आली.

### विशेष लोक अदालतीत २२९ प्रकरणांचा निपटारा

**अमरावती-** जिल्हा व सत्र न्यायालय येथील विशेष लोक अदालतीतमध्ये २२९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. याप्रकरणात ४ कोटी १३ लाख रुपयांच्या तडजोडीतून न्याय निवाडा करण्यात आला आहे. या लोक अदालतीमध्ये प्रामुख्याने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत येणाऱ्या 'धनादेश बाऊन्स' प्रकरणांवर तडजोडीसाठी भर देण्यात आला होता. संपूर्ण जिल्ह्यातून या उपक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या कार्यात जिल्हा न्यायाधीश-१ ए. जी. जोशी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, वकील वर्ग, बँक व पतसंस्थांचे प्रतिनिधी तसेच पक्षकारांचे सहकार्य लाभले.

# युवा शेतकऱ्याचा वीज कोसळून मृत्यू

**खल्लार/वार्ताहर**

गोळेगाव येथिल ३६ वर्षीय युवा शेतकऱ्याचा शेतातून घरी परत येत असतांना अंगावर विज कोसळून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना काल (२०) रोजी सायंकाळच्या सुमारास घडली.



प्रविण सुभाषराव चव्हाण (३६) हे युवा शेतकरी काल सायंकाळी शेतातील कामे आटोपून घरी परतत असतानाच त्यांच्या अंगावर विज कोसळली व त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.या अचानक घडलेल्या दुर्घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रविण चव्हाण हे एक कष्टाळू, होतकरू आणि प्रगतशिल युवा शेतकरी म्हणून परिसरात परिचित होते. त्यांच्या पत्नी या गोळेगावच्या विद्यमान सरपंच असून गावाच्या विकासकामांमध्ये दोघांचाही सक्रिय सहभाग होता. गावातील प्रत्येक सामाजिक, धार्मिक व सार्वजनिक उपक्रमात ते उत्स्फूर्तपणे सहभागी होत असत. त्यांच्या अकाली निधनाने चव्हाण कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गोळेगाव शोकसागरात बुडाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन वर्षाचा मुलगा आहे.

# महावितरण प्रशासनाविरोधात आजपासून धरणे

**अमरावती-** महावितरणच्या शहर विभागीय कार्यालयाकडून मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांवर व सदस्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. संघटनेच्या वतीने २१ जुलै रोजी द्वारसभा, २२ जुलै रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार असून, २३ जुलैपासून परिमंडळ अध्यक्ष तथा सहायक अभियंता अरविंद बोन्द्रे हे बेमुदत उपोषण करणार असल्याची घोषणा करण्यात आली.

संघटनेच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, अरविंद बोन्द्रे यांनी परिमंडळ समन्वयक म्हणून काम करताना सौर ऊर्जा क्षेत्रात अमरावती परिमंडळाला राज्यात प्रथम क्रमांक मिळवून दिला.त्यांच्या कार्याची दखल घेत महावितरणच्या व्यवस्थापकीय संचालकांकडून प्रशस्तीपत्रही देण्यात आले.तरीही बदली प्रक्रियेत त्यांना इच्छित पदस्थापना नाकारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष विशाल सिरसाट, महिला सदस्य अर्चना छापाने आणि कार्तिक गुल्हाने यांनाही न्याय मिळाला नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. दुसरीकडे इतर संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना इच्छित ठिकाणी बदली देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. १४ जुलै रोजी प्रशासनाला दिलेल्या नोटिशीनंतरही प्रश्न सोडविण्यासाठी कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

परिमंडळ बैठकीत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. बैठकीस केंद्रीय उपाध्यक्ष राहुल सांभारे, परिमंडळ अध्यक्ष अरविंद बोन्द्रे, परिमंडळ सचिव रत्नदीप तायडे, सहसचिव सूरज मेश्राम, मंडळ अध्यक्ष निखिलेश गजभिये, मंडळ सचिव मिलिंद भगत, विभागीय अध्यक्षा वंजारी, विशाल सिरसाट, विनय आठवले, धम्मपाल राजगुरे, अर्चना छापाने आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी मोर्चा

**खल्लार/वार्ताहर**

नवी दिल्लीतील जंतर मंतर येथे समाजसेवक सोनम वांगचूक यांनी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या आंदोलनाला पाठींबा म्हणून व देशात निट परीक्षेचे पेपर लिक झाले. त्यामुळे २० हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. या विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी व उज्ज्वल भविष्यासाठी वंचित बहुजन आघाडी, दर्यापूर तालुक्याच्या वतीने गुरुवार दि २३ जुलै रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून यात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केल्या जाणार असून तश्या आशयाचे निवेदन तहसिलदार यांच्या मार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पाठविल्या जाणार आहे.

या मोर्चात दर्यापूर तालुक्यातील विद्यार्थी, पालक यांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष (पश्चिम )संजय चौरपगार व तालुकाध्यक्ष चंदू रायबोले यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय बुडो मार्शल आर्ट स्पर्धा

**अमरावती-** गुरुकुल व्यायाम शाळा, सातुर्ना अमरावती येथे २ री जिल्हास्तरीय बुडो मार्शल आर्ट स्पर्धेचे आयोजन बुडो मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष शिहान लहू पारवे व तांत्रिक अधिकारी शिहान संतोष कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व अमरावती जिल्हा बुडो मार्शल आर्ट असोसिएशनचे अध्यक्ष सेंसेई उमेश मोवळे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. उत्कृष्ठ खेळ दाखवून यश संपादित करीत बुडो मार्शल आर्ट स्पर्धा उत्साहात संपन्न केल्या. कार्यक्रमाप्रसंगी माजी स्थायी समिती सभापती तुषार भारतीय, अमरावती जिल्हा बुडो मार्शल आर्ट असोसिएशनचे अध्यक्ष सेन्सेई उमेश भा. मोवळे, उपाध्यक्ष चेतन वाटनकर, सचिव विशाल चव्हाण, सह-सचिव सागर मेश्राम, कोषाध्यक्ष आशिष वाघमारे, सदस्य जय कारंजकर, पिंकी प्रजापती, अभिषेक कडू, मुकेश भोयर व विद्यार्थी यांच्या प्रयत्नातून स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न झाली.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पारितोषिक वितरण समारंभ

**अमरावती/का.प्र.**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठातील गाडगे बाबा अध्यासन केंद्र आणि समर्थ गुरुकृपा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी, शिंदे बुद्रुक यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगे बाबांच्या दुर्मिळ छायाचित्रांची प्रदर्शनी व निबंध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व तुकोबाराय साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ, प्रमुख अतिथी म्हणून गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे, उद्घाटक म्हणून सुधीर रसे, तर राजेंद्र पवार, देवेंद्र पेटकर, देवेंद्र लहाने व अरुण सारडे अतिथी म्हणून उपस्थित होते.

डॉ. सतीश तराळ म्हणाले, अण्णाभाऊ साठे हे लोकनाट्याचे जनक तसेच वेगळ्या आशय अभिव्यक्तीची कथा - कादंबरी लिहिणारे महान जनसारस्वत व शैलीकार होते. याप्रसंगी त्यांनी महात्मा फुले, संत गाडगे बाबा, संत तुकाराम महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. डॉ. दिलीप काळे यांनी



विद्यापीठाच्या परिसरात असलेल्या गाडगे बाबा अध्यासन केंद्राने गांव खेड्यापर्यंत पाहोचून संत गाडगे बाबांच्या विचारकार्याचा प्रचार व प्रसार केला असल्याचे सांगितले. याप्रसंगी गाडगे बाबा अध्यासना मार्फत राबवल्या जाणा-या गाडगे बाबा विचार साहित्य संमेलन, संत तुकाराम महाराज व संत गाडगे बाबा यांचे तुलनात्मक अध्ययन चर्चासत्र,सरपंच संमेलन,आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवा सन्मान सोहळा,सफाई कर्मचा-यांना जलशुद्धी यंत्र वितरण सोहळा इत्यादी विविध कार्यक्रमांचे आयोजन अध्यासनातर्फे करण्यात आल्याची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली.


आयोजित निबंध स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणा-या विविध गटातील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी गावातील सर्व शाळांमधील विद्यार्थी व गावकऱ्यांनी ग्रामसफाई केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष रोही ,आशिष वाठ, उमेश मुळे, तन्मय वाठ राजश्री सचिन कुरळकर, सच्चिदानंद प्रफुल्ल वाठ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी भरत राजेंद्र लहाने, मंगेश सांगोळे, सचिन लहाने, कविता विशेष पेटकर, संकेत अपाले, आयुष्य रोही, रामेश्वर इंगोले इत्यादी मंडळी उपस्थित होती.संचालन संकेत यांनी तर आभार प्रदर्शन मंगेश सांगोळे यांनी केले.

### 'ज्याने पाहिला विठ्ठल' या गाण्याचे २४ जुलैला प्रसारण

# अरुण सांगोळे,अमित चंद्रमोरे आणि अमृता जोशी यांची भक्तिमय कलाकृती

**अमरावती/का.प्र.**

येथील प्रसिद्ध कवी आणि गीतकार, गझलकार



प्रा अरुण सांगोळे यांनी लिहिलेल्या 'ज्याने पाहिला विठ्ठल ' या भक्तिमय गाण्याचे येत्या २४ जुलैला मोरया फिल्म या युट्युब चॅनेलवर प्रसारण होत आहे. मोरया फिल्मची ही निर्मिती असून संगीतकार अमित चंद्रमोरे यांची प्रभावी संगीत शैली आणि गायिका अमृता जोशी यांच्या भक्तिमय सादरीकरणाने सजलेले, विठ्ठल भक्तिने ओतप्रोत भरलेले हे हृदयस्पर्शी गीत रसिकांच्या सेवेत अर्पण होत आहे. विठ्ठल नामाचा गजर,टाळ मृदंगाचा नाद आणि वारकरी संप्रदायाची भक्ती अशी वैशिष्ट्ये असलेल्या या आषाढ वारीच्या पावन पर्वावर हे गीत सादर होत आहे. आषाढ वारी, विठ्ठल भक्ती आणि वारकरी संप्रदायाचा दिव्य अनुभव देणाऱ्या या गाण्याला संगीतकार अमित चंद्रमोरे यांनी नाविन्यपूर्ण सुरावट दिली आहे. गायिका अमृता जोशी यांनी कविच्या शब्दाला योग्य तो न्याय दिला असून अमित चंद्रमोरे



यांनी ब्रह्मनादाचा प्रत्यय येईल अशा सुरांची बांधणी केल्यामुळे हे गीत श्रवणीय झाले आहे. या गाण्याचे संगीत संयोजन मुंबई येथील अमित पाध्ये यांचे असून ध्वनीमुद्रण अभिजीत धारणे यांनी ट्यून इन रेकॉर्डिंग स्टुडिओ, नाशिक येथे केले आहे. या गाण्यासाठी स्टेल्ला ॲंथोनी आणि अंजली चंद्रात्रे यांनी कल्पकरित्या कोरस दिल्यामुळे गाणे कमालीचे झाले आहे. मुंबई येथील प्रशांत कांबळे यांनी ध्वनीमिश्रणाची महत्वपूर्ण जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली. महेश खर्जुल यांनी सदर गाण्याचे पोस्टर डिझाइन तयार केले आहे. हे गीत आषाढी एकादशीच्या पर्वावर समाजमाध्यमांतून प्रसारित होत असून माऊलीच्या भक्तांना नक्कीच आवडेल, अशी प्रतिक्रिया या गाण्याचे कवी अरुण सांगोळे यांनी सदर प्रतिनिधीजवळ व्यक्त केली.

# प्रवाशांच्या समस्यांची परिवहन मंत्र्यांकडून दखल

### पाच वर्षापासून बंद असलेल्या बस सुरू करण्याचे परिवहन मंत्र्यांचे निर्देश

**अंजनगाव सुजी/वार्ताहर**

प्रवासी नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक सरनाईक यांनी गेल्या पाच वर्षापासून बंद असलेल्या बस गाड्या सुरू करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे.

कोरोना काळामध्ये परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अंजनगाव सुर्जी आगारातून सकाळी सहा वाजता जाणारी अंजनगाव -पांढरकवडा, अंजनगाव- वर्धा अशा काही लांब पल्ल्याच्या गाड्या बंद केल्या होत्या. जवळपास पाच वर्षापासून ह्या गाड्या बंद होत्या. वारंवार प्रवाशांनी या गाड्या सुरू करण्याबाबत मागणी केली होती. परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे प्रवाशांची फार मोठी गैरसोय झाली होती. गेल्या पाच वर्षापासून अंजनगाव बस स्थानकामधून जाणाऱ्या सदर बस गाड्या पाच वर्षापासून बंदअसल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री सरनाईक यांना मिळताच त्यांनी प्रादेशिक परिवहन महामंडळाच्या नागपूर आणि अमरावती येथील विभागीय व्यवस्थापकांना सदर बस गाड्या तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले. त्याप्रमाणे आज दिनांक २० जुलै रोजी पाच वर्षापासून बंद असलेली वर्धा- अंजनगाव ही बस गाडी सुरू झाली असून अंजनगाव- पांढरकवडा सुद्धा लवकरच सुरू होणार असल्याचे समजते.



पुलगाव आगाराची ही बस गाडी वर्धा येथून सकाळी नऊ वाजता अंजनगाव सुर्जी निघून अडीच ते तीनच्या वाजताच्या दरम्यान सदर बस गाडी अंजनगाव सुर्जी बस स्थानकात येऊन दुपारी तीन वाजता वर्धा कडे जात होती.परंतु परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सदर बस गाडी अंजनगाव येथून जाताना पुलगाव पर्यंतच करून टाकली असल्याने पुन्हा प्रवासी नागरिकांची गैरसोय झाली आहे. ही बस गाडी पूर्वीप्रमाणे मार्गक्रम असलेल्या ठिकाणावरूनच सुरू ठेवावी अशी प्रवासी नागरिकांची मागणी आहे.

पुलगाव वरून वर्धेला प्रवासी मिळण्यासाठी सदर गाडीचा वेळ बदलविण्यात येऊन वर्धा येथून सकाळी नऊ वाजता सुटणारी बस गाडी वर्धा येथून सकाळी सात आठ वाजता च्या दरम्यान सोडावी म्हणजे परतीच्या प्रवासाला सदर बस गाडीला पुलगाव वरून वर्धा कडे जाणारे प्रवासी मिळतील. अंजनगाव-वर्धा ही बस गाडी परिवहन महामंडळाला उत्पन्न देणारी गाडी असल्याचे समजते.

नामदार प्रताप सरनाईक परिवहन मंत्री यांनी अंजनगाव वर्धा आणि अंजनगाव पांढरकवडा ह्या पाच वर्षापासून बंद असलेल्या बस गाड्या सुरू करण्याबाबत तातडीने दखल घेतल्या बाबत प्रवासी नागरिकांनी त्यांचे आभार मानले असून अंजनगाव बस स्थानकातून लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्याची मागणी सुद्धा केली आहे.वर्धा-अंजनगाव ही बंद असलेली बस गाडी तब्बल पाच वर्षानंतर अंजनगाव बस स्थानकात आल्याबद्दल सदर बसचे चालक नंद प्रसाद ठाकरे आणि वाहक सदानंद गुल्हाने यांचे पत्रकार अशोक पिंजरकर, अकबर अली यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या प्रसंगी पत्रकार प्रवासी नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचा संताप; विरोधकांना आधार

**'नीट' पेपरफुटीने देशातील विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता आता राजकीय आंदोलनाचा मुद्दा बनत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांना मिळालेली ही संधी आणि महाराष्ट्रातील बदलती राजकीय समीकरणे यामुळे या आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



नीट पेपरफुटीने देशातील विद्यार्थी अस्वस्थ झाले. आंदोलन सुरू झाले आहे. दिल्लीत जंतरमंतर येथे आंदोलन केले की सत्तापालट होतो, ही अण्णा हजारे यांच्या जनलोकपाल विधेयकाची पार्श्वभूमी विरोधकांच्या स्मरणात आलेली दिसते. पुढच्या तीन वर्षांनी होणाऱ्या निवडणुकांकडे लक्ष देऊन आता फुटलेले पेपर आणि त्यामुळे निर्माण झालेली अस्वस्थता ही विरोधकांना आंदोलनाची योग्य संधी वाटते आहे. खरे तर आप पक्षाशी पूर्वी संबंधित असलेल्या अभिजित दीपके यांनी या आंदोलनाला प्रारंभ केला. त्यांना सोशल मीडियावर उत्तम प्रतिसाद मिळाला. आंदोलनाला मिळणारा पाठिंबा प्रत्यक्ष गर्दीत परावर्तित होण्यासाठी त्यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना आवाज दिला. ते विविध कारणांमुळे प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांना समवेत घेऊन आंदोलन करायचा हा निर्णय आता विरोधकांनी आपल्या उपयोगात आणायचा निर्णय घेतलेला दिसतो.

राजकारण असेच असते. महाराष्ट्रातील विरोधी पक्ष आंदोलनाच्या विषयांच्या शोधात होतेच. आठ खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेकडे निघून गेल्यामुळे शिवसेना उबाठा अस्वस्थ आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार विलीनीकरणाच्या दिशेने वाटचाल करण्यास राजी होती, असे काही संबंधित म्हणतात; पण अजित पवार गटाच्या ठाम विरोधामुळे निर्णय थांबला आहे. धर्मनिरपेक्षतेची साद घालत एनडीएकडे जाऊ नका, असे आवाहन इंडिया आघाडीने केले तर ज्येष्ठ नेते शरद पवार काय करतील? त्यांनी थांबायचे ठरवले तर खासदार साहेबांचे ऐकतील की भाजपच्या नेतृत्वातील एनडीएकडे सरकतील, अशी शंका घेतली जाते आहे. परिसीमन विधेयक लोकसभेत मांडले गेले तर शरद पवार यांच्या नेतृत्वातील ८ खासदार एनडीएच्या बाजूने मतदान करतील आणि मुद्द्यावर आधारित पाठिंबा यावर सध्याचा विषय संपेल, असेही म्हणतात. अर्थात, या जर-तरच्या गोष्टी आहेत. परिसीमन विधेयक मांडले गेले तर पुढे काय, हा प्रश्न उपस्थित होईल. सध्या फुटलेल्या पेपरने सरकारसमोर मोठाच प्रश्न निर्माण केला आहे आणि विरोधकांना आंदोलनाची संधी मिळाली आहे.

उबाठाला मुद्दा मिळाला. पुढच्या तीन वर्षांनी येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांची तयारी करायची हीच वेळ आहे, हे काँग्रेसलाही कळले आहे. सोनिया गांधी यांनी हस्तक्षेप करीत पक्षाला वांगचुक यांना पाठिंबा द्यायला लावला. इंदिरा गांधी यांनी वांगचुक यांच्या वडिलांचे उपोषण सोडवले होते, याचे पक्षकार्यकर्त्यांना स्मरण करून दिले. राहुल गांधी तरुणांना भेटून 'छात्रो की गुंज' हा कार्यक्रम राबवत आहेतच.

देशातील तरुणाई अस्वस्थ झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. नीट हा मेडिकल प्रवेशाच्या परीक्षांचा पेपर फुटला आणि त्यामुळे बारावीत असलेले विद्यार्थी पूर्णत: अस्वस्थ झाले. वैद्यकीय प्रवेशासाठी जो प्रचंड अभ्यास करावा लागतो त्या ताणाचा विचारही करणे बाहेरच्यांना अशक्य, अशी परिस्थिती असते. त्यातच एकदा परीक्षा दिल्यानंतर तो पेपर फुटला हे कळणे आणि तो पुन्हा नव्याने द्यावा लागणे, हे कठीण आहे. ज्याला ते सोसावे लागते त्याचे दुःख त्यालाच माहिती. विद्यार्थी बावचळून जातात आणि आधीच पाल्याच्या भविष्याबद्दल चिंतेत असलेले पालक बावचळलेल्या मुलांना आधार कसा द्यायचा, हे न समजल्याने अधिकच अस्वस्थ होतात. या पेपर फुटीनंतर लगेचच नीटची पुनर्परीक्षा झाली. निकाल लागले आणि वैद्यकीय प्रवेश सुरूही झाले. तरीही देशातील अस्वस्थ तरुण अद्याप शांत झालेले नाहीत, असे चित्र आहे.

खरे तर तरुण कधीच शांत होत नसतात. त्यांच्या अस्वस्थतेला चालना देणारे काही विधायक कार्यक्रम सामाजिक संस्थांना द्यायचे असतात. अशा पद्धतीचे कोणतेही कार्यक्रम सध्या तरुणाईसमोर नाहीत. जीव ओवाळून टाकावा अशा प्रकारचे ध्येय समोर नसेल तर तरुण पिढी अधिक अस्वस्थ होते. त्यामुळेच या अस्वस्थ पिढीने जे आंदोलन सुरू केले आहे त्याकडे सरकारने लक्ष द्यायला हवे. सर्वत्र या आंदोलनाचीच चर्चा आहे. महाराष्ट्रही या आंदोलनामुळे अस्वस्थ झाला आहे. मुळात या आंदोलनाला पाठिंबा किती जणांचा? यापेक्षा शांतता कशी निर्माण होईल, याची चर्चा व्हायला हवी. आंदोलनाचे पडसाद महाराष्ट्रात उमटताना दिसत आहेत. राजकीय भांडवल केले जाते आहे.

खरेतर केंद्र आणि राज्यातील राजकीय परिस्थिती वेगळी आहे. राज्यात सरकारकडे बहुमत आहे, मोठे बहुमत. २०१९ नंतरच्या राजकीय खेळाला उत्तर देणारे बहुमत, असे त्याचे युतीचे नेते वर्णन करीत. तरीही राज्यातील अस्वस्थता कमी होत नाही. आता राष्ट्रवादी काँग्रेसमधील हालचाली अस्वस्थतेचे कारण आहेत. केंद्रातील सरकारकडे बहुमत नाही. त्यामुळे परिसीमन विधेयकासारखी नवीन विधेयके आणताना त्यांना काही समीकरणे रचावी लागत आहेत. त्याचा अपरिहार्य परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर होतो आहे. केंद्रात नसले तरी इथे बहुमत आहे. तरीही अस्वस्थता आली, अशी परिस्थिती समाजात आहे. सरकारकडे बहुमत आहे. राज्यात तर इतके बहुमत आहे की, काहीही घडामोडी घडायची सुतराम शक्यता नाही. तरीही महाराष्ट्रात २०१९ पासून सुरू झालेल्या राजकीय चर्चा थांबायचे नावच घेत नाहीत. आता नव्याने राष्ट्रवादी विलीन होईल काय आणि त्याचा झाला तर काय फायदा होईल, या चर्चेतच महाराष्ट्राचे वर्तमान राजकारण गुंतले आहे.

अजित पवार यांच्या विचारावर विश्वास ठेवून त्यांच्या समवेतचे चाळीसहून अधिक आमदार निवडून आले. आमदारांची संख्या मोठी. अचानक अपघाती आणि दुर्दैवी परिस्थितीत हे जग सोडून गेलेल्या नेत्याचे निधन त्या पक्षाला बळकट करू शकते. नेता गेल्याचे दुःख तर असते; पण सहानुभूतीमुळे नेत्याचे राजकीय वारसदार आपोआपच नेते होतात. राजीव गांधी यांच्याबाबतचा असा अनुभव भारताने यापूर्वी घेतला आहे. राजीव उमदे होते. अनुनभवी होते. तुलना योग्य नाही; मात्र राजीव त्यानंतर जसे राजकारणात उभे झाले तसे पार्थ यांच्याबाबत होईल काय? पार्थ यांनी त्यांच्या आई उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा आधार होण्याची गरज आहे. येत्या काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसने बळकट व्हावे आणि अजित पवारांना मानणाऱ्या वर्गाची मते स्वतःकडे कायम राखावीत, अशीच समर्थक नागरिकांची इच्छा असेल. अजित पवारांच्या मृत्यूनंतर येणारी त्यांची पहिली जयंती लवकरच येते आहे. ते निमित्त महत्त्वाचे मानत पक्षविस्ताराच्या योजना आखता येतील.

राज्यात असे अस्थिर काही घडत असताना देशातील तरुणाई अस्वस्थ झालेली आहे. या अस्वस्थतेचे पडसाद वेगवेगळ्या स्तरावर येथेही उमटत आहेत. विरोधी पक्ष त्याचा लाभ घेत असताना मुळात सत्ता पक्ष नेमका काय करतो आहे आणि त्यासाठी तरुणांशी कशाप्रकारे संवाद साधला जाणार, यावरच पुढचे राजकारण अवलंबून असेल. जंतरमंतरवरील अण्णा हजारे यांचे आंदोलन आणि अभिजित दीपके यांचे आंदोलन हे संपूर्णतः वेगळे आहे. पुढे नक्की काय होते, ते येणाऱ्या काळात दिसेल. महाराष्ट्रही दिल्लीतल्या घटनांकडे लक्षपूर्वक पाहतो आहे!

**मृणालिनी नानिवडेकर**

# देशातील सर्व विद्यार्थी तरुणांचे अभिनंदन आणि आभार !

..देशातील शिक्षण क्षेत्राचा ज्वलंत विषय, गेली अनेक वर्ष चिखलात रुतून बसलेला होता, त्याचा गाडा किमान अंशतः का होईना, बाहेर काढल्याबद्दल,

..देशातील खऱ्याखोट्या अस्मिताकेंद्री प्रश्नांपेक्षा , राजकीय अर्थव्यवस्थेच्या गाभ्यातील खऱ्या खऱ्या प्रश्नांना पुन्हा अजेंड्यावर आणल्याबद्दल....

गेल्या दोन अडीच महिन्यातील घटनांची, (आणि त्या निमित्ताने झालेल्या चर्चांची) , पुनरुक्ती करण्याची गरज नाही. पण त्या घटना देशातील कोट्यवधी विद्यार्थी / तरुण वर्गाच्या मनात गेली अनेक वर्षे खदखदणाऱ्या असंतोषाच्या लाव्हावर पडलेली ठिणगी सिद्ध झाली हे खरे आहे.

गेले एकवीस दिवस देशातील विद्यार्थी, तरुणांचे विश्व या घडामोडींनी ढवळून निघाले. जरी गोदी मीडियाने ठरवून त्याची दखल घेतली नसली तरीही. काल २० जुलै रोजी या विद्यार्थी तरुणांनी 'चलो संसद'चा नारा देत संसदेवर मोर्चा काढण्याचे जाहिर केले. त्या आवाहनाला अपेक्षेपेक्षा प्रचंड प्रतिसाद मिळाला. दिल्ली शिवाय देशातील अनेकानेक शहरात आंदोलने, धरणे जाहीर सभा असे कार्यक्रम घेतले गेले. या सर्व कार्यक्रमात सहभागी झालेल्यांची एकत्रित संख्या काही लाख असू शकते. फार पुर्वतयारी नाही. साधनसामुग्री नाही. तरीदेखील हे घडले! अनेक अर्थाने ही खूप मोठी आणि विश्वास देणारी घटना आहे.

कालच्या एका दिवसातील दिल्लीतील जंतरमंतर वरीलच नाही तर संपूर्ण देशातील विद्यार्थी तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हेच सांगत आहे, की देशातील विद्यार्थी आणि तरुण, त्यांच्या जीवनाची, भवितव्याची जी काही हेळसांड सुरू आहे त्यामुळे प्रचंड अस्वस्थ आहेत. त्यासाठी ते सोशल मीडियाच्या बाहेर येऊन रस्त्यावर उतरण्यास तयार आहेत. शासनाच्या दादागिरीला सामोरे जाण्यास तयार आहेत.हा मेसेज गेल्या दोन अडीच महिन्यात धिम्या गतीने उभ्या राहिलेल्या आंदोलनाचा निचोड आहे.

संपूर्ण आंदोलनबद्दल माझी देखील क्रिटिकल मते होती. आहेत. पण मनात कोणताही किंतू न बाळगता घडलेल्या प्रक्रियेचे स्वागत केले पाहिजे. सोशल मिडियावरील निषेधाचे ट्विटर स्टॉर्म नवीन नाहीत. ती वादळे उठतात आणि शमतात देखील. पण यावेळी तरुण सोशल मीडियावर निषेध नोंदवून थांबले नाहीत. अभिजीत दीपके यांनी पुढाकार घेऊन कॉकरोच जनता पार्टी स्थापन केली. दिल्लीत जंतरमंतरवर धरणे आंदोलन कार्यक्रम घोषित केला.

त्यानंतर त्या आंदोलनात सोनम वांगचुक यांनी सक्रिय सहभाग घेण्याचे जाहीर केले आणि आंदोलनाचा कार्यक्रम वेगळ्या उंचीवर गेला. जंतर-मंतरवर वांगचुक यांनी आमरण उपोषण आरंभले. त्यात डाव्या आणि आंबेडकरवादी पक्ष संघटनाच्या विद्यार्थी तरुणांच्या संघटना हिरीरीने सामील झाल्या. त्या संघटनातील अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींनी वांगचुक यांच्या बरोबर उपोषणात आपल्या जीवाची बाजी लावली.



देशाप्रती/ समाजाप्रती काहीएक बांधिलकी मानणाऱ्या निवडक साहित्यिक, पत्रकार, कलावंतांनी प्रत्यक्ष जाऊन, किंवा विविध व्यासपीठांवरून पाठिंबा दिला. भाजप व्यतिरिक्त जवळपास देशातील प्रत्येक राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला. या सर्वांनी राजकीय परिपक्वता दाखवली आहे.

कोणत्याही देशासाठी शिक्षण क्षेत्राचे स्थान आणि महत्व एकमेवद्वितीय आहे, व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय कोणत्याही दृष्टिकोनातून बघितले तरी. कारण त्यातून देशाचे, समाजाचे, अर्थव्यवस्थेचे भवितव्य ठरत असते. धिम्या गतीने उलगडत जाणारी दीर्घकालीन प्रक्रिया आहे ही.

ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन नुसार देशात आजच्या घडीला साडेचार कोटी मुले मुली उच्च शिक्षण घेत आहेत. त्यात देशातील बॉटम ऑफ पिरॅमिड मधील कुटुंबातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सतत वाढते आहे. हा आकडा हृदयात स्वप्ने आणि आकांक्षा घेऊन प्रौढ होणाऱ्या तरुणांचा आकडा आहे. त्यात दरवर्षी घट न होता तो वाढतच आहे.

हे आंदोलन जरी उच्च शिक्षण घेणाऱ्या , स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी सुरु केले असले तरी त्या निमित्ताने एकूणच शिक्षण क्षेत्राचे जे अनेक गंभीर प्रश्न आहेत ते ऐरणीवर आले पाहिजेत. अनेक वर्षांच्या दुर्लक्षामुळे त्याचा बॅकलॉग प्रचंड आहे. मोठी यादी करता येईल. देशाच्या जीडीपीच्या किमान सहा टक्के शिक्षण क्षेत्रावर खर्च व्हावेत असा नॉर्म असताना दरवर्षी दोन-तीन टक्क्यांपेक्षा जास्त खर्च होत नाहीये. फक्त एक टक्का वाढ केली तरी तीन लाख कोटी रुपये उपलब्ध होऊ शकतात. देशात फक्त गेल्या दहा वर्षात एक लाख शाळा बंद पडल्या आहेत. शिक्षण क्षेत्राचे लाज वाटावी एवढे व्यापारीकरण केले गेले आहे. शिक्षण काही एन्ड इन इटसेल्फ नाही. नसले पाहिजे. त्याचा संबंध रोजगार / बेरोजगारीशी आहे. देशात दरवर्षी १४० लाख तरुण रोजगार क्षेत्रात नव्याने भरती होत असतात. आणि रोजगार जेमतेम २० ते ३० लाख तयार होतात.

दोन अडीच महिन्यानंतर हे आंदोलन नक्कीच एका मैलाच्या दगडावर आले आहे. हे असेच एका सरळ रेषेत सुरु राहू शकणार नाही हे उघड आहे. पण यातून संपूर्ण देशात जी ढवळणूक झाली आहे, त्यातून जी ऊर्जा तयार झाली आहे, विद्यार्थी , तरुणांमध्ये जी जागृती तयार झाली आहे ती खूप मोलाची आहे. कारण हेच विद्यार्थी / तरुण या शतकातील भारत आहेत. कोणीही त्यांना सब्स्टीट्युट नाही. ती ऊर्जा देशातील एकूणच शिक्षण क्षेत्र अधिक विद्यार्थी केंद्री होण्यासाठी, शासनाला सर्वार्थाने अधिक जाबदायी बनवण्यासाठी कामी येईल अशी आशा आहे.

**संजीव चांदोरकर**

# वैचारिक दुटप्पीपणा आणि सोयीचे मौन!




दाक्षिणात्य राजकारणात नेहमीच नाट्यमय घडामोडी पाहायला मिळतात; मात्र तामिळनाडूत नुकत्याच घडलेल्या एका घटनेने केवळ त्या राज्याचेच नव्हे, तर देशातील राजकीय आणि वैचारिक दुटप्पीपणावर पुन्हा एकदा तीव्र प्रकाश टाकला आहे. मुख्यमंत्री व अभिनेते विजय यांच्यावर आगपाखड करणारे द्रमुकचे आमदार जी. व्ही. मार्कंडेयन यांच्यावर झालेली कायदेशीर कारवाई ही केवळ एका आमदाराची अंगलट आलेली कृती नाही, तर ती 'तमिळ वेत्री कळघम'च्या वाढत्या प्रभावामुळे प्रस्थापित राजकीय वर्तुळात निर्माण झालेली अस्वस्थता उघड करणारी घटना आहे.परंतु,या संपूर्ण प्रकरणातील सर्वात आक्षेपार्ह आणि चिंतेचा भाग म्हणजे सत्तारूढ काँग्रेसचे राहुल गांधी यांच्यासह समस्त पुरोगामी विचारवंत जे एरवी लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राजकीय सुसंस्कृतपणाचे गोडवे गातात..त्यांचे या विषयावर असलेले 'सोयीचे मौन'.केंद्र सरकार किंवा भाजपशासित राज्यांमध्ये एखादी क्षुल्लक घटना घडली, तरी तातडीने रस्त्यावर उतरणारे, वृत्तवाहिन्यांवर घसा कोरडा करणारे आणि 'लोकशाहीचा खून झाला' असा आरडाओरडा करणारे तथाकथित पुरोगामी विचारवंत, विधीतज्ज्ञ, डाव्या विचारसरणीचे पोशिंदे आणि बॉलिवूडमधील ठराविक मंडळी आज पूर्णपणे गप्प आहेत.हा दुटप्पीपणा आता जनतेच्या चांगलाच लक्षात आला आहे.

**अविनाश देशपांडे**

# किशोरवयीन मुले आणि एआयशी संवाद

**तंत्रज्ञानाचा विकास आणि मानवी विकास यांची सांगड घातली तरच आपण सुरक्षित, संवेदनशील आणि सक्षम डिजिटल पिढी घडवू शकू. हीच आपल्या मुलांच्या उज्ज्वल आणि सुरक्षित भविष्यासाठी सर्वात मोठी गुंतवणूक ठरेल. पालक, शिक्षक आणि समाजाने एकत्र येऊन डिजिटल साक्षरता वाढवणे, नैतिक वापर शिकवणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलांसाठी सुरक्षित आणि आश्वासक मानवी संवाद साधणे अपरिहार्य आहे.**

आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन आणि समाजमाध्यमांनंतर आता कृत्रिम बुद्धिमत्ता हे मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे सर्वांत परिवर्तनकारी तंत्रज्ञान ठरत आहे. या तंत्रज्ञानाचा सर्वाधिक जाणवणारा आणि सर्वसामान्यांना सहज उपलब्ध झालेला भाग म्हणजे एआय चॅटबॉट्स. हे संवादक्षम संगणकीय सहाय्यक आज शिक्षण, व्यवसाय, आरोग्य, मनोरंजन, संशोधन आणि वैयक्तिक मार्गदर्शन अशा अनेक क्षेत्रांमध्ये वापरले जात आहे. मानव हा स्वभावतः संवादप्रिय प्राणी आहे. हजारो वर्षे संवाद हा फक्त मानव ते मानव अशा स्वरूपात घडत होता., परंतु आज प्रथमच इतिहासात मानव आणि यंत्र यांच्यामध्ये नैसर्गिक भाषेत संवाद घडू लागला आहे. विशेष म्हणजे हा संवाद अनेकदा इतका सहज, प्रवाही आणि मानवी वाटतो की समोर प्रत्यक्ष व्यक्ती आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता याचा विसर पडतो. याच ठिकाणी टीनएज अर्थात किशोरवयीन मुलांच्या सुरक्षिततेचा आणि मानसिक विकासाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आजची किशोरवयीन पिढी जन्मापासूनच डिजिटल वातावरणात वाढत आहे. त्यांच्या हातात स्मार्टफोन आहे, त्यांच्या अभ्यासात इंटरनेट आहे आणि त्यांच्या मनोरंजनात डिजिटल माध्यमांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे एआय चॅटबॉट्स त्यांच्यासाठी नवी गोष्ट नसून दैनंदिन जीवनाचा भाग बनत आहेत. अनेक मुले अभ्यासासाठी, माहिती मिळवण्यासाठी, भाषा शिकण्यासाठी, कथा लिहिण्यासाठी किंवा केवळ गप्पा मारण्यासाठी चॅटबॉट्सचा वापर करत आहेत.

### चॅटबॉट्स हे प्रभावी साधन

योग्य वापर केल्यास एआय चॅटबॉट्स टीनएज मुलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांची शिकण्याची पद्धत आणि गती वेगळी असते. वर्गात शिक्षकांना सर्व विद्यार्थ्यांकडे समान लक्ष देता येणे नेहमीच शक्य नसते. अशावेळी एआय चॅटबॉट्स वैयक्तिक मार्गदर्शकाची भूमिका निभावू शकतात. गणितातील अवघड संकल्पना समजावून सांगणे, विज्ञानातील प्रयोगांचे स्पष्टीकरण देणे, इतिहासातील घटनांचा संदर्भस्पष्ट करणे किंवा भाषेतील व्याकरण शिकवणे यासाठी हे साधन प्रभावी ठरते. भाषिक कौशल्यांच्या विकासातही चॅटबॉट्स मोठी मदत करू शकतात. इंग्रजीसह विविध परदेशी भाषांचा सराव करण्यासाठी ते उत्तम साथीदार ठरतात. विद्यार्थ्यांना संवाद साधण्याचा आत्मविश्वास मिळतो. लेखन कौशल्य सुधारते. विचार मांडण्याची पद्धत विकसित होते. अनेक वेळा विद्यार्थी वर्गात प्रश्न विचारण्यास संकोच करतात; परंतु चॅटबॉट्ससमोर त्यांना असा संकोच वाटत नाही. सर्जनशीलतेच्या क्षेत्रातही या तंत्रज्ञानाने नवे दरवाजे उघडले आहेत. कथा, कविता, नाटिका, भाषणे, प्रकल्प अहवाल किंवा नवकल्पनांसाठी कल्पना शोधताना चॅटबॉट्स प्रभावी सहकारी ठरतात. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. नव्या दृष्टिकोनातून विचार करण्याची प्रेरणा मिळते त्यामुळे केवळ माहिती ग्रहण करणारी नव्हे तर सर्जनशील विचार करणारी पिढी घडण्यास मदत होऊ शकते.



### चॅटबॉट्सचे धोके

मानसिक आणि भावनिक पातळीवरही काही सकारात्मक परिणाम दिसून येतात. किशोरवय हा भावनिक चढउतारांचा काळ असतो. अनेक मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी योग्य व्यक्ती मिळत नाही. मित्र, कुटुंब किंवा शिक्षक यांच्याशी सर्व गोष्टी बोलणे त्यांना सोपे वाटत नाही. अशावेळी काही मुले चॅटबॉट्सशी संवाद साधतात. त्यांना वाटते की कोणी तरी त्यांचे म्हणणे ऐकत आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात तणाव कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र या सर्व फायद्यांबरोबरच काही गंभीर धोकेही समोर येत आहेत. एआय चॅटबॉट्स हे माणूस नसतात. त्यांना भावना नसतात, नैतिक जाणीव नसते, अनुभव नसतो आणि जबाबदारीची जाणीवही नसते. ते केवळ उपलब्ध माहिती आणि प्रशिक्षणाच्या आधारे उत्तरे देतात. त्यामुळे काही वेळा त्यांची उत्तरे दिशाभूल करणारी, अपूर्ण किंवा धोकादायक असू शकतात. अलीकडील काही घटनांनी या धोक्यांची तीव्रता अधोरेखित केली आहे. अमेरिकेत एका किशोरवयीन मुलाच्या आत्महत्येनंतर एआय चॅटबॉट्सच्या सुरक्षिततेविषयी गंभीर चर्चा सुरू झाली. आरोप असे होते की संबंधित मुलगा एका आभासी पात्राशी इतका भावनिकदृष्ट्या जोडला गेला होता की त्याने वास्तव आणि आभासी जगातील सीमारेषा धुसर केल्या. मानसिक संघर्षाच्या काळात त्याला योग्य मानवी आधार मिळाला नाही आणि तो यंत्राशी अधिक संवाद साधत राहिला. ही घटना आपल्याला एक महत्त्वाचा धडा देते. चॅटबॉट्स हे मित्र, पालक, शिक्षक किंवा समुपदेशक यांची जागा घेऊ शकत नाहीत. ते सहाय्यक असू शकतात; परंतु ते मानवी नात्यांचा पर्याय असू शकत नाहीत.

### मानवी सुरक्षिक्षता महत्त्वाची

एखादे मूल भावनिक संकटात असते, तेव्हा त्याला सहानुभूती, समजूतदारपणा आणि मानवी स्पर्शाची गरज असते. ही गरज कोणतेही यंत्र पूर्ण करू शकत नाही. आणखी एक गंभीर धोका म्हणजे चुकीची माहिती. एआय चॅटबॉट्स अनेकदा आत्मविश्वासाने चुकीची उत्तरे देऊ शकतात. टीनएज मुलांमध्ये माहितीची पडताळणी करण्याची सवय नसल्यास ते अशा उत्तरांवर सहज विश्वास ठेवू शकतात. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करणे अत्यावश्यक बनते. गोपनीयतेचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. अनेक मुले नकळत आपली वैयक्तिक माहिती, छायाचित्रे, आवडीनिवडी किंवा कौटुंबिक माहिती चॅटबॉट्सशी शेअर करतात. ही माहिती भविष्यात कशा प्रकारे वापरली जाईल याची त्यांना कल्पना नसते. त्यामुळे मुलांना माहिती सुरक्षेचे शिक्षण देणे अत्यावश्यक आहे. या पार्श्वभूमीवर तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या कंपन्यांवर मोठी जबाबदारी येते. वयानुसार सुरक्षितता नियंत्रण, संवेदनशील विषयांवरील निर्बंध, आत्महत्येसारख्या संकटाच्या परिस्थितीत त्वरित मदतसेवा सुचवणे, पालक नियंत्रण सुविधा आणि संवादाचे नैतिक परीक्षण यासारख्या उपाययोजना प्रत्येक एआय प्रणालीत असणे आवश्यक आहे. वापरकर्त्यांचा जास्तीत जास्त वेळ मिळवणे किंवा व्यावसायिक नफा मिळवणे यापेक्षा मानवी सुरक्षितता अधिक महत्त्वाची मानली गेली पाहिजे.

### पालकांची आणि शिक्षकांची भूमिका महत्त्वाची

यामध्ये पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांना तंत्रज्ञानापासून पूर्णपणे दूर ठेवणे हा उपाय नाही.त्याऐवजी तंत्रज्ञानाचा सुजाण वापर कसा करावा हे शिकवणे आवश्यक आहे. मुलांशी नियमित संवाद साधणे, त्यांच्या डिजिटल सवयी जाणून घेणे आणि विश्वासाचे नाते निर्माण करणे महत्त्वाचे आहे. घरामध्ये काही वेळ तंत्रज्ञानमुक्त वातावरण निर्माण करणेही उपयुक्त ठरते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एआयचा वापर केवळ उत्तरे मिळवण्यासाठी नव्हे, तर विचार करण्यासाठी करायला शिकवले पाहिजे. माहितीची पडताळणी, तर्कशक्ती, नैतिकता आणि जबाबदार डिजिटल वर्तन या कौशल्यांचा शिक्षणात समावेश करणे आवश्यक आहे. भविष्यातील यश केवळ तंत्रज्ञान वापरण्यावर अवलंबून नसेल, तर ते जबाबदारीने वापरण्यावर अवलंबून असेल. शाळांमध्ये सामाजिक आणि भावनिक शिक्षणालाही समान महत्त्व दिले पाहिजे. मुलांना संवादकौशल्य, सहानुभूती, आत्मविश्वास, समस्या सोडवण्याची क्षमता आणि भावनिक संतुलन शिकवणे आवश्यक आहे. मानवी नाती मजबूत असतील तर मुलांना आभासी जगावर अतिरेकी अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता हे मानवजातीसाठी एक महान साधन आहे. योग्य वापर केल्यास ते शिक्षण, संशोधन, सर्जनशीलता आणि ज्ञानवृद्धी यांना अभूतपूर्व गती देऊ शकते. कोणतेही तंत्रज्ञान स्वतःहून चांगले किंवा वाईट नसते. त्याचा परिणाम ते कसे वापरले जाते यावर अवलंबून असतो. किशोरवयीन मुलांसाठी एआय चॅटबॉट्स हे ज्ञान, प्रेरणा आणि सर्जनशीलतेचे प्रभावी साधन ठरू शकतात. मात्र त्यांचा वापर मानवी मूल्यांच्या चौकटीत, नैतिकतेच्या आधारावर आणि योग्य मार्गदर्शनाखाली झाला पाहिजे. चॅटबॉट्सना मित्र मानता येईल; परंतु ते कुटुंबाची जागा घेऊ शकत नाहीत. ते शिक्षकांना मदत करू शकतात; परंतु शिक्षक बनू शकत नाहीत. ते संवाद साधू शकतात; परंतु मानवी संवेदना निर्माण करू शकत नाहीत. म्हणूनच आजची खरी गरज आहे ती कृत्रिम बुद्धिमत्तेबरोबर मानवी बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि मानवी मूल्ये यांचा समतोल राखण्याची. तंत्रज्ञानाचा विकास आणि मानवी विकास यांची सांगड घातली तरच आपण सुरक्षित, संवेदनशील आणि सक्षम डिजिटल पिढी घडवू शकू. हीच आपल्या मुलांच्या उज्वल आणि सुरक्षित भविष्यासाठी सर्वात मोठी गुंतवणूक ठरेल. पालक, शिक्षक आणि समाजाने एकत्र येऊन डिजिटल साक्षरता वाढवणे, नैतिक वापर शिकवणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलांसाठी सुरक्षित आणि आश्वासक मानवी संवाद साधणे अपरिहार्य आहे. तंत्रज्ञानाचा वापर हा नेहमी मानवी मूल्यांवर आधारित आणि नियंत्रित असावा, ज्यामुळे किशोरवयीन पिढीचा सर्वांगीण विकास साधता येईल.

**- डॉ. दीपक शिकारपूर**

# राजदे प्लॉटच्या विकासाला चालना; प्रभाग क्र. ९ मध्ये विकासकामांचा शुभारंभ

- आ. प्रकाश भारसाकळे यांच्या हस्ते भूमिपूजन
- श्री हनुमान मंदिर प्रतिष्ठान व व्यायाम प्रसार मंडळाचे उद्घाटन
- युवकांसाठी अभ्यासिका–व्यायामशाळेची संकल्पना





**■ प्रतिनिधी | अकोट ■**

अकोट शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील राजदे प्लॉट व जिजामाता नगर परिसराच्या विकासाला अखेर गती मिळाली असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध विकासकामांचा शुभारंभ आणि भूमिपूजन सोहळा सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या हस्ते या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच परिसरातील सामाजिक, शैक्षणिक व युवक विकासाला चालना देणाऱ्या श्री हनुमान मंदिर प्रतिष्ठान व व्यायाम प्रसार मंडळाचे उद्घाटनही याच वेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्षा माया धुळे उपस्थित होत्या. यावेळी नगरपालिकेचे पदाधिकारी, भाजपचे पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, विविध मंडळांचे कार्यकर्ते, महिला, युवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजदे प्लॉट आणि जिजामाता नगर परिसरात रस्ते, नाल्या आणि इतर मूलभूत सुविधांचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. विशेषतः पावसाळ्यात चिखल, पाणी साचणे आणि वाहतुकीतील अडथळ्यांमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत होते. या समस्यांकडे सातत्याने लक्ष वेधण्यात आले होते. अखेर आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पाठपुराव्यानंतर या विकासकामांना मंजुरी मिळाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी उद्घाटन करण्यात आलेल्या श्री हनुमान मंदिर प्रतिष्ठान व व्यायाम प्रसार मंडळाच्या माध्यमातून युवकांसाठी आधुनिक व्यायामशाळा, स्पर्धा परीक्षांची अभ्यासिका, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याची संकल्पना मांडण्यात आली. परिसरातील युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून समाजोपयोगी कार्याची नवी दिशा देण्याचा निर्धार व्यक्त केला.रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, पर्यावरण संवर्धन, राष्ट्रीय सणांचे आयोजन, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य अधिक दृढ करण्याचा मानसही यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रकाश भारसाकळे यांनी प्रभाग क्रमांक ९ च्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित सर्व प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावले जातील. उर्वरित विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्षा माया धुळे यांनी अकोट शहरातील प्रत्येक प्रभागात विकासकामांना गती देण्याचे धोरण नगरपालिकेने स्वीकारले असून, राजदे प्लॉट परिसरातील विकासालाही प्राधान्य दिले जाईल, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौरव मालवीय यांनी केले. त्यांनी परिसरातील अनेक वर्षांच्या प्रलंबित मागण्यांना न्याय मिळाल्याबद्दल आमदार प्रकाश भारसाकळे, खासदार अनुप धोत्रे आणि नगराध्यक्षा माया धुळे यांचे नागरिकांच्या वतीने आभार मानले. तसेच नव्याने स्थापन झालेल्या प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित होतील, असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे, आरोग्य सभापती मनीष कराळे, पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर, राजेश रावनकार, हरीश टावरी, रवि ठाकूर, योगेश नाठे, मंगेश पटके, चेतन मर्दाने, दिलीप बोचे, मनोज चंदन, निलेश नवघरे, गोपाल मोहोड, श्रीकांत गायगोले, आरिफभाई, खालिदभाई, अबरारभाई, ॲड. पांडुरंग बेदरकर, अनिल मालवीय, धम्मध्वज गायकवाड, देवेंद्र गवळी, गोपाल पडोळे, विजय चंदन, देविदास वनकर, अनिल वानखडे, सुरेश पंचांग यांच्यासह महिला मंडळाच्या पूनम मगर, पूजा मल्ल, स्वाती बेदरकर, भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक, सर्वधर्म समभाव मित्र मंडळ, सर्वधर्म समभाव महिला मंडळ, नवदुर्गा उत्सव मंडळाचे पदाधिकारी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवा पाटील मगर यांनी केले, तर आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. राजदे प्लॉट परिसरातील विकासकामांच्या शुभारंभासह श्री हनुमान मंदिर प्रतिष्ठान व व्यायाम प्रसार मंडळाच्या उद्घाटनामुळे परिसराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी नागरिकांनी व्यक्त केला.

# आषाढी एकादशीनिमित्त 'भक्तीरंग' अभंग गायनाचा सुरेल सोहळा; बालकलाकारांना मिळणार मोठे व्यासपीठ



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन समितीच्या वतीने यंदाही 'वाचे विठ्ठल गाईन' या उपक्रमांतर्गत 'भक्तीरंग' अभंग गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचे यंदा दहावे वर्ष असून, जिल्ह्यातील होतकरू बालकलाकारांना अभंग गायनासाठी मोठ्या व्यासपीठावर सादरीकरणाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

दि. २५ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता रिंग रोडवरील जाणोरकर मंगल कार्यालय, अकोला येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन गुणवंतराव जाणोरकर यांच्या हस्ते भगवान पांडुरंग व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून होणार आहे. त्यानंतर 'गुरुदेव हमारा प्यारा' या संकल्पगीताचे सामूहिक गायन करण्यात येईल.

यावेळी गत जानेवारीमध्ये पार पडलेल्या १२ व्या राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलनाचा आर्थिक अहवाल समितीचे कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर साकरकार सादर करतील. सायंकाळी ४ वाजता 'भक्तीरंग' अभंग गायन कार्यक्रमाला सुरुवात होईल. प्रारंभी चतारे गुरुजी, जितू मोहोड, मुक्ताताई पाटील आणि प्रज्वल गुल्हाने हे अभंग सादर करणार असून, तबला साथ प्रा. अनिरुद्ध दळवी, अनंत सरोदे व प्रा. सागर म्हसाळ यांची राहणार आहे. त्यानंतर जिल्ह्यातील बालकलाकार आपल्या सुरेल अभंगांनी भक्तिरसाची उधळण करणार आहेत.

सायंकाळी ६.३० वाजता सामुदायिक प्रार्थना व चिंतन होणार असून, त्यानंतर बालकलाकारांचा गौरव व प्रोत्साहनपर बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुणवंतराव जाणोरकर व हरणे मामा राहणार असून, अविनाश डुडूल, डॉ. प्रकाश मानकर आणि चंद्रकांत अवचार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. कार्यक्रमाची सांगता फराळ व राष्ट्रवंदनेने होणार आहे.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन समितीचे अध्यक्ष गोपाल गाडगे, उपाध्यक्ष डॉ. प्रकाश मानकर, सचिव डॉ. रामेश्वर बरगट, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर साकरकार तसेच मंगेश कराळे, ॲड. सचिन माहोकार, श्रीकृष्ण पखाले, राजेंद्र झामरे, मयूर वानखडे, नागेश घोगरे, शिवा महाल्ले आदींनी जिल्ह्यातील रसिकांनी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# एलआरटी वाणिज्य महाविद्यालयात एनसीसीची वार्षिक भरती उत्साहात



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिशन तोष्णीवाल (एलआरटी) वाणिज्य महाविद्यालयात ११ महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या वतीने वार्षिक भरती प्रक्रिया उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत शारीरिक चाचण्यांना प्रतिसाद दिला. ११ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विजय शुक्ला यांच्या आदेशानुसार तसेच महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही भरती घेण्यात आली. महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी कॅप्टन डॉ. अनिल म. तिरकर यांनी संपूर्ण भरती प्रक्रियेचे नियोजन केले.

भरतीसाठी ११ महाराष्ट्र बटालियनचे सैन्य अधिकारी एस. आर. गवई, हवालदार दीपक रेशमी, हवालदार पितांबर थापा व हवालदार हेमंत बनसोडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांची उंची, वजन, धावणे, पुलअप, पुशअप आदी शारीरिक निकषांवर तपासणी करून निवड प्रक्रिया पार पाडण्यात आली. भरती प्रक्रियेच्या यशस्वी आयोजनासाठी कॉर्पोरल आदित्य टाले, लान्स कॉर्पोरल निखिल मोरया, कॅडेट सूरज ठोसर, धनराज जाहीर, सत्यम टोंगळे, वैभव काळपांडे, कृष्णा ठाकूर, निखिल मोटवानी, वेदांत वैराळे, रौनक परिवाल, शिवम वाघ, नैतिक घोडे, ऋषभ खंडारे, आदेश मुडे, कॉर्पोरल पल्लवी शिरसाट, लान्स कॉर्पोरल दिव्या बावस्कर, जानवी पारस्कर, तृप्ती कोरडे, प्राजक्ता मोगरे, वैष्णवी बिचारे, मधुरा नर्सिंग, प्रतीक्षा कोगदे, वैष्णवी वानखडे, वैष्णवी हरसुलकर, सानिका भरकर, गुंजन खांडेकर, गायत्री इंगळे, तृप्ती बुंदेले यांच्यासह अनेक माजी एनसीसी कॅडेट्सचे सहकार्य लाभले.

एनसीसीमध्ये निवड झालेल्या नवीन कॅडेट्सचे बीजीई सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता, मानद सचिव डॉ. पवन माहेश्वरी, वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्ष इंजि. अभिजित परांजपे, सहसचिव अमित सुरेका व कार्यकारी मंडळातील सदस्यांनी अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# इनरव्हिल नॉर्थचा तान्हुल्यांना मच्छरदाणी वितरण

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

सामजिक सेवेत सक्रीय असणाऱ्या महिलांच्या इनरव्हील क्लब ऑफ अकोला नॉर्थच्या वतीने नवजात बालकांना मच्छरदाणी किट वितरित करण्यात आली.क्लब अध्यक्षा ज्योती रुहाटीया यांच्या पुढाकारात व प्रकल्प प्रमुख बेला राठी यांच्या नियोजनात सेवा प्रकल्प अंतर्गत आयोजित या उपक्रमात महिला पदाधिकाऱ्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयात उपस्थित होऊन तेथील ४० नवजात बालकांसाठी त्यांच्या मातांना मच्छरदाणी किट वितरित करून बाळाची आस्थेने विचारपूस केली.

क्लब अध्यक्षा ज्योती रुहाटीया यांनी क्लबच्या सेवाभावी उपक्रमाची माहिती देत नागरिकांनी या सेवाभावी उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.


## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११६५/२०२६ — प्रोसेस नं.८९२६/२०२६
चौ.ता. ०१/०९/२०२६ — दिनांक : १७/०७/२०२६

**अर्जदार :** १. शांताबाई लक्ष्मण खिल्लारे २. वंदना लक्ष्मण खिल्लारे क्र. १ ते २ रा. वार्ड नं. ५, शिवणी खदान, मलकापूर, कृषि नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. गंगाधर लक्ष्मण खिल्लारे २. संघपाल लक्ष्मण खिल्लारे क. १ व २ रा. जेतवन नगर, शिवणी, खदान, अकोला. ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मण गंगाधर खिल्लारे
**पत्ता :-** रा. शिवणी, खदान, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मण गंगाधर खिल्लारे यांचे दि.०९/०८/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११०८/२०२६ — प्रोसेस नं.८९१२/२०२६
चौ.ता. २१/०८/२०२६ — दिनांक : १७/०७/२०२६

**अर्जदार :** १. पुष्पा प्रभाकर माळी २. राहुल प्रभाकर माळी ३. अंकुश प्रभाकर माळी सर्व रा. गजानन महाराज मंदिर जवळ, बाबा राईटर चाल, देशमुख फैल, अकोला. ता. जि. अकोला. ४. कोमल अनिकेत अंबुसकर रा. निमगाव, बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रभाकर चांगदेवराय माळी
**पत्ता :-** रा. गजानन महाराज मंदिर जवळ, बाबा राईटर चाल, देशमुख फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रभाकर चांगदेवराय माळी यांचे दि. ०७/०४/२०२५ रोजी बाबा राईटर चाल, देशमुख फैल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# 'बोल नाहीतर?' शिरपूर उर्दू शाळेत विद्यार्थ्याकडून 'क्लीनचिट'चा व्हिडिओ?

- वृत्त प्रकाशित होताच शिक्षकांच्या हालचाली
- विधवा माता–मुलगा दहशतीत असल्याचा आरोप




**■ प्रतिनिधी | अकोला ■**

पातूर पंचायत समितीअंतर्गत पिंपळखुटा केंद्रातील शिरपूर येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील विद्यार्थ्याला वर्गात बसण्यास मज्जाव केल्याच्या आरोपाचे प्रकरण आता अधिकच गंभीर बनले आहे. या घटनेबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्याला शाळेत बोलावून, 'मला शाळेतून हाकलले नाही,' असे कॅमेऱ्यासमोर बोलण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. हा आरोप सत्य असल्यास, चौकशीवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाला का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

यापूर्वी 'तुझा प्रवेश या शाळेत नाही,' असे सांगून विद्यार्थ्याला वर्गाबाहेर काढल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर हे वृत्त प्रसिद्ध होताच संबंधित शिक्षकांनी विद्यार्थ्याशी संपर्क साधून त्याचा व्हिडिओ तयार केल्याचा दावा समोर आल्याने संपूर्ण प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

मंगळवारी सकाळी सुमारे आठ वाजता विद्यार्थ्याला शाळेत बोलावण्यात आले. तेथे संबंधित वर्गशिक्षकांनी, 'मी तुला शाळेतून हाकलले नाही,' असे बोलण्यास सांगून त्याचा व्हिडिओ रेकॉर्ड केल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, हा प्रकार वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतरच घडल्याचा दावा असल्याने, संभाव्य चौकशीत स्वतःची बाजू मजबूत करण्यासाठी हा प्रयत्न झाला का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

संबंधित विद्यार्थी व त्याची आई अत्यंत गरीब परिस्थितीत जीवन जगत असल्याचा दावा करण्यात आला आहे. वडिलांचे निधन झाल्यानंतर आई शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांकडून दबाव आल्याने दोघेही भयभीत असल्याचे सांगितले जात आहे. शिक्षणाचा हक्क मागणाऱ्या विद्यार्थ्यालाच मानसिक दडपणाला सामोरे जावे लागत असेल, तर ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे मत व्यक्त होत आहे. शाळा ही विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि भीतीमुक्त जागा असणे अपेक्षित असते. मात्र, एखाद्या विद्यार्थ्याला प्रवेश नाकारणे आणि त्यानंतर त्याच्याकडून कथितरित्या व्हिडिओ तयार करून घेण्याचे आरोप समोर येत असतील, तर हा केवळ शालेय शिस्तीचा प्रश्न राहत नाही; तर तो बालहक्क, विद्यार्थ्यांचे संरक्षण आणि शिक्षण व्यवस्थेतील उत्तरदायित्वाचा विषय ठरतो.

**चौकशीची कसोटी आता शिक्षण विभागावर**

या प्रकरणातील सर्व आरोपांची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला वर्गात बसण्यास मज्जाव करण्यात आला होता का? त्यानंतर कथित दबावाखाली व्हिडिओ तयार करण्यात आला का? याची वस्तुनिष्ठ पडताळणी करून सत्य समोर आणणे ही शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. आरोप सिद्ध झाल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांकडून होत आहे.

'मंगळवारी सकाळी मी शाळेत गेलो असता वर्गशिक्षकांनी 'मी तुला शाळेतून हाकलले नाही' असे बोलायला सांगून माझा व्हिडिओ बनवला.
मी तसे बोलतो नसतो तर मला मारहाण केली असती, अशी भीती वाटत होती. माझे वडील नाहीत. माझी आई शेतमजुरी करून आमचा उदरनिर्वाह करते. आम्ही खूप गरीब आहोत. वडील नसल्यामुळे आमच्यासोबत असा प्रकार होत आहे.'
**गुफरान प्यार मोहम्मद,**
विद्यार्थी

(**कायदेशीर सूचना :** या वृत्तातील आरोप संबंधित विद्यार्थी व पालकांनी केलेल्या दाव्यांवर आधारित आहेत. संबंधित शिक्षक किंवा शिक्षण विभागाची अधिकृत बाजू उपलब्ध झाल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येईल.)


**Change In Name**
I have change my name From
**"SIRAJUDDIN NASIRUDDIN"**
(As per Old Passport Name/ Wrong Name) -TO-
**"SIRAJJODDIN QURESHI NASIRODDIN QURESHI"**
(New Name as per on Two Photo ID)
Address (If as per old passport or if change then as per Adhar) "KAGZI PURA NEAR FISH MARKET SUBHASH ROAD AKOLA MAHARASHTRA"
Passport No. "M645759" FILE NO.

**Change In Name**
I have change my name From
**"SHEKH MUMTAZ ABDUL HAQUE"**
(As per Old Passport Name/ Wrong Name) -TO-
**"SHAIKH MUMTAZ SHAIKH ABDUL HAQ SIKALHGAR"**
(New Name as per on Two Photo ID)
Address (If as per old passport or if change then as per Adhar)
MILAN NAGAR NEAR GAUTAM BUDDHA STACHU NAIGAON AKOLA 444003
Passport No. "J1108542"
FILE NO. NGPZ05034810

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११०७/२०२६ — प्रोसेस नं.९१७१/२०२६
चौ.ता. २८/०८/२०२६ — दिनांक : २०/०७/२०२६

**अर्जदार :** १. आशा गोपाल गावंडे रा. भवानी माता मंदिर जवळ, भवानीपुरा, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. २. अक्षय गोपाल गावंडे रा. भवानी माता मंदिर जवळ, भवानीपुरा, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. ३. प्रतीक गोपाल गावंडे रा. भवानी माता मंदिर जवळ, भवानीपुरा, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. मो. क्र. ९५५२६५६४६२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गोपाल देवराव गावंडे
**पत्ता :-** रा. भवानी माता मंदिर जवळ, भवानीपुरा, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. मो. क्र. ९५५२६५६४६२

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गोपाल देवराव गावंडे यांचे दि. १५/१०/२०२५ रोजी आचार्य विनोबा भावे हॉस्पिटल, सावंगी (मेघे) वर्धा येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज़ निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११३६/२०२६ — प्रोसेस नं.८९१९/२०२६
चौ.ता. २४/०८/२०२६ — दिनांक : १७/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती मैनाबाई सखाराम सुरवाडे २. श्रेया रवि सुरवाडे ३. हर्षता रवि सुरवाडे ४. प्रगती रवि सुरवाडे सर्व रा. यशवंत नगर, वाशिम बायपास रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रवि सखाराम सुरवाडे
**पत्ता :-** रा. यशवंत नगर, वाशिम बायपास रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रवि सखाराम सुरवाडे यांचे दि.२५/०५/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# आजपासून आरोग्य अमृत महोत्सव

### तीन दिवस मोफत सर्वरोग निदान शिबीर, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर व पालकमंत्री यांच्या उपस्थितीत उद्घाटन

**वर्धा/ जनमाध्यम**

सार्वजनिक आरोग्य विभाग आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य अमृत महोत्सवानिमित्त २२ ते २४ जुलैदरम्यान बच्छराज धर्मशाळा प्रांगण, शास्त्री चौक, वर्धा येथे मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराला आजपासून सुरुवात होत आहे.

शिबिराचे उद्घाटन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या उपस्थितीत सकाळी १० वाजता होणार आहे.



या शिबिरात हृदयरोग, स्त्रीरोग, दंतरोग, अस्थिरोग, कर्करोग, त्वचारोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा आदी आजारांची मोफत तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, औषधोपचार, ईसीजी, रक्त तपासणी, मानसिक आरोग्य समुपदेशन तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय मोफत चष्मे वाटप, दिव्यांगांना साहित्य वितरण, रक्तदान शिबिर तसेच आयुष्मान भारत योजन अंतर्गत कार्ड नोंदणीची सुविधाही उपलब्ध राहणार आहे.हे शिबीर तीन दिवस चालणार असून नागरिकांनी या दुर्मिळ संधीचा लाभ घेऊन आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

जास्तीत जास्त नागरिकांनी शिबिरात सहभागी होऊन मोफत आरोग्य सेवांचा लाभ घ्यावा, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

# रोठा प्रकरणात ॲड. अजय मिसर विशेष सरकारी वकील

**वर्धा/ जनमाध्यम**

रोठा येथील १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आलेल्या प्रकरणात राज्य शासनाने विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. अजय मिसर यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. न्यायालयात शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आली असून, यासंदर्भात गृहराज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी निर्देश दिले आहेत.

या घटनेनंतर जिल्हाभरातून संताप व्यक्त करण्यात आला होता. दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि खटल्याची जलदगतीने सुनावणी व्हावी,अशी मागणी विविध स्तरांतून होत होती. त्यानंतर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हे प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालविण्याची विनंती केली होती.त्याच अनुषंगाने आता ॲड. अजय मिसर यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे खटल्यातील सरकारी बाजू अधिक सक्षमपणे मांडली .

# प्रारंभीक अधिसूचना

## उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचे कार्यालय

**क्र./समअ/भू. सं/उवप्र/कावि 850/2026**
**दिनांक :- 10/ जूलै, 2026**

**भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 11 (1) खालील अधिसूचना**

**भूसंपादन प्रकरण क्रमांक:- 02 /एलएक्यूं-47/2025-2026,**
**मौजा :- आजनसरा, तालुका-हिंगणघाट, जिल्हा-वर्धा**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) याच्या कलम 3 च्या खंड (इ) च्या द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसुल व वन विभाग क्र. संकिर्ण 11/2014/प्र.क्रं.77/अ-2, दिनांक 19 जानेवारी, 2015 (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त अधिसूचना' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेड अं) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील 500 हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त जमीन' असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त सार्वजनिक प्रयोजन' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, सदर्हु प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावी.)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुर्नवसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशिल नमुद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम-4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, 2014 (यात यापुढे ज्यांचा निर्देश 'उक्त नियम' असा करण्यात आला आहे) यांच्या नियम-10 च्या उप नियम (3) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालिल जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन), उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा यांस पदनिर्देशित करीत आहे.**

## अनुसुची-एक

### जमिनीचे वर्णन

**भु.प्र. क्रमांक :-** 02/एलएक्यु-47/2025-26
**मौजा :-** आजनसरा, तालुका : हिंगणघाट, जिल्हा :- वर्धा

| अ. क्रं. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे. आर मध्ये |
|---|---|---|
| 01 | 74/2 | 2.26 |
| 02 | 75 | 0.58 |
| | एकुण | 2.84 |

## अनुसूची दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :-आजनसरा बॅरेज प्रकल्प.

**सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन** :- आजनसरा बॅरेज प्रकल्पाच्या धरणपाळीच्या बांधकामाकरीता.

**समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)** :- या प्रकल्पामुळे दोन जिल्ह्यातील दळण वळण करणे सुलभ होणार व सिंचनाकरीता व सार्वजनिक पाणीपुरवठा होणार असल्यामुळे त्या परिसरातील शेतकऱ्यांना त्याचबरोबर ग्रामिण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे.

## अनुसूची तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** :- कुणीही व्यक्ती किंवा कुटुंब विस्थापित होत नाही.

## अनुसूची चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला)** :- महाराष्ट्र शासन अधिसूचना 26 एप्रिल, 2018 अन्वये भूमि संपादन पुनर्वसन वपुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम -10 (क) नुसार अधिनियमाच्या प्रकरण २ व ३ मधुन अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात (भाग एक-संकिर्ण अधिसूचना) विभागीय आयुक्त नागपूर दिनांक 11 ते 17 जुन 2026 नुसार उक्त प्रकल्पाला सुट प्रदान करण्यात आली आहे.

## अनुसूची पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात अधिका-याचे पदनाम :-निरंक

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :-निरंक

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती :-निरंक

करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापूर्वी भरावे)

**विशेष नोंद :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उर्ध्व वर्धा प्रकल्प, वर्धा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांक :-**
**ठिकाण :-** वर्धा

**स्वा/ -**
**जिल्हाधिकारी, वर्धा**

**क्र. जिमाका - वर्धा / 75/2026-27**

# विशेष लोक अदालतीत ५९ प्रकरणाचा आपसी तडजोडीने निपटारा



**वर्धा/ जनमाध्यम**

राष्ट्रीय विधी सेवा समिती व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा न्यायिक जिल्ह्यामध्ये १८ जुलै रोजी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या अदालतीमध्ये ५९ प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली असून तडजोड झालेल्या प्रकरणांमधील तडजोडीच्या रक्कमेचे मुल्य ६८ लाख ८९ हजार ४९५ इतके आहे.

विशेष लोक अदालतमध्ये दोन्ही पक्षकारांना आपापली बाजु मांडण्याची संधी मिळते तसेच दोन्ही पक्षकारांच्या आपसी सहमतीने प्रकरणांमध्ये तडजोड होत असल्याने निकालाचे समाधान दोन्ही पक्षकारांना असते. तसेच यामुळे पक्षकारांचा वेळ व पैशाची बचत, होते. मनासारखा समझोता झाल्याने मानसिक समाधान लोक अदालतमुळे पक्षकारांना मिळते, असे विचार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड यांनी विशेष लोक अदालत प्रसंगी व्यक्त केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव संजीव सरदार यांनी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यामागील भुमिका याप्रसंगी व्यक्त केली. विशेष लोक अदालतीमध्ये निकाली निघणाऱ्या प्रकरणांमुळे पक्षकारांना समाधान लाभते.कारण दोन्ही पक्षकारांच्या आपसी सहमतीने प्रकरणामध्ये समझोता होत असतो.

त्यामुळे 'वादापेक्षा समझोता बरा' या विचारानुसार पक्षकारांनी आपसा तील वाद सामोपचाराने लोक अदालतीमध्ये मिटवावे, असे आवाहन त्यांनी केले.

विशेष लोक अदालतीमध्ये जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष, जिल्हातील अधिवक्ता आणि पक्षकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या माध्यमातून अनेक प्रलंबित वाद समोपचाराने मिटवण्यात आले. जिल्ह्यातील न्यायालयामध्ये झालेल्या विशेष लोक अदालतीत पराक्रम्य लेख अधिनियम, १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत प्रलंबित प्रकरणांच्या प्रभावीपणे निपटारा करण्यात आला.

या विशेष लोकअदातीत न्यायाल यामध्ये प्रलंबित प्रकरणांपैकी एकूण ५९ इतकी प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आलीत.

**नगर परिषद पुलगाव**
**-: निविदा सुचना :-**
**जा.क्र. ४२४ दि. २०/०७/२०२६**

नगर परिषद पुलगांव कार्यालया करिता सन २०२६-२७ निविदा कामे-
१. नगर परिषद क्षेत्रातील हातपंप (बोरिंग) दुरुस्तीसह साहित्य पुरवठा करणेबाबत. (ऑफलाइन)
२. नगर परिषद आरोग्य विभाग करिता शौचालय मधील मोटर, पॅनल दुरुस्ती साहित्यसह करणे बाबत (ऑफलाइन)
३. मोकाट कुत्रे निर्बीजीकरण अभियान सर्जरी तसेच एंटी रॅबीज टिकाकरण व संबंधित कामे (ई-निविदा)

सदरची कामे करावयाची असुन या निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करु शकत असलेल्या सक्षम कंत्राटदारांकडुन द्वि-लिफाफा पद्धतिने काम क्र. १ व २ करीत ऑफलाइन निविदा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विक्री/भरणा करणेबाबत माहिती दि. २१/०७/२०२६ ते दि. ३०/०७/२०२६ वेळ सां. ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयात उपलब्ध आहे.

तसेच काम क्र. ३ साठी ई-निविदा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची सविस्तर माहिता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २१/०७/२०२६ ते दि. १०/०७/२०२६ वेळ सां. ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयात उपलब्ध आहे.

दिनांकः २१/७/२०२६

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद पुलगाव**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २३५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **लता भगवान वडे** यांच्या वतीने जाहीर सुचना देतो ते येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

मौजा- बोरी (बु.) ता.मारेगांव, जि.यवतमाळ येथील गट क्र.१० (दहा) क्षेत्र ०१ हे.४० आर.गट क्र.१५ क्षेत्र ० हे.४३ आर व गट क्र.१४१, क्षेत्र ० हे.८२ आर पोट खराब क्षेत्र ० हे ०९ आर या शेतजमिनीबाबत घेण्यात आलेला फेरफार क्र.५२३, ५२८ व फेरफार क्र.९०३ या बाबतचा वाद दिवाणी न्यायालय, सोबतच विभागीय आयुक्तालय यामध्ये अपिलीय दावा सध्या सुरु असल्यामुळे, सदरची जमीन वादग्रस्त आहे, म्हणून कोणीही ईसारपावती किंवा खरेदी करण्यात पुढाकार घेवू नये.

**ॲड. रणजीत अ.डोंगरे**
**ॲड.इम्रान हसन सय्यद**

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४५८/२०२६ ने.ता.०३.०८.२०२६

**अर्जदार -**
१. **श्री. रघुनाथ श्रीरामजी गवई,** वय ७८ वर्षे, धंदा - शेती
२. **श्री राहुल रघुनाथ गवई,** वय ४४ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा. बळेगाव, पो.कुष्ठा बु. ता.अचलपूर, जि.अमरावती
३. **सौ.अर्चना युवराज जवंजाळ,** वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.सर्वोदय नगर, शिवनी, पो.शोणी, जि.अकोला

-- **विरुध्द** --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ची पत्नी तर अर्जदार नं.२ व ३ ची आई नामे **निर्मला रघुनाथ गवई ही दिनांक ०८/०९/२०२० रोजी District Civil Hospital Amravtai, Tq. & Dist. Amravati** येथे मय्यत झालेली आहे.तिचे मृत्यूनंतर तिचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक १२.०७.२०२६** शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

# धारदार शस्त्रासह फिरणारा युवक ताब्यात

**अमरावती :** शहरात धारदार शस्त्र बाळगून संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका युवकाला नागपुरी गेट पोलिसांनी सापळा रचून अटक केली. आरोपीकडून लोखंडी धारदार हत्यार जप्त करण्यात आले असून, त्याच्याविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सलमान अली अशरफ अली (वय ३४, रा. गौलीपुरा, अमरावती) असे आहे. पोलिसांच्या डिटेक्शन ब्रँच (डीबी) पथकाला गौलीपुरा परिसरातील एक युवक ट्रान्सपोर्ट नगर परिसरात धारदार शस्त्र घेऊन संशयास्पदरीत्या फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तातडीने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडून लोखंडी धारदार हत्यार जप्त करण्यात आले.

या प्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. पोलिसांच्या वेळेवर झालेल्या कारवाईमुळे संभाव्य अनुचित घटना टळल्याचे सांगण्यात आले.

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती - महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी- वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र ३००००७०७५२ (आर) | वर्क ऑफ इन-सिटू रीपेरिंग ऑफ व्हेरियस हाय प्रेशर वॉल्वज ड्युरिंग यू-७ सीओएच अॅट टीएम-१, २५०मे.वॅट., टीपीएस, परळी वै. | १४.६८ लाख १८१८१/- | २२.०७.२०२६ ते २७.०७.२०२६ | २८.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७२४ (आर) | वर्क ऑफ बफर हॉपर बॅग फिल्टर मदर प्लेट रिप्लेसमेंट अँड अलाइड वर्क्स फॉर ड्राय फ्लाय अॅश ईव्हॅक्युएशन सिस्टिम ड्युरिंग सीओएच अॅट एएचपी-१, यू-७, टीपीएस, परळी वै. | ५.९१ लाख ९४१३/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७२७ (आर) | वर्क कॉंट्रॅक्ट फॉर सर्विसिंग ऑफ ८० केव्हीए यूपीएस अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड अॅट ईटी यू-६अँड ७ , २५०मे.वॅट , टीपीएस, परळी वै. | ३.१५ लाख ६६५०/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७२८ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस ऑइल फिल्टर्स फॉर सील ऑइल, टीजी बेरिंग ऑइल फ्लशिंग अँड बीएफपी लुब ऑइल अॅट २५० मे.वॅट (केडब्ल्यूयू) ड्युरिंग यू-७ सीओएच अॅट टीएम-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १३.७९ लाख १७२९१/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७२९ (आर) | वर्क ऑफ फॅब्रिकेटेड कार्बन स्टील / एमएस प्लेट ऑन डॅम्पर, कार्बन स्टील पाइप रिप्लेस / स्ट्रेन्थनिंग इन बॉयलर आऊटलेट ड्युरिंग एओएच इन यू-७ अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ६.७३ लाख १०२३८/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७३४ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस साइजेस गेट , ग्लोब , एनआरव्ही ड्युरिंग यू-७ शॉर्ट शटडाउन अॅट टीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ८.१३ लाख ११६३४/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७३९ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ कंट्रोल ट्रान्सफॉर्मर फॉर ईएसपी पॅनल ड्युरिंग यू-७ सीओएच अॅट ईटी-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.२७ लाख ५७७४/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७४० (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ एलपी बायपास पंप ड्युरिंग यू-७ सीओएच अॅट टीएम-१, २५० मे.वॅट. टीपीएस, परळी वै. | ८.८९ लाख १२३९०/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७४७ (आर) | वर्क ऑफ कंप्लीट ओवरहॉल ऑफ १३०/३० टी ईओटी क्रेन्स ड्युरिंग यू-७ सीओएच अॅट टीएम-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ४.७९ लाख ८२९४/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७८६ (आर) | सप्लाय ऑफ ईएसपी स्पेयर्स विथ कप वॉल्वज अॅट एएचपी-१, २५० मे. वॅट. टीपीएस, परळी वै. | ८.९३ लाख १२४३५/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७८९ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ '२०० एनबी ब्रांच सेग्रेशन वॉल्व असेम्ब्ली अँड स्पेयर पार्ट्स' फॉर ड्राय अॅश इव्हॅक्युऐशन सिस्टिम ड्युरिंग एओएच अॅट एएचपी-१, टीपीएस, परळी वै. | ४.६६ लाख ८१६०/- | २२.०७.२०२६ ते २९.०७.२०२६ | ३०.०७.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०७८७ (आर) | रीपेयर, रिस्टोयर अँड सर्विसिंग ऑफ वॉटर स्प्रे सिस्टिम (डिलंग वॉल्व मेकॅनिजम ) प्रोव्हायडेड फॉर द प्रोटेक्शण ऑफ क्रिटिकल औक्झिलरीज इन टीपीएस, परळी वै. | ५.९९ लाख ९४९७/- | २२.०७.२०२६ ते ०६.०८.२०२६ | ०७.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६९५२१ | टू इयरली कॉंट्रॅक्ट फॉर क्लिनिंग ऑफ ड्रेन्स बाय रिमोव्हिंग अॅश, स्लज अँड अदर डेब्रीस फ्रॉम व्हेरियस ड्रेन्स अँड रेसिड्यूअल ऑइल कलेक्शन फ्रॉम ड्रेन्स इन प्लांट प्रिमायसेस ऑफ यूनिट नो. ६ अँड ७, सिविल-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ४२.१० लाख ४५६०६/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००६९८२० | रिप्लेसमेंट ऑफ फायरफायटिंग लाइन्स ऑफ व्हेरियस साइजेस अॅट टीपीएस, परळी वै. | १५.०१ लाख १८५१७/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०१४५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ कोल मिल ऑइल फ्लो अँड प्रेशर मेजरींग इन्स्ट्रुमेंटस फॉर आय अँड सी-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ११.६९ लाख १५१९४/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०२४४ | वर्क ऑफ शिफटिंग , इंस्टॉलेशन अँड कमिशनिंग हाय मास्ट फ्रॉम ओल्ड प्लांट टू अॅश बंड, वे ब्रिज अँड खडका पम्प हाऊस अॅट ईएम-२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २.९९ लाख ६४९४/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०२५३ | प्रोव्हायडिंग सर्विसेस ऑफ डिजिटल फोटोग्राफी अँड व्हिडिओ शूटिंग विथ डबिंग , एडिटिंग , सूटेबल ॲनिमेशन अँड साऊंड अॅट ओएस-२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २.२२ लाख ५७२५/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०२६३ | प्रॉक्यूरमेंट ऑफ एसएस फिटिंग अँड कनेक्टर्स अॅट आय अँड सी-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ३.८० लाख ७३०५/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०२६८ | सप्लाय, इंस्टॉलेशन अँड कमिशनिंग ऑफ एलटी सर्किट ब्रेकर्स अॅट सीएचपी-२, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ३६.२० लाख ३९७००/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०२८१ | प्रॉक्यूरमेंट ऑफ बी-टाइप फायर फायटिंग डीलिवरी होजेस अॅट एफएस , टीपीएस, परळी वै. | ८.७७ लाख १२२७६/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०२८४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ १००एनबी डोम वॉल्व , एयर इनटेक वॉल्व अँड वैक्यूम ब्रेक वॉल्व असेम्ब्ली अँड स्पेयर पार्ट्स फॉर ड्राय फ्लाय अॅश इव्हॅक्युएशन अँड कनव्हेईंग सिस्टम अॅट एएचपी यू-८, टीपीएस, परळी वै. | ५.१४ लाख ८६४१/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०६२३ | एएमसी फॉर द वर्क ऑफ 'ऑन-लाइन' फिल्ट्रेशन ऑफ ऑइल मिल ऑफ यू-६,७ अॅट बीएम-१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ५.९५ लाख ९४५४/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०६२४ | एएमसी फॉर वर्क ऑफ सर्विसिंग ऑफ व्हेरियस वॉल्वज अॅट यू-८ बीएम , २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | १.७४ लाख ५२४७/- | २२.०७.२०२६ ते १२.०८.२०२६ | १३.०८.२०२६ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

## -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४६१/२०२६ ने.ता.२४.०८.२०२६

**अर्जदार -**
१. **श्रीमती विमल सुधाकरराव लांडे,** वय ६९ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री गजानन सुधाकरराव लांडे,** वय ३५ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा. धामणगाव, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **सौ.दर्शना नितिन टोपले,** वय ३८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.गोराळा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **सुधाकर रामराव लांडे हे दिनांक २४/०६/२०२३** रोजी धामणगाव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**दिनांक २०.०७.२०२६** शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## Dayaram Patel Smarak Trust Dharni, Dist. Amravati
### Shri Vasantrao Naik Mahavidyalaya, Dharni, Dist.Amravati
### (Art, Commerce and Science)

**(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.**
**Email: svnm129@sgbau.ac.in visit us at : svnmdharni.org.**
**(Accredited by NAAC with B-Grade CGPA-2.44)**

**Walk-in-Interview**

**Principal Mob.: 9421818949**

Applications are invited for appointments of candidates for teaching in the Senior College on contributory (CHB) basis as under :

Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes
(As per Regulation No.2/2020 and its para-11, G.R. Dated 17.10.2022)

| Sr. No. | Subjects | Total No.of Contributory Post |
|---|---|---|
| 1. | Commerce | 02 |
| 2. | Chemistry | 01 |
| 3. | Physics | 01 |
| 4. | Botany | 04 |
| 5. | Zoology | 02 |

**Elibigility :**
Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation 2018 (University Direction No.08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकिर्ण 2018/(185/18)मशि-3, dt.14.11.2018.

The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

Interested and qualified candidates should directly appear for the interview along with application on plain paper and testimonials on 28.07.2026 at 02.00 p.m. in Principal's Office of Shri Vasantrao Naik Mahavidyalaya, Dharni,(Kusumkot Bk.) Dist.Amravati.

**Sau.Veenatai R.Malviya**
**(President)**
**(Mob.No.9403723455)**

**Dr.V.M.Gawai**
**(Principal)**
श्री.वसंतराव नाईक महाविद्यालय,
धारणी जि.अमरावती (महा.) ४४४७०२

# पांडुरंगाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या वारकऱ्याचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-**
पांडुरंगाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या अमरावतीच्या वारकऱ्याचा परतीच्या प्रवासादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. अण्णाजी शिवराम भोयर (वय ८०,रा.सातूर्णा) असे मृतक वारकरीचे नाव आहे. या घटनेमुळे सह प्रवासी वारकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली . माहिती नुसार सातुर्णा येथील अण्णाजी शिवराम भोयर (वय ८०) पांडुरंगाच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन झाल्यावर ते एसटी बस एमएच २० जेसी ३८३१ ने पंढरपूरहुन कारंजा मार्गे अमरावती कडे येत होते.

मंगरूळपीर ते कारंजा दरम्यान अचानक त्यांची प्रकृती बिघडली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बस वाहक लाऊडकर व चालक चव्हाण यांनी तात्काळ कारंजा बस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून माहिती दिली. बस थेट कारंजा उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आली.

तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून अण्णाजी भोयर यांना मृत घोषित केले. मृतक अण्णाजी भोयर यांच्यासोबत त्यांचे मित्र रामदास पाटील (देवगाव, अमरावती) प्रवास करत होते. त्यांनी घटनेची माहिती भोयर यांच्या मुलाला दिली. घटनेची माहिती मिळताच मदतीसाठी मनसे तालुकाप्रमुख कपिल महाजन, समाजसेवक सागर गोगलिया, रुग्णसेवक विनोद खोंड, अविनाश पाटील, सागर, गजानन तसेच गुरुदेव मंदिर रुग्णवाहिकेचे रमेश देशमुख यांनी तातडीने उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली.

त्यांनी भुयार यांच्या नातेवाईकांना आवश्यक सहकार्य करून पुढील सर्व शासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मदत केली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.ए.बी.कळदाते सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज १४४४/२०२६**
**अफजल व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.१८.०८.२०२६**

**अर्जदार :**
1. **Afzal Khan S/o. Anwar Khan,** Age 59 Yrs. Occu.: Retired
R/o. Near Kadbai Bazaar, Gawali Pura, Amravati
2. **Ahemad Khan S/o. Anwar Khan**
Age 55 Yrs. Occu.: Labour
R/o. Near Kadbai Bazaar, Gawali Pura, Amravati
3. **Mehboob Khan S/o. Anwar Khan,** Age 52 Yrs. Occu.: Labour
R/o. Near Masjid Gowali Pura, Tq & Dist. Amravati
4. **Nasreen Parvin W/o. Anwar Khan,**
Age 46 Yrs. Occu.:- Household
R/o. Near Police Chowki Kadbi Bazar, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अजिज खान अनवर खान** हे दिनांक ११.०९.२०१५ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अफजल व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अफजल व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**क्र. रामाक्र/६४/एमआरसी-८१/शिरखेड/२०२५-२०२६**

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **धनराज केशवराव पाटणकर**, रा.शिरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे आई नामे **सुभद्रा केशव उर्फ किसन पाटणकर** रा.शिरखेड, ता.मोर्शी यांची जन्माची नोंद ग्रामपंचायत शिरखेड ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.शिरखेड येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक १०.०७.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४९३/२०२६
**खैरुन्निसा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Khairunisa Begam W/o Shaikh Hasan, Age 73 Yrs. Occu.: Household
2. Shaikh Hakim S/o Shaikh Hasan, Age 53 Yrs. Occu.: Service
3. Shaikh Javed S/o Shaikh Hasan, Age 47 Yrs. Occu.: Business
4. Shaikh Wajid S/o Shaikh Hasan, Age 43 Yrs. Occu.: Business
All R/o Near Masjid Maulana Azad Colony, Amravati.
5. Farzana Parveen W/o Abdul Samad, Age 51 Yrs. Occu.: Household
R/o Near Masjid Sayebi Manzil Zakir Colony, Amravati.
6. Najera Bee W/o Shaikh Hamid, Age 49 Yrs. Occu.: Household
R/o Mana, Tq. Murtizapur, Dist. Akola
7. Asefa Bano W/o Shaikh Nazim, Age 41 Yrs. Occu.: Household
R/o Gulista Nagar, Amravati.
8. Shaziya Bano W/o Abdul Zahim, Age 39 Yrs. Occu.: Household
R/o Islami Chowk Old Town Badnera.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शेख हसन शेख उस्मान** हे दिनांक 25.10.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **खैरुन्निसा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **खैरुन्निसा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

प्रोसेस क.६५०/२०२६
दिनांक १६.०७.२०२६

**श्रीमती एस.बी.राठोड, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी जि.अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी.क.२९०/२०२६ ने.ता.२५.०८.२०२६

**अर्जदार :**
१. सुनिता ज्ञानेश्वर वानखडे, वय ५८ वर्षे, धंदा - मजुरी
२. साक्षी ज्ञानेश्वर वानखडे, वय २३ वर्षे, धंदा - घरकाम
३. प्रतिक्षा आशिष सुरुशे, वय ३३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.मनारखेड, पो.बाळापूर, जि.अकोला
४. स्नेहल प्रफुल इंगळे, वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम
५. श्रध्दा ज्ञानेश्वर वानखडे, वय २८ वर्षे, धंदा - मजुरी
नं.१ व २ , ४ व ५ रा.सातेगांव, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

ज्याअथी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ५ चे वडील **नामे ज्ञानेश्वर पुंडलिकराव वानखडे** यांचा दिनांक **१६.०७.२०२३ रोजी तसेच मयत** ज्ञानेश्वर पुंडलिकराव वानखडे यांची आई **भागिरता पुंडलिक वानखडे** ही बऱ्याच वर्षापुर्वी मरण पावली आहे. अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | वारसाचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | सुनिता ज्ञानेश्वर वानखडे | ५८ वर्षे | पत्नी |
| २. | साक्षी ज्ञानेश्वर वानखडे, | २३ वर्षे | मुलगी |
| ३. | प्रतिक्षा आशिष सुरुशे | ३३ वर्षे | मुलगी |
| ४. | स्नेहल प्रफुल इंगळे | ३१ वर्षे | मुलगी |
| ५. | श्रध्दा ज्ञानेश्वर वानखडे | २८ वर्षे | मुलगी |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

**ज्ञानेश्वर पुंडलिकराव वानखडे** हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता वि.सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दी तारखेपासून एक महिन्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अंजनगांव सुर्जी

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरीता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिध्द करण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** - जिल्हा अमरावती, ता.अंजनगांव सुजी, मौजे मुऱ्हा खु. येथील भूमापन गट नं.१३३ याचे एकुण क्षेत्र ०२ हे.५८ आर यापैकी लिहून देणार **१) सुरेश दामोधर चिंचाळे** यांचे मालकीचे क्षेत्र ०२ हे.५८ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरीता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशिलांना सदर मिळकत भाडेपट्टा/योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल कलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारित करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसा हक्क, इजमेंट, शेजाऱ्यांची वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कूळ, ॲक्विजिशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिकी इ.संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असल्यास किंवा हरकत असल्यास तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येऊन हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आल्यास ती सदर मिळकतीवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अमरावती
दिनांक २२.०७.२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के.डी.शिराळे,
पत्ता- ऑफिस नं.डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२
शाहू ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर,
संपर्क क्र.०२३१-२६६८८४७

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.आर.आर.खामतकर,५वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२२७/२०२६
**श्रीमती चंदा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०५.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Chanda Surendra Katade, Age 54 Yrs. Occu.: Household
2. Abhijit Surendra Katade, Age 33 Yrs. Occu.: Labour
Both R/o Swavlambi Nagar, Behind Rangoli Lawn, VMV Rd. Amravati
3. Sau.Snehal Deepak Ingle, Age 32 Yrs. Occu.: Household
R/o House No.241, SS4 Type Sector 2, Near Vishawa Hotel, Vashi, Tq. Dist. Thane.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Surendra Bhimraoji Katade हे दिनांक 25.04.2010 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Chanda Surendra Katade+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Chanda Surendra Katade+2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३१४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# लोकनेता स्व.अजितदादा पवार यांच्या जयंती प्रित्यर्थ 'जनसेवा सप्ताह'

## शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके यांनी पत्रकार परिषदेतून दिली माहिती

**अमरावती/का.प्र.**

दरवर्षी २२ जुलै रोजी अजितदादा पवार यांचा वाढदिवसानिमित्य अमरावती शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. आज अजितदादा पवार आपल्यात नाही आहे. परंतु विकासाच्या प्रत्येक पाऊलावर अजितदादांच्या कामांची आठवण झाल्या शिवाय राहत नाही. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्याचे नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचा समावेश राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये केला आहे.तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्य २२ जुलै ते २७ जुलै २०२६ या कालावधीत 'जनसेवा सप्ताह' निमित्याने लोकोपयोगी व समाजहिताचे विविध कार्यक्रम हाती घेऊन राबविण्यात येणार आहे.

यावर्षी स्व. अजितदादा पवार यांची जयंती समर्पण, सेवा आणि संकल्प या भावनेतून साजरी होत असून अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांच्या संकल्पनेतून शहरात 'ग्रीन अमरावती' ही संकल्पना राबवून २५ हजार वृक्ष लागवड हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



शहरातील वृक्ष लागवड अभियानाचा शुभारंभ २२ जुलै रोजी शासकीय आयटीआय संस्था अमरावती येथून करण्यात येणार असून त्यानंतर जनसेवा सप्ताह अंतर्गत शहरात २५ हजार वृक्ष लागवड अभियान मोठ्या प्रमाणात राबविले जाणार असल्याची माहिती सुद्धा पत्रकार परिषदेतून देण्यात आली.

या अंतर्गत येत्या २६ जुलै रोजी अमरावती येथे वर्ष २०२६ मधील दहावी -बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा स्थानिक श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड अमरावती येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष यश सुलभा संजय खोडके यांनी पत्रकार परिषदेतून दिली आहे.एका महिन्यापासून जय्यत तयारी करण्यात आली असून शोध प्रतिष्ठानच्या आवाहनाला प्रतिसाद देत अमरावती महानगरातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून ७५ टक्केहुन अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांची यादी प्राप्त करण्यात आली. तसेच परिचित व्यक्तीकडूनही त्यांच्या भागातील विद्यार्थ्यांची नावे सुचविण्यात आली असल्याने बहुसंख्य गुणवंत विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करण्यात आली आहे.

तसेच त्यांना कार्यक्रमासंदर्भातही कळविण्यात आले असून कार्यक्रमस्थळी सुद्धा गुणवंत विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणीसाठी स्टॉल लावण्यात येईल. या सोहळ्यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना आकर्षक भेटवस्तू ,प्रशस्तीपत्र तसेच वृक्ष देऊन गौरविण्यात येणार असून भविष्यातील शैक्षणिक वाटचाल व शिक्षणाच्या नवनवीन संधी याबाबत सुद्धा मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.वर्ष २०२६ मधील इयत्ता दहावी व बारावीतील ७५ टक्के हुन अधिक गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी तसेच त्यांच्या पालकांनी या सत्कार सोहळ्याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.पत्रकार परिषदेला शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष - यश खोडके यांच्या समवेत मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अमरावती शहराध्यक्ष - प्रशांत डवरे, माजी महापौर - अँड. किशोर शेळके, मनपा महिला व बाल कल्याण सभापती- ममताताई आवारे, तसेच मनपा नगरसेवक चंदू खेडकर, प्रशांत उर्फ गुड्डू धर्माळे, प्रमोद महल्ले, मनीष बजाज, रतन डेंडूले, मिनल सवई, अर्चना पाटील, माजी नगरसेवक भूषण बनसोड,अँड सुनील बोळे, भास्करराव ढेवले, किशोर भुयार, राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहराध्यक्ष ऋतुराज राऊत राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष संकेत बोके, आकाश हिवसे, अभिषेक हजारे , अभिमन्यू तायवाडे, जयेश सोनोने, मनीष पाटील आदींसह सर्व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

### २२ ते २७ जुलै पर्यंत शहरातील प्रभागा-प्रभागात कार्यक्रम व सेवाभावी उपक्रम

पत्रकार परिषदेत सांगण्यात आले कि, दिवंगत लोकनेता - अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी द्वारा साजरा होणाऱ्या जनसेवा सप्ताह अंतर्गत कार्यकर्तास्तरावर सुद्धा प्रभागा-प्रभागामध्ये सेवाभावी उपक्रम राबविण्यात येणार आहे. ज्यामध्ये २२ जुलै रोजी मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांच्या प्रभाग क्रमांक १० च्यावतीने सखा मंगलम येथे भव्य रक्तदान शिबिर, तसेच मनपा महिला व बालकल्याण सभापती ममता आवारे यांच्या वतीने महिलांना शिलाई मशीन वाटप कार्यक्रम. त्यानंतर शासकीय आयटीआय परिसर येथे वृक्षारोपण कार्यक्रम,सायंकाळच्या सत्रात पीडीएमसी परिसरात रुग्ण व नातेवाइकांकरिता भोजन वाटप कार्यक्रम, २३ जुलै रोजी चिलम छावणी तपोवन रोड तसेच अंबापेठ येथे एस.टी. बस एन.सी.एम.सी कार्ड शिबीर, तसेच पीडीएमसी रुग्णालयात स्नेहभोजन कार्यक्रम,२४ जुलै रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात फळ वाटप, सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल येथे भोजन वाटप कार्यक्रम होणार आहे. तर २५ जुलै रोजी श्री संत सांस्कृतिक भवन, अमरावती येथे शासनाचे वतीने महाराजस्व अभियान राबविण्यात येईल, याच शृंखलेत महेंद्र कॉलनी परिसरात आरोग्य तपासणी शिबीर, तर २६ जुलै रोजी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा, २७ जुलै रोजी विलास नगर स्थित स्मशानभूमी येथे भव्य वृक्ष लागवड अभियान, मृगेंद्र मठ अंबागेट येथे भव्य रक्तदान शिबीर, तसेच युसूफ पॅलेस वलगांव रोड येथे राशन कार्ड शिबीर व एस.टी. बस ने प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी एनसीएमसी कार्ड शिबीर राबविण्यात येणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाप्रसंगी वृक्षारोपण व वृक्ष वाटप सुद्धा केले जाणार असून कार्यकर्तास्तरावर सुद्धा वृक्षारोपण कार्यक्रम, रुग्णांना फळवाटप कार्यक्रम, चित्रकला स्पर्धा, अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे सुद्धा पत्रकार परिषदेतून सांगण्यात आले आहे.

## संक्षिप्त



### बॅरी.आर.डि.आय.के.महाविदयालय येथे करिअर कट्टा उपक्रम

अमरावती- महाविद्यालयाच्या नवीन सत्राची सुरवात हि विद्यार्थांच्या करिअर सोबत सुरू झाली पाहिजे या उद्देशाने नवीन विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेशीत झाल्या नंतर विद्यार्थांना विद्यार्थी संवाद च्या माध्यमातुन करिअर कट्टाचे मार्गदर्शक प्रा.यशवंत शितोळे यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले. आज विद्यार्थी सोशल मिडियावर एका दिवसात १० तास पेक्षा अधिक वेळ रिल्स किंवा इतर अॅप वर वाया घालवतांना दिसतात. तोच वेळ करिअर कट्टा सोबत जुळुन आपले भविष्य घडविण्यासाठी द्यावा असे प्रतिपादन प्रा. शितोळे यांनी केल.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डि.देशमुख हे होते.करिअर कट्टा समन्वयक प्रा. शितल राठोड, व अतुल पाटिल यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. तसेच प्रमुख अतिथी म्हणुन नॅक प्रमुख प्रा.सुमेर ठाकुर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शितल राठोड यांना केले. कार्यक्रमाचे संचालन भक्ती राजकुमार-संसद मुख्यमंत्री व आभार अनुश्री गटूले-संसद उद्योजक मंत्री यांनी व्यक्त केले.

### वाळू वाहतूकीत लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती -** चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आसेगाव–फुबगाव–फत्याबाद रोडवर महसूल व पोलिसांनी कारवाई करत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परवर छापा टाकला. या कारवाईत एका ब्रास काळी रेती (किंमत ८ हजार रुपये) व एमएच ०२ एक्सए ५९३४ क्रमांकाचा टिप्पर (किंमत ७ लाख रुपये) असा एकूण ७ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी नंदू सुधाकर सोनोने (वय ३६, रा. फुबगाव, ता. चांदूर बाजार) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चांदूर बाजार पोलीस करीत आहेत.

### गाडीतून लाखांची रोकड लंपास

**अमरावती-** चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तेलाचे डबे वितरित करून व्यापाऱ्यांकडून जमा झालेली २ लाख ९९ हजार ५०० रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली.स्वप्नील राजू हिवराळे (रा. मल्हारा, ता. अचलपूर) हे टाटा योद्धा वाहनातून तेलाचे डबे वितरित करून परतत असताना वाहनाचे टायर पंक्चर झाल्याने राजेश मेडिकलजवळील पंक्चर दुकानात गेले. ते वाहनाबाहेर असताना गाडीत ठेवलेली रोकड असलेली बॅग अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी चांदूर बाजार पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### मोबाईल टॉवरवरील केबलची चोरी

**अमरावती-** तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नंदनवन कॉलनी येथील एसीटी कंपनीच्या मोबाईल टॉवरमधून विविध प्रकारच्या केबल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे.देवकीसन सहादेवराव बोडरूपी (वय ४२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अज्ञात चोरट्यांनी टॉवरमधील अर्थिंग केबल, पॉवर केबल, डीसी डीबी केबल, एमए पॅनल केबल आदी मिळून १३८ फूट केबल चोरी केली. चोरी गेलेल्या साहित्याची किंमत सुमारे १५ हजार रुपये आहे. तिवसा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### बोलेरोच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर

**अमरावती-** परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील त्रिवेणी संगम–चांदूर बाजार रोडवर भरधाव बोलेरोने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला.अपघातानंतर बोलेरो चालक घटनास्थळावरून पसार झाला.सैयद गनी सैयद कदीर हे दुचाकीवरून जात असताना बोलेरो (क्रमांक डीबीएच ३० टी ००४६) चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत जोरदार धडक दिली. जखमीवर उपचार सुरू असून पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल करून फरार चालकाचा शोध सुरू केला आहे.

### बाबुराव सहारे यांची निवड



**खल्लार-** येथिल नजिकच्या कान्होली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक बाबुराव श्रीराम सहारे यांची आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अमरावती जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.केंद्रीय कार्यालय नवी दिल्लीमार्फत तिसऱ्यांदा ही निवड करण्यात आली असून त्यांच्या निवडीचे सर्वत्र कौतुक केल्या जात आहे.

# नारायणदास लड्ढा हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना अग्निशमन दलातर्फे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण

**अमरावती/वार्ताहर**

श्री ब्रिजलाल बियाणी शिक्षा समिती द्वारा संचालित नारायणदास लड्ढा हायस्कूल मध्ये विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या करिता अमरावती महानगरपालिका अंतर्गत अग्निशमन दलातर्फे आपत्ती व्यवस्थापन या विषयांतर्गत मुलांना प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या लागणाऱ्या आगी बाबत माहिती देऊन त्या आगीवर नियंत्रण कसे मिळवावे तसेच स्वतःचा बचाव आणि सोबत असलेल्या जीवितांचे आगी पासून बचाव कसा करावा याबाबतची माहिती प्रात्याक्षिकासह देण्यात आली.शाळेत लावलेले फायर एक्सटिंगविशर कसे हाताळावे याबाबतचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना



देण्यात आले. विद्यार्थ्यांनीही या फायर एक्सटींगविशरचा प्रत्यक्षात वापर कसा करावा तसेच फायर ब्रिगेडच्या पाण्याच्या गाडीने पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण कसे मिळवावे याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

अग्निशमन दलातर्फे अमोल साळुंके फायरमॅन यांनी अतिशय खेळीमेळीने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले व प्रात्याक्षिकही दाखवले,तसेच त्यांचे सहकारी निशांत राठोड फायरमॅन यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना आगीवरील नियंत्रणाबाबत माहिती दिली. फायर ब्रिगेड व व्हॅन चालक सागर टपके यांनी पाण्याचा मारा कसा करावा याचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिक मुलांना दिले. शाळेच्या मुख्याध्यापिका एस. ए. माळवे यांनी आगीवरील नियंत्रण विद्यार्थ्यांसमोर साळुंखे यांचे समवेत प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखवले. कार्यक्रमाचे संचालन उज्वला शिरभाते यांनी केले.शाळेतर्फे अग्निशमन दलाचे कर्मचारी यांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका सुषमा अरविंद माळवे यांनी रोपटे देऊन केले. कार्यक्रमाची सांगता अग्निशमन दलाचे आभार मानून करण्यात आली.

# टीओडी मीटरमुळे विजग्राहकांना सवलत

**अमरावती/वार्ताहर**

महावितरणच्या स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) मीटर असलेल्या अमरावती परिमंडळातील वीज ग्राहकांना एप्रिल, मे आणि जून महिन्याच्या वीजबिलात २ कोटी ०६ लाख रुपयांची सवलत मिळाली आहे. परिमंडळातील सुमारे ४ लाख वीज ग्राहकांकडे स्मार्ट मीटर लागले आहेत. त्यात ३ लाख ४० हजार घरगुती ग्राहकांचा समावेश आहे.

महावितरणकडून राज्यभर स्मार्ट टीओडी मीटर बसविण्यात येत असून, दिवसाच्या वीज वापरावर मिळणाऱ्या सवलतीमुळे ग्राहकांचा प्रतिसादही वाढत आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नवीन दररचनेनुसार सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेवर ८५ पैसे प्रति युनिट टीओडी सवलत दिली जाते.त्यामुळे ग्राहकांना वीज वापराचे योग्य नियोजन करून बिलात बचत करता येते.

महावितरणने स्पष्ट केले आहे की, स्मार्ट मीटर आणि जुन्या इलेक्ट्रॉनिक मीटरमध्ये वीज मोजण्याची पद्धत समान आहे. त्यामुळे युनिट मोजण्यात कोणताही फरक पडत नाही. स्मार्ट मीटरमुळे बिलिंग प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह झाली असून स्मार्ट मीटरमुळे अवास्तव बिलांच्या जसे ही सरासरी बिल, फॉल्टी बिल अश्या तक्रारीही कमी झाल्या आहेत.स्मार्ट मीटरद्वारे लिकेज करंट किंवा अर्थिंगसारख्या तांत्रिक अडचणींची तत्काळ माहिती मिळत असल्याने संभाव्य विद्युत अपघात टाळण्यास मदत होते.

स्मार्ट मीटर महावितरणकडून ग्राहकांना पूर्णपणे मोफत बसविण्यात येत असून, यासाठी ग्राहकांना कोणतेही शुल्क आकारले जात नाही.शिवाय ग्राहकांना स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत शंका असल्याचे त्याचे पूर्णपणे निराकरण करण्यात येईल असे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी स्पष्ट केले आहे. राज्यात सौरऊर्जेची उपलब्धता वाढल्यामुळे दिवसाच्या वीज वापरावर सवलत देण्यात येत, परंतू वीज ग्राहकांनी आपल्या वीज वापराचे योग्य नियोजन केल्यास सवलतीची योजना अधिक परिणामकारक ठरू शकते. त्यासाठी ग्राहकांनी अधिक वीज वापरणारी उपकरणे गिझर, ईस्त्री, वाशिंग मशीन इत्यादी शक्यतो सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वापरून टीओडी सवलतीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहनही मुख्य अभियंता यांनी केले आहे.

# रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबीकाचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

रोटरी इंटरनॅशनलच्या २०२६-२७ या वर्षासाठी रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबीकाचा पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखात पार पडला. या रोटरीच्या संकल्पनेला अनुसरून नव्या पदाधिकाऱ्यांनी समाजसेवेचा संकल्प व्यक्त केला. अशा पदग्रहण समारंभांमध्ये नव्या नेतृत्वाकडे जबाबदाऱ्या औपचारिकपणे सोपवल्या जातात आणि आगामी वर्षासाठी सेवा उपक्रमांची दिशा निश्चित केली जाते.

यावेळी संजय बोरोडे यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली.





डॉ.युगंधरा गुल्हाने यांनी सचिव (प्रशासन) तर डॉ. शशिकांत थोरात यांनी सचिव (प्रकल्प) म्हणून पदभार स्वीकारला. कार्यक्रमात पुर्वप्रांतपाल किशोर केडिया यांनी पदस्थापना अधिकारी म्हणून नूतन पदाधिकाऱ्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. प्रमुख पाहुणे म्हणून पुर्वप्रांतपाल डॉ दीपक पुरोहित तर विशेष अतिथी म्हणून सहा. प्रांतपाल डॉ. स्मिता हंटोडकर उपस्थित होत्या. यावेळी नव्या कार्यकारिणीचीही घोषणा करण्यात आली. त्यामध्ये अखिलेश खेतान (कोषाध्यक्ष), स्वप्नील करवा (अध्यक्ष-नियुक्त), निलेश खंडेलवाल (उपाध्यक्ष-प्रशासन),आमित हिंदोचा (उपाध्यक्ष-प्रकल्प), डॉ. लोभस घडेकर (बुलेटिन संपादक), अक्षय पेटे (सहसंपादक), रुशिकेश तयाडे व गौरव वानखेडे (संयुक्त सचिव) यांच्यासह विविध संचालकांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल चवने यांनी केले, तसेच प्रकल्प सादरीकरण डॉ पूजा कोल्हे यांनी केले.नवीन सदस्यांच्या परिचय डॉ पवन देशमुख यांनी दिला,यावेळी सर्व संचालक व नवीन सदस्याना पिन बहाल करण्यात आली.नूतन अध्यक्ष रोटेरियन संजय बोरोडे यांनी आगामी वर्षात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, युवक विकास आणि सामाजिक सेवा या क्षेत्रांत विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमास रोटरीचे पदाधिकारी, सदस्य, मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर समारंभामध्ये वर्षा बोरोडे यांना क्लब प्रथम महिला म्हणून सन्माणित कळण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन शितल खंडेलवाल व प्रणिता थोरात यांनी केले. तर आभार सचिव शशिकांत थोरात यांनी केले.

# डीएलओ.व बीएलओ.यांना एस.आय.आर कामाकरीता पूर्ण वेळ कार्यमुक्त करा

## जिल्हाधिकारी यांचे जिल्हातील सर्व विभाग प्रमुखांना आदेश

**अमरावती/वार्ताहर**

जिल्हात एस.आय.आरचे काम युध्द पातळीवर सुरु आहे.या करीता विविध विभागातील ९५%कर्मचारी यांची नेमणूक महसुल विभागाने केली आहे.हे कार्य ३०जुलै पर्यंत पूर्ण करण्याकरीता सहाय्यक व बीएलओ यांना पूर्ण वेळ कार्यालय,शाळा यामधुन कार्यमुक्त करावे अश्या प्रकारचे लेखी आदेश अमरावती जिल्हाधिकारी यांनी संबंधित खाते प्रमुख यांना दिले आहे.जर सर्व विभागातील कर्मचारी पूर्णवेळ एसआयआरचे काम करीत असेल तर कार्यालय,शाळा पूर्ण बंद कराव्या आणि महसुल विभागाने त्यांचे काम पूर्ण करुन घ्यावे.यात शैक्षणिक नुकसान कींवा सामान्य नागरीक यांची कामे प्रभावित झाली तरी चालेल पण महसुल विभागाचे काम वेळेतच पूर्ण झाले पाहीजे.अशी प्रतिक्रीया कर्मचारी,शिक्षकांत उमटत आहे.

भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्याचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) महाराष्ट्र राज्यासह १६ राज्य व ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये घोषित केला आहे. सदर कार्यक्रम कालबद्ध असून त्यामध्ये मुदतीत कार्यवाही होणे अपेक्षित आहे. सदर कार्यक्रमानुसार ३०जून ते ०८ ऑगष्ट, २०२६ या कालावधीमध्ये सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांनी घरोघर जाऊन गणनापत्र २ प्रतीमध्ये भरून घेणे व त्याचे डिजिटायझेशन करणे अनिवार्य आहे.

प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे असलेली मतदार संख्या व घरोघरी जाऊन गणना पत्रक भरणे व डिजिटायझेशन करणे या कामाची एकूण व्याप्ती पाहता नियुक्त केलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना SIR कामाकरिता पुरेसा अवधी देणे आवश्यक आहे. सदरचे काम विहित मुदतीत पुर्ण होणे आवश्यक आहे. बरेचसे BLO हे शिक्षक, अंगणवाडी सेविका, अशा वर्कर, वसुली लिपिक, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी व कृषी सहाय्यक इत्यादी प्रवर्गातील आहेत.

डी.एल.ओ.व बी.एल.ओ. सहाय्यक यांनी ३० जुलै रोजीपर्यंत पूर्णवेळ SIR चे काम करणे आवश्यक आहे.आपले अधिनस्त सर्व BLO हे सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी पुर्णवेळ SIR बाबत कामकाज पाहतील याबाबत दक्षता घ्यावी.

अतिमहत्वाचे/निकडीचे काम असल्यास सकाळच्या सत्रांमध्ये फक्त दोन तासाकरिता (त्यापेक्षा जास्त नाही) त्यांच्या सेवा वापरण्यात याव्या. तसेच संबंधित BLO यांचे SIR कामकाजामुळे त्यांचे मुळ विभागाचे कामकाजामध्ये काही कमतरत/अपुर्णतः राहिल्यास सदरचे काम आपले अधिनस्त इतर कर्मचारी यांचेकडून करुन घ्यावे. तथापी त्यास संबंधित BLO यांना जबाबदार धरण्यांत येऊ नये. तसेच BLO यांना ३०जुलै पर्यंत मुळ विभागाचे कामकाजाबाबत कोणतीही नोटीस देणे अथवा कारवाई करणेपुर्वी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पुर्व मान्यता घेणे बंधणकारक राहील.

यामध्ये हलगर्जीपणा केल्यास अथवा संबंधित खाते प्रमुख त्यांना BLO चे कामासाठी कार्यमुक्त करत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरून निवडणुकीच्या नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल,याची सक्त नोंद घेण्यांत यावी.असे आदेश अमरावती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी जिल्हातील सर्व खाते प्रमुख यांना दिले आहे.



# पॅसेंजर ऑटोला भरधाव आयशर ट्रकची धडक

## महिलेचा मृत्यू, ५ जण गंभीर जखमी





### हिवरखेड बस थांब्यासमोर अपघात

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी येथून अवघ्या दहा किमी अंतरावर असलेल्या हिवरखेड येथील बस थांब्यासमोर पॅसेंजर ऑटोला भरधाव येणाऱ्या आयशर ट्रकने धडक दिली. या अपघातात एक महिला जागीच मृत्युमुखी पडली असून पाच जण गंभीररित्या जखमी आहेत. त्यांना उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथून जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे हलविण्यात आले आहे. ही घटना आज दि.२१ जुलै रोजी संध्याकाळी ७:३० वाजताच सुमारास घडली. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार वरुड-हिवरखेड मार्गे मोर्शी कडे येणारा आयशर ट्रक क्र.एमएच २८ एबी ७०२० ने विरुद्ध दिशेने येणाऱ्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या मिनी ऑटो क्रमांक एमएच २७ बीडब्ल्यू ८९५९ ला जबर धडक दिल्यामुळे ऑटोमध्ये बसलेल्या सहा ☞(पान २ वर)

# दिल्लीत आंदोलन करताना खासदार

## बळवंत वानखडे यांना अटक

**नवी दिल्ली :** आज राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस खासदार बळवंत वानखडे यांच्या सह सर्व खासदारांनी राजाजी मार्गावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाच्या दिशेने पायी मोर्चा काढला. पंतप्रधानांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी लोक कल्याण मार्गावर शांततापूर्ण धरणे आंदोलन सुरू असताना पोलिसांनी बळवंत वानखडेंसह अनेक काँग्रेस खासदारांना ताब्यात घेऊन अटक केली. विद्यार्थ्यांवरील अत्याचार, दडपशाही आणि सरकारच्या भूमिकेविरोधातील हा संघर्ष आता संसदेपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो जनतेच्या आवाजासह रस्त्यावरही पोहोचला आहे. लोकशाहीत आंदोलनाचा आणि प्रश्न विचारण्याचा



अधिकार हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. अटक करून आवाज दाबण्याचा प्रयत्न होऊ शकतो, पण जनतेच्या प्रश्नांसाठीचा आमचा लढा थांबणार नाही. सत्य, संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी आमचा संघर्ष कायम राहील,असे यावेळी खासदार वानखडे म्हणाले.

# आफाक शेख हत्याकांडाचा मुख्य सूत्रधार ताब्यात

### -अपघातात झाला होता जखमी



**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील राजेंद्र कॉलनी परिसरात १५ जुलै रोजी झालेल्या आफाक शेख हत्याकांडातील मुख्य सूत्रधाराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपी अपघातात जखमी झाल्याने तो खासगी रुग्णालयात उपचार घेत होता. पोलिसांनी तगडा बंदोबस्त रुग्णालय परिसरात लावला होता. आरोपी बरा होताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. माहितीनुसार, १६ जुलैच्या रात्री आरोपीची दुचाकी छत्री तलावाजवळ डिव्हायडरला धडकली होती. या अपघातात मुख्य आरोपी गंभीर जखमी झाला होता. १५ जुलैच्या सकाळी आठ वाजता सुमारास☞(पान २ वर)

### चांदूर रेल्वेतील आनंद मठातील कथित अत्याचार प्रकरण

# आरोपी दत्तगिरी महाराजांचे मुख्यमंत्र्यांसह नेत्यांसोबत छायाचित्र

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे येथील आनंद मठाशी संबंधित कथित लैंगिक शोषण प्रकरणात नवे वळण आले असून, या प्रकरणातील आरोपी दत्तगिरी गुरु जयराम महाराज यांचे विविध राजकीय नेत्यांसोबतचे फोटो सोशल मीडियावर आढळून आले आहेत. या छायाचित्रांमध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार अनिल बोंडे तसेच भारतीय जनता पक्षाशी संबंधित☞(पान २ वर)

# ट्रकच्या धडकेत एसटी चालकाचा जागीच मृत्यू

### रेवसा पुलावर अपघात



**-टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** भातकुली तालुक्यातील आष्टी येथील रहिवासी तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (एसटी) चालक मनोज ज्ञानेश्वर माताळे (वय ३६) यांचा रेवसा पुलावर झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (२० जुलै) दुपारी सुमारे अडीच वाजताच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, मनोज माताळे हे आष्टी येथून दुचाकीने ड्युटीसाठी जात असताना रेवसा पुलावर अज्ञात ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर ट्रक त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून पसार झाला. या घटनेमुळे आष्टी परिसरात शोककळा पसरली असून, माताळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर ☞(पान २ वर)

# शासकीय योजनेतील ‘विहीर गायब’

### संतप्त शेतकऱ्यांची नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात तक्रार



### -शेवती जहागीर येथील प्रकरण

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** नजीकच्या शेवती जहागीर येथील तीन शेतकऱ्यांच्या शासकीय योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विहिरी प्रत्यक्षात शेतात अस्तित्वात नसल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी मंगळवारी (दि. २१ जुलै) नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांच्या उपस्थितीत ही तक्रार पोलीस निरीक्षकांकडे देण्यात आली असून, प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. शेतकरी अलका सुभाष समरीत यांनी सन २०२३ मध्ये शासकीय योजनेअंतर्गत त्यांच्या शेतासाठी विहीर मंजूर झाल्याचे कागदोपत्री नमूद असताना प्रत्यक्ष जागेवर विहीर नसल्याचा दावा केला आहे. यासंदर्भात प्रकाश साबळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी निवेदन सादर केले. या प्रकरणात☞(पान २ वर)

# अनियंत्रित मालवाहू ट्रकचा अपघात




**तिवसा/प्रतिनिधीः-** अमरावती वरून नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या एका मालवाहू ट्रकचा सोमवारी मध्यरात्रीच्या दरम्यान अंधारात अनियंत्रित होऊन अपघात झाल्याची घटना तिवसा येथे घडली. आयशर ट्रक हा तिवसा मार्गे नागपूरकडे जात असतानाच अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले व ट्रक थेट तिवसा तहसील कार्यालयासमोरील डिव्हायडर तोडून नालीवर शिरला.ज्यात हायवेच्या डिव्हायडरसह अन्य साहित्याचे नुकसान झाले. ट्रक नालीवर फसल्या गेला आहे.सुदैवाने कुठलीही दुखापत चालकास झाली नसून सदर अपघाताची तिवसा पोलिसांनी नोंद घेतली आहे.

# पंचायत समितीचा मुख्य दरवाजा बीडीओंचे पार्किंग स्थळ!

### -नियम जनतेला, सूट साहेबांना

### -अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचा अजब कारभार

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी** अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीतूनच शिस्त आणि नियमांचे धडे दिले जातात, मात्र याच कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर प्रशासनाची बेशिस्त उघड झाली आहे. पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वारावरच गटविकास अधिकाऱ्यांचे शासकीय चारचाकी वाहन कायमस्वरूपी पार्क



केले जात असल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दरवर्षी पावसाळ्यात शेतकरी, लाभार्थी, रोजगार हमीची कामे, घरकुल, ग्रामपंचायत दाखले आणि विविध शासकीय कामांसाठी तालुक्यातील शेकडो नागरिक दररोज पंचायत समितीत येतात. यामध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग☞(पान २ वर)

# विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ युवक काँग्रेसची तीव्र निदर्शने

### इर्विन चौकात रास्ता रोको, पदाधिकाऱ्यांना घेतले पोलीसांनी ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** नवी दिल्ली येथील जंतर-मंतरवर आपल्या न्याय्य हक्कांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या कथित लाठीमार व वॉटर कॅननच्या वापराच्या निषेधार्थ अमरावती शहर युवक काँग्रेसच्या वतीने आज तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी युवक काँग्रेसच्या पदाधिकारी व☞(पान २ वर)

### ■ विद्यार्थ्यांवरील कारवाईचा यशोमती ठाकूर यांच्याकडून तीव्र निषेध



नवी दिल्लीमध्ये आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर ज्या प्रकारे लाठीचार्ज करण्यात आला आणि त्यांना ताब्यात घेण्यात आले, त्याचा काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. प्रतिक्रिया देताना त्या म्हणाल्या की, ’लोकशाहीत संविधानाने दिलेला ’अभिव्यक्ती स्वातंत्र्य’☞(पान २ वर)

# पहिल्याच पावसात गायवाडी पानंद रस्ता गेला वाहून

### -निकृष्ट कामामुळे नागरिक संतप्त

**खल्लार/प्रतिनिधीः-** पहिल्याच पावसात तहसिल ते गायवाडी दरम्यान नव्याने करण्यात आलेला पानंद रस्ता वाहून गेल्याने संबंधित बांधकामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च करून तयार करण्यात आलेला रस्ता पहिल्याच पावसात खचल्याने काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतात जाणे सोयीचे होणार अशी अपेक्षा होती. मात्र पहिल्याच पावसाने ती अपेक्षा धुळीस मिळाली. अनेक ठिकाणी रस्ता वाहून गेला असून मुरूम, माती आणि खडी पावसाच्या पाण्यासोबत वाहून गेली आहे. परिणामी शेतकऱ्यांना पुन्हा चिखलातून मार्ग काढत शेतात जावे लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार , रस्ता बांधताना पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होईल अशी ☞(पान २ वर)



■ ’सदर रस्ता पावसाच्या पाण्यामुळे वाहून गेलेला नसून, शेतातील पाण्याचा निचरा व्हावा यासाठी काही शेतकऱ्यांनी रस्ता फोडला आहे. या बाबीची माहिती मिळाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ दखल घेतली आहे. संबंधित ठिकाणी पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पाईप टाकण्याची व्यवस्था करण्यात येत असून, त्यानंतर रस्त्याची आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल. **-विक्रांत शेरेकर** कनिष्ठ अभियंता,सांबावि, दर्यापूर

गायवाडी ते तहसिल रस्ताचे काम चालू असून तो जो रस्त्याच्या मधोमध खड्डा पडला आहे तो आम्हीच जेसीबीच्या सहाय्याने केला असून तेथील तीन ठिकाणी पायली टाकण्यात येणार आहे **-रोहित बाळगुळे** उपकार्यकारी अभियंता सांबावि, दर्यापूर

# डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समितीला धारणीत सार्वजनिक वाचनालयासाठी जागा

### -महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार



**मुंबई :** अमरावती जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्र असलेल्या धारणी येथील नागरिक आणि विद्यार्थ्यांसाठी सार्वजनिक वाचनालय उभारण्यात येणार आहे. यासाठी डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समिती, अकोला (शाखा धारणी) या संस्थेला शासकीय जागा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली असून, महसूल विभागाने मंगळवार ( दि. २१) रोजी यासंदर्भातील आदेश जारी केला.

या निर्णयानुसार मौजे धारणी येथील शिट क्र. ४, प्लॉट क्र. २१९ मधील १६३ चौ. मी. क्षेत्रफळाची शासकीय जागा डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समिती, अकोला (शाखा धारणी) या संस्थेला सार्वजनिक वाचनालय उभारण्यासाठी भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने देण्यात येणार आहे.

शासन निर्णयानुसार संबंधित जागेचा वापर केवळ सार्वजनिक वाचनालया☞(पान २ वर)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची पालखी पंढरपूरला रवाना



**गुरूकुंज मोझरी/प्रतिनिधीः** अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम अंतर्गत श्रीगुरुदेव केंद्रीय प्रचार विभागाद्वारे आयोजित लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम येथील आषाढी एकादशी निमित्त राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या चरण पादुकांसह श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम ते पुण्यक्षेत्र पंढरपूर पालखी प्रचार यात्रा गुरुकुंज आश्रमातून ☞(पान २ वर)

# ब्रेकअप नंतर तरुणीला पाठवले अश्लील व्हिडिओ

### -फ्रेजरपुरा ठाण्यात गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** एकमेकाचे विचार जुळत नसल्याने आणि आपसात पटत नसल्याने एका २२ वर्षीय तरुणीने आपल्या प्रियकराशी असलेले संबंध तोडले. मात्र तरीही आरोपी तरुणाने तिचा पाठलाग सुरू ठेवला. तिने प्रतिसाद न दिल्याने चिडलेल्या आरोपीने तरुणीला अश्लील व्हिडिओ पाठवले आणि तिच्या आई- वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून आरोपी हर्षवर्धन (वय २२) विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार पीडित तरुणीची आरोपी हर्षवर्धन सोबत ओळख झाली होती. दोघांमध्ये काही काळ बोलणे, भेटणे सुरू होते. तरुणी हर्षवर्धनच्या घरीही येत-जात असे. दोघे दिवसातून ☞(पान २ वर)